**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री. जितेंद्र आव्हाड यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिज्ञा केली.

---

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी शपथ घेतली.

------

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या प्रा.सुरेश नवले यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

प्रा.सुरेश नवले यांनी शपथ घेतली.

------

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री.राम जानकिराम पंडागळे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.राम जानकिराम पंडागळे यांनी प्रतिज्ञा केली.

------

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्रीमती अलका अनंत देसाई यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्रीमती अलका अनंत देसाई यांनी शपथ घेतली.

-------

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री.सुमंत सिताराम गायकवाड यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.सुमंत सिताराम गायकवाड यांनी प्रतिज्ञा केली.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री. सुभाष चव्हाण यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. सुभाष चव्हाण यांनी शपथ घेतली.

--

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री. मोहन रामकिसन जोशी यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. मोहन रामकिसन जोशी यांनी शपथ घेतली..

--

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री. एम.एम.शेख यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. एम.एम.शेख यांनी शपथ घेतली.

--

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री.रमेश शिवाजीराव शेंडगे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. रमेश शिवाजीराव शेंडगे यांनी शपथ घेतली.

--

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री.चरणसिंग सप्रा यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. चरणसिंग सप्रा यांनी शपथ घेतली.

--

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**सभापती** : आता दिनांक 29 नोव्हेंबर, 2007 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र. 33631 घेण्यात येईल.

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक 33631</u>**

**राज्यातील बनावट व भेसळयुक्त औषधे विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३) * ३३६३१ श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री.राजन तेली , श्री. गोविंदराव आदिक , श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बनावट व भेसळयुक्त औषधांचे विक्रेते व निर्मात्यांवर छापे टाकून त्यांच्यावर कारवाई करावी असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने माहे ऑगस्ट, २००७ मध्ये किंवा त्या सुमारास दिलेले आहेत व शासनाने केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे सप्टेंबर, २००७ अखेर किती विक्रेते व निर्मात्यावर छापे टाकून त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अशा घटना राज्यात पुन्हा होऊ नयेत म्हणून शासनाने कोणते कठोर निर्णय घेतले आहेत वा घेण्यात येत आहेत,

(४) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबा सिध्दीकी, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता**: (१) होय,

(२) अन्न व औषध प्रशासनाने माहे सप्टेंबर, २००७ अखेर एकूण २०० विक्रेते व ६३ उत्पादकांकडे तपास केला. सदर तपासणीमध्ये बनावट व भेसळयुक्त औषधांची निर्मिती अथवा विक्री होत असल्याचे आढळून आले नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) बनावट व भेसळयुक्त औषधांची प्रकरणे शोधून काढण्यासाठी जिल्हा स्तरावर यंत्रणा कार्यरत असून त्यामार्फत नियमितपणे औषध उत्पादक, विक्रेते यांच्या तपासण्या करुन औषध नमुने चाचणीकरिता घेतले जातात. अप्रमाणित घोषित नमुन्यासंदर्भात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियमांतर्गत कारवाई घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

.....२....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३३६३१...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, बनावट व भेसळयुक्त औषधांची प्रकरणे शोधून काढण्यासाठी जिल्हा स्तरावर यंत्रणा कार्यरत आहे. या यंत्रणेने ऑक्टोबर, 2007 ते फेब्रुवारी,.08 या कालावधीत किती प्रकरणांची तपासणी केली ? असल्यास, किती भेसळयुक्त प्रकरणे या यंत्रणेस आढळून आली ? आढळून आलेल्या भेसळयुक्त प्रकरणांच्या बाबतीत कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. बाबा सिध्दीकी : सभापती महोदय, 2007 मध्ये 18 भेसळयुक्त औषधांची प्रकरणे आढळून आली आणि त्या संदर्भात संबंधितांवर प्रॉसिक्यूशन केलेले आहे.

--------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक- 37730**

**शासकीय रुग्णालयांमध्ये श्वानदंशावरील लस उपलब्ध नसल्याबाबत**

**(१) * ३७७३० डॉ. दिपक सावंत , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. अरविंद सावंत , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्वान (कुत्रा) दंशावरील लस खरेदी करण्याचा शासनाने निर्णय घेऊन त्यानुसार चिनी कंपनीस सुमारे ४० कोटी रुपायांची लस पुरवठा करण्याचे कंत्राट देण्यात आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, अनेक शासकीय रुग्णालंयांमध्ये श्वान दंशावरील लस उपलब्ध नसल्याने रुग्णांना महागडी लस बाहेरुन आणून घ्यावी लागते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चिनी कंपनीची लस खरेदी करण्यासाठी नियमात सुधारणा करण्यात आली आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्वानदंशावरील लस पुरविण्यासाठी एका भारतीय कंपनीने तयारी दर्शविली असतांना सदर कंपनीला राज्य शासनाने डावलले हे खरे आहे काय,

(५) असल्यास, चिनी औषध कंपनीकडून श्वानदंशावरील ४० कोटी रुपयांची लस खरेदी करण्याची खास अशी काही कारणे आहेत काय,

(६) असल्यास, ती कोणती ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकरिता** : (१) लसीचे कंत्राट हे ३ कंपन्यांना ३३.३३ टक्के या प्रमाणे नुकतेच विभागून देण्यात आले असून त्यापैकी एक कंपनी चिनमध्ये उत्पादित श्वान लसीचा पुरवठा करणार आहे.

(२) हे खरे नाही. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेकडील दरकरार उपलब्ध नसेल तेव्हा इ.एस.आय.सी. च्या दरकरारावर रुग्णालयाकडून लस खरेदी केली जाते व रुग्णांना नियमितपणे लसीचा पुरवठा केला जातो.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) नाहीत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्रात श्वानदंशांचे प्रकार मोठया प्रमाणात वाढीस लागलेले आहेत. त्यामुळे शासनाने श्वानदंशावरील 20 लाख वॉयल खरेदी करण्याचा घाट घातला होता. त्या वायल्स् पुरविण्याचा ठेका चीनमधील एका कंपनीला देण्याचे शासनाने ठरविले. शासनाचे वॉयल्स् पुरविण्यासंदर्भातील सर्व नियम धाब्यावर बसवून सदरहू चीनची कंपनी क्वॉलिफाय नसताना, तसेच त्या कंपनीकडे डब्ल्यू.एच.ओ.चे प्रमाणपत्र नसताना त्या कंपनीस डब्ल्यू.एच.ओ.चे प्रमाणपत्र दिले गेले आणि त्या कंपनीस निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेतले गेले. माझा पहिला प्रश्न असा आहे की, लेन्टीन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे चीनची कंपनी वॉयल्स् पुरविण्यासाठी क्वॉलिफाय होती काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शासकीय रुग्णालयांसाठी औषधे आणि लस यांचा पुरवठा करण्यासाठी दोन वर्षे तरी संबंधित कंपनीने पुरवठा करणे आवश्यक असते, अशा प्रकारची शासनाची अट आहे, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी चीन मधील औषध कंपनीकडून वॉयल्स् पुरविण्यासंबंधीचे टेंडर दिले गेले यासंबंधीचा प्रश्न सभागृहात उपस्थित केलेला आहे. चीन येथील औषध कंपनीस श्वानदंशाच्या वॉयल्स् पुरविण्यासंबंधीचे टेंडर देण्यात आलेले नाही, ही गोष्ट मी प्रथम क्लिअर करु इच्छितो. श्वानदंशाच्या वॉयल्स् पुरविण्यासंदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या माध्यमातून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने चार औषध कंपन्यांचा निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यातील तीन औषध कंपन्यांचे टेंडर पात्र ठरविले होते. त्या तीन कंपन्यांमध्ये चीन देशातील एक औषध कंपनीचा देखील समावेश आहे. सदरहू औषध कंपनी औषधे आयात करणारी आहे. तसेच दोन कंपन्या स्थानिक आहेत. या तिन्ही औषध कंपन्यांना 33:33 टक्के प्रमाणे कंत्राट विभागून देण्यात आले आहे. केवळ एकाच कंपनीला श्वानदंशाच्या वायल्स् पुरविण्याचे टेंडर देण्यात आलेले नाही.

**<u>सभापतीस्थानी माननीय उप सभापती</u>**

डॉ. दीपक सावंत : लेन्टीन आयोगाच्या शिफारशी धाब्यावर बसवून शासनाने हे कंत्राट दिले आहे, ही गोष्ट खरी आहे काय ? चीन येथील औषध निर्मिती कंपनीने लेन्टीन आयोगाच्या शिफारशी फुलफिल केल्या आहेत काय ? शासकीय रुग्णालयांमध्ये औषधे आणि लस यांचा पुरवठा करण्यासंबंधीचा दोन वर्षे अनुभव असलेल्या औषध कंपन्यांकडून औषध आणि वॉयल्स खरेदी केल्या पाहिजेत अशा प्रकारची शासनाने अट घालून दिलेली आहे, ही गोष्ट खरी आहे काय ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, मी उपरोक्त दोन प्रश्न विचारले होते. वॉयल्स्चा पुरवठा करण्यासंबंधी कोणत्या कंपनींना निविदा दिल्या आहेत, याची माहिती मी विचारलेली नाही. मी जे दोन प्रश्न विचारलेले आहेत त्या प्रश्नांची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डी.एम.ई.आर. यांचे निविदा काढताना काही नियम ठरले आहेत. त्या नियमात तीन-चार अटी घातलेल्या असतात. औषध निर्मिती कंपनीला कमीत कमी दोन वर्षे औषध निर्मितीचा अनुभव असला पाहिजे. श्वानदंशांची वॉयल्स्चा पुरवठा करण्यासंदर्भात चार औषध कंपन्यांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतु त्या निविदांमध्ये वॉयल्सचे दर जास्तीचे कोट करण्यात आले होते म्हणून त्या कंपनीना निगोशिएशनसाठी बोलविण्यात आले होते व त्यांना सांगण्यात आले होते की ज्या दराप्रमाणे ईएसआय यांना औषण पुरविण्यात येते त्याच दराप्रमाणे डीएमईआर या विभागाला औषण पुरविण्यात यावे. परंतु काही कंपन्या दर कमी करण्यास तयार नव्हत्या त्यामुळे पुन्हा फेरनिविदा काढण्यात आल्या. तेव्हा तीन कंपन्यांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्या कंपनीने सुध्दा वॉयल्स्चे दर जास्तीचे कोट केले होते. परंतु त्या तीन औषध कंपन्यांसोबत दराच्या बाबतीत वाटाघाटी करुन त्या तिन्ही कंपन्यांना 33:33 टक्के प्रमाणे वॉयल्स् पुरविण्याचे कंत्राट देण्यात आले आहे. यासंदर्भात फेरनिविदा काढली त्यावेळी दोन वर्षाची अट काढून टाकली होती. याचे कारण असे की, मार्केटमध्ये या वॉयल्स्चा दर जास्त होता, परंतु आपल्याला वॉयल्स् कमी दरात हव्या होत्या.

यानंतर श्री. कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37730 ....

श्री. सुरेश शेट्टी ....

म्हणून दोन वर्षांची अट काढून परत निविदा काढण्यात आली. दुसऱ्यांदा निविदा काढल्यानंतर निगोशीएशन करण्यात आले भाव फार कमी आला आणि शासनाचा फायदा झालेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शासनाने हा प्रश्न लाईटली घेऊ नये. सन्माननीय सदस्यांनी जो मूळ प्रश्न विचारला होता तो बरोबर आहे. ज्या कंपनीला ठेका देण्यात आला आहे त्या कंपनीची नोंदणी सहा महिन्यापूर्वी दिल्लीमध्ये झाली होती. त्यानंतर ठेका घेणाऱ्या कंपनीला नोंदणी होऊन दोन वर्षे झालेली असली पाहिजेत अशी ही अट आहे ती रद्द का करण्यात आली ? याबाबत शासनाने खुलासा केला पाहिजे. सभापती महोदय, ठेका देताना एक निविदा 16 ऑक्टोबर 2007 रोजी काढली आणि दुसरी निविदा 17 नोव्हेंबर 2007 रोजी काढली. शासन यासंदर्भात कोणाला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे असा माझा प्रश्न आहे. 2005 मध्ये कंपनीने चायनीज लस खरेदी केली आणि त्यामुळे 6028 मुलांना बाधा झाली त्यातील 22 मुले मरण पावली. म्हणूनच लेंटीन आयोगाने अट घातली होती. दोन कंपन्या होत्या त्यापैकी एक कॅरन बेरीज आणि दुसरी रॅनबॅक्सी होती. दोघांचीही निविदा 276.64 पै. इतक्या किंमतीची होती. दोघांनाही विभागून काम देता आले असते. परंतु ते दिले गेले नाही. दुसरे रेट 230 रुपये आणि 244 रुपये आल्याचे शासन सांगत आहे. या उत्तरामुळे सभागृहाची दिशाभूल होत आहे. सभापती महोदय, मे.भारत बायोटेक कंपनी 230 रुपयांनी ठेका घ्यावयाला तयार होती. कंपनी 230 रुपयांनी निविदा घेण्यास तयार असताना दुसऱ्या कंपनीला तुमचे प्रमाणपत्र बोगस असल्याचे सांगून दम दिला हे खरे आहे काय ? याच कंपनीने जपानला औषध पुरवठा केल्यानंतर 6028 मुलांना विषबाधा झाली होती आणि त्यातील 22 मुले मरण पावली होती. माझा प्रश्न असा आहे की, दोन कंपन्यांचे रेट सारखे असताना त्यांना ठेका विभागून का देण्यात आला नाही ? कंपनीचे सहा महिन्यापूर्वी रजिस्ट्रेशन झाले असताना आणि दोन कंपन्या तयार असताना 33 टक्के दोघांना विभागून न देण्याचे कारण काय ?

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37730 पुढे सुरु....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासन निविदा काढते ते कोणाला खूष करण्यासाठी काढत नाही. निविदा काढताना औषधे योग्य त्या दर्जाची असणे आणि ती स्वस्त मिळणे हाच क्रायटेरिया लावला जातो. सन्माननीय सदस्य जी माहिती देतात ती खरी समजली जाते आणि मंत्रीमहोदय सांगतात ती माहिती खोटी असते काय ? निविदा काढल्यानंतर ज्या निगोशिएशन्स होतात त्या गोपनीय असतात. सन्माननीय सदस्यांना कोणत्या निविदा आल्या आणि कोणत्या दराने ठेका दिला तसेच किती रक्कम ऑफर केली याची माहिती कशी मिळते हे मला समजत नाही. वृत्तपत्रातून जी बातमी येते ती खरी आणि आम्ही येथे तोंडी सांगतो ते खरे नसते काय ?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कंपनीने जपानमध्ये औषध पुरवठा केल्यानंतर त्यामुळे 22 मुले दगावली हे खरे आहे काय ? सत्य असेल तर सहा महिन्यापूर्वी ज्या कंपनीला रजिस्ट्रेशन मिळाले त्या कंपनीला ठेका कसा दिला ? लेंटीन आयोगाने निविदेच्या बाबतीत जी मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत ती धुडकावून चायना कंपनीला कोणत्या दराने निविदा दिली?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत............. ता.प्र.क्र.37730.....

जपानमध्ये या कंपनीने ही लस पुरविल्यानंतर तेथील अनेक लोकांना गंभीर आजार झाले, 22 मुले दगावली. हा प्रकार याच कंपनीच्या लस पुरवठ्यामुळे झाला हे खरे आहे काय? चीनमधील कंपनी कोणत्या दराने लसीचा पुरवठा करीत होती? त्याच दराने भारतीय कंपनी पुरवठा करण्यास तयार होती हे खरे आहे काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जपानमध्ये काय प्रकार घडला याची मला कल्पना नाही. सन्माननीय सदस्यांकडे जर याबाबत काही माहिती असेल तर ती त्यांनी शासनाला द्यावी. कॅप्लीन पॉईंट या कंपनीने चायनामधून लस आयात केली, त्यांच्याकडे ड्रग्ज कंट्रोलर ऑफ इंडिया यांचे लायसन्स आहे, स्टॅण्डर्ड टेस्ट रिपोर्ट आहे. क्रायटेरियाप्रमाणे सर्व पुरावे टेंडर ॲप्लीकेशन भरताना त्यांनी सादर केले असून सर्व सर्टिफिकेट्स प्रमाणित आहेत. ज्या चार कंपन्या होत्या त्यापैकी कॅरन बेरिजचा रु.276.64, रॅनबक्सीचा रु.277, कॅप्लीन पॉईंटचा 230 रुपये व मे.भारत बायोटेक कंपनीचा रु.244 अशाप्रकारे या चार कंपन्याचे कोटेशन आले होते. या सर्व कंपन्यांशी निगोशिएशन करुन रु.230 या दराने पुरवठा करण्यासाठी 3 कंपन्या शॉर्टलिस्ट केल्या. या कंपन्यांना एकदा आर.सी.मध्ये घेतले तर टर्नओव्हरच्या 16 टक्के डिपॉझिट शासनाकडे भरावे लागते व ही रक्कम साधारणपणे 2 ते 2.5 कोटी रुपये इतकी असते. दोन कंपन्यांनी डिपॉझिट भरले. परंतु चीनमधील कंपनीने अद्याप डिपॉझिट भरलेले नाही म्हणून त्या कंपनीला अद्यापपर्यंत कॉन्ट्रॅक्ट दिलेले नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी व मी स्वत: या संदर्भात मंत्रीमहोदयांना पत्र लिहिले होते. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांशी आमची चर्चा झाली होती. त्यांनीच आम्हाला दर काय आहेत हे सांगितले होते. या सर्व गोष्टीची शासन चौकशी करणार आहे का? माझा दावा आहे की, शासन चीनमधील कंपनीला आणण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यावेळी एखाद्याला रेबिज होतो तेव्हा त्याला लस दिली जाते. ती लस फेल ठरली तर ती व्यक्ती ताबडतोब मृत्युमुखी पडेल. मृत्यूपूर्वी ती व्यक्ती जितक्या लोकांना चावेल तितक्या लोकांना रेबिज होऊ शकतो. त्यामुळे 33 टक्के प्रमाणात तीन कंपन्यांना विभागून पुरवठा करण्यास सांगितले आहे त्याबाबत पुनर्विचार केला जाईल का?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37730.....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, गेली साडेतीन वर्षे मी व माननीय मंत्रीमहोदय या खात्याचा कारभार सांभाळीत आहोत. आम्ही दोघांनीही कोणत्याही टेंडर प्रोसेसमध्ये कधी इंटरेस्ट घेतला नाही, लक्ष घातले नाही. टेंडर कमिटी, ड्रग्ज ॲप्रूव्हल कमिटीला पूर्ण अधिकार दिले असून त्यांनी नियमानुसार योग्य तो निर्णय घ्यावा. जे नियम ठरवून दिले आहेत त्यानुसार त्यांनी खरेदी करावी, निविदा काढाव्यात. जे आयटेम खरेदी करावयाचे आहेत ते ठरवून दिलेले नॉर्म्स स्ट्रिक्टली फॉलो करुन खरेदी केले गेले आहेत. आम्ही कोणत्याही कंपनीला बोलावले नाही. जे क्वालिटी ड्रग्जचा पुरवठा करतील, स्वस्त दरात पुरवठा करतील त्यांच्याकडूनच शासन खरेदी करणार आहे हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता. प्र. क्र. 37730.......**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय..........

**उपसभापती** : सभागृहासमोर इतके प्रश्न आहेत, बाकीचे सदस्य देखील आपले प्रश्न येण्याची वाट पाहत आहेत. आपला आग्रहच असेल तर याच प्रश्नावर आपण एक तास चर्चा करु.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, मला फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे तो म्हणजे चीन मधील कंपनीचे दर 230 ते 244 असे दिलेले होते, आपण त्यांना बोलावून हे दर कमी करावेत असे सांगितले, हे खरे काय ? त्यांनी आपल्याकडे लेखी तक्रार केली आहे. हे करताना तीन वर्षाचे प्रमाणपत्र तसेच डब्ल्यूएचओ मार्फत जीएमपी हे प्रमाणपत्र सादर केले व यासाठी अट शिथील करण्यास सांगितले व त्यांनी दिलेले प्रमाणपत्र खोटे असल्याचा आक्षेप वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने घेतला. त्यानंतर त्यांनी माननीय मंत्री महोदयांकडे लेखी तक्रार केली हे देखील खरे आहे काय ? कॅरन बेरिज आणि रॅनबॅक्सी या दोन कंपन्यांकडून 276.64 एवढा दर आला असतांना त्याच कंपन्यांना हे विभागून न देता तिसऱ्याच चीनच्या कंपनीला आपल्या अधिकाऱ्यांनी बोलावून घेण्याचे कारण काय ?

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, जे नियम ठरलेले आहेत, त्या नियमाप्रमाणे फायनल अपिल प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली जी समिती आहे तिच्याकडे करण्यात येते. टेंडर प्रोसेसमध्ये काही ग्रीव्हन्सेस असतील तर फायनल अपिल वैद्यकीय शिक्षण विभागाकडे करण्यात येते, मंत्री महोदयांकडे तर अपिल करण्याची प्रोव्हिजन आम्ही ठेवली नाही. निविदा काढल्यानंतर जो भाव घोषित केला होता त्याबद्दल मी अगोदरच सांगितले. तसेच टेंडर फायनल करतांना निगोशिएशन करुन 33-33 टक्के विभागून तीन कंपन्यांना देण्याचे ठरविले. असे निगोशिएशन करताना टेंडर कमिटीमध्ये जे सदस्य असतात ते कशा प्रकारे प्रेशर टॅक्टीज यूज करतात, कंपनीकडून भाव कमी करुन घेण्यासाठी कोणत्या प्रकारच्या टॅक्टीज वापरतात ते मी बोलू शकत नाही. 230 रुपयामध्ये मिनिमम भाव निश्चित करुन तीन कंपन्यांना हे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे.

......2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.37730..........**

श्री. संजय दत्त : महोदय, काल आपण या सभागृहात लक्षवेधी सूचनेवर चर्चा सुरु असताना राज्यातील भार नियमनाबाबत शासनाला काही सूचना केल्या होत्या आणि काल सायंकाळीच सभागृह संपण्यापूर्वी त्यासंबंधीचे उत्तर देण्यास सांगितले होते, पण अजूनही ते उत्तर आलेले नाही. राज्यात सर्वत्र दहावीच्या परीक्षा सुरु आहेत आणि मुलांचे हाल होत आहेत, म्हणून लोड शेडिंगसंबंधीच्या सूचना शासनाला द्याव्यात.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर यासंबंधी आपण विचार करु.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, माननीय मंत्री आणि मी यासंबंधीची कोणतीही दखल घेतली नाही. खरे म्हणजे माननीय मंत्री महोदयांनी या शब्दप्रयोगाऐवजी हस्तक्षेप असा शब्दप्रयोग केला असता तर ते जास्त संयुक्तिक ठरले असते.

श्री. दिलीप वळसे पाटील : आपण म्हणालात तसाच वाक्यप्रयोग हवा होता, माननीय राज्यमंत्री चुकून दखल घेतली नाही असे बोलले.

--------------

.........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक शहरात अनेक ठिकाणी वीज ग्राहकांना अंदाजे विजेची बिले पाठविल्याबाबत**

**(2) *39654 श्री. प्रतापराव सोनवणे, श्री. श्रीकांत जोशी, श्री.संजय केळकर, श्री. रामनाथ मोते, श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नाशिक शहरातील इंदिरानगर, राणेनगर परिसरातील श्रीजयनगर, साईनाथनगर, कमोदनगर, सुजितानगर, इ. कॉलनी व सोसायट्यांमधील अनेक घरे बंद आहेत, असे दाखवून अंदाजे 793 ग्राहकांना विजेची तात्पुरती व अंदाजे बिले देण्याच्या प्रकाराविरोधात महावितरण कंपनीच्या मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंत्यांकडे हजारो नागरिकांनी माहे जानेवारी, 2008 च्या पहिल्या वा दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास लेखी तक्रारी केल्या, हे खरे आहे काय,

(2) सदर प्रकरणी काय दखल घेण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(3) घरे बंद आहेत असे लिहून अंदाजे बिले पाठविणाऱ्या ठेकेदाराविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, का नाही ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (1) अंशत: हे खरे आहे. नाशिक शहर मंडळ कार्यालयांतर्गत येणाऱ्या नाशिक शहरातील इंदिरानगर व राणे नगर परिसरातील एकूण 20,130 ग्राहकांपैकी 905 ग्राहकांना डिसेंबर 2007 मध्ये "घर बंद आहे" या कारणास्तव सरासरीवर आधारित वीज देयक देण्यात आली आहेत. या पैकी एकूण 10 ग्राहकांनी अशा प्रकारच्या सरासरी वीज देयकाच्या बाबत दिनांक 14.12.2007 ते दिनांक 23.01.2008 या दरम्यान तक्रार केली आहे.

(2) सदर ग्राहकांनी केलेल्या तक्रारीची योग्य दखल घेण्यात आली असून या ग्राहकांना प्रत्यक्ष मिटर रिडींगच्या आधारे सुधारित देयक वितरीत करण्यात आले आहे.

(3) सदर परिसरातील मिटर वाचनाचे काम करणाऱ्या कंत्राटदारास शंभर टक्के योग्य रिडींग घेण्यास तसेच भविष्यात अश्या प्रकारची चूक न करण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे.

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, नाशिक शहरातील इंदिरानगर, राणेनगर परिसरातील श्रीजयनगर, साईनाथनगर, कमोदनगर, सुजितानगर, इ. कॉलनी व सोसायट्यांमधील अनेक घरे बंद आहेत, असे दाखवून अंदाजे 793 ग्राहकांना विजेची तात्पुरती व अंदाजे बिले

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रतापराव सोनावणे........ ता. प्र. क्र. 39654......

आकारल्याचे मंत्री महोदयांनी उत्तरातून मान्य केले आहे. यासंदर्भात तक्रारी करण्यासाठी वीज मंडळाच्या कार्यालयात गेलेल्या ग्राहकांना वीज मंडळाचे रिडींग घेणाऱ्या ठेकेदारांनी वीज मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊ दिली नाही व अधिकाऱ्यांनी देखील ग्राहकांशी चर्चा न करता या लोकांना परत पाठविले अशा तक्रारी अनेक ग्राहकांनी केल्या आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांनी ग्राहकाला आपला देव समजावा अशी भूमिका.........

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 39654 .........**

श्री. संजय केळकर ...

घेण्यास सांगितलेली आहे. त्यामुळे या तत्वाचा सर्व वीज मंडळाच्या अधिकारी आणि कर्मचा-यांनी अवलंब करण्याच्या संदर्भात सन्माननीय मंत्री ताकीद देतील काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ज्या वेळेला ग्राहक तक्रारी घेऊन येतात त्यावेळी अधिका-यांनी वीज ग्राहकांशी आदराने वागले पाहिजे तसेच त्यांच्या तक्रारीचे निवारण त्वरीत केले पाहिजे. मिटर रीडींग घेतांना ब-याच वेळा मिटर बंद असतो किंवा घर बंद असते तेव्हा अशा ग्राहकाला ॲव्हरेज बील दिले जात असते. सुरुवातील मिटर रीडर मिटरचे रीडींग घेत होते परंतु ग्राहकांना सोईचे व्हावे, तात्काळ बील मिळावे म्हणून स्पॉट रीडींगची पध्दत सुरु करण्यात आली होती. परंतु स्पॉट रीडींगमध्ये सुध्दा काही गैरप्रकार उघडकीस आले होते त्यामुळे स्पॉट रीडींगची पध्दत बंद करुन आता मिटरचा फोटो काढून वीज बिलावर छापण्याची पध्दत सुरु करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी तक्रार केलेली आहे त्यासंदर्भात तसे कोणी वागले असतील तर त्यांची गय केली जाणार नाही. या संदर्भात संपूर्ण चौकशी करुन कारवाई केली जाईल. वीज ग्राहकांशी कसे वागावे, त्यांच्या अडचणी कोणत्या प्रकारे सोडवाव्यात यासंदर्भात अगोदर सुध्दा सर्व अधिका-यांना सूचना देण्यात आल्या होत्या व पुढील काळात सुध्दा ग्राहकांशी चांगल्या प्रकारे वागण्याच्या संदर्भात सूचना दिल्या जातील.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, फोटो बील देण्याची पध्दत चांगली आहे. फोटो बील पध्दतीत गैरप्रकार होण्याची संख्या कमी होईल. सदरच्या प्रश्नाच्या 3 नंबरच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, सदर परिसरातील मिटर वाचनाचे काम करणा-या कंत्राटदारास शंभर टक्के योग्य रिडींग घेण्यास तसेच भविष्यात अश्या प्रकारची चूक न करण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे, असे म्हटलेले आहे. माझा प्रश्न हा आहे की, अशा प्रकारची ताकीद महाराष्ट्रातील सर्व भागातील कार्यालयांना देण्यात येईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : यासंदर्भातील सूचना सर्व भागात दिल्या आहेत आता पुन्हा दिल्या जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 39654** .........

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, वीज ग्राहकांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. आज सामान्य वीज ग्राहक लोडशेडींग आणि सरासरी वाढीव वीज बिलामुळे मेटाकुटीस आलेला आहे. रिडींग न घेता बील देण्याचे प्रकार सर्रास सगळीकडे सुरु आहे. त्यामुळे ग्राहकाला वेठीस धरण्याचे काम वीज मंडळाकडून सुरु आहे. बील जर वेळच्या वेळी मिळाले तर ग्राहक वीज बील भरु शकतो परंतु एकदम बील आल्यानंतर अधिका-यांकडून सांगितले जाते की, जेवढे बील आलेले आहे तेवढे बील प्रथम त्वरीत भरले पाहिजे. मी आपल्याला उदाहरण देतो की, ठाणे जिल्हयातील एका ग्रामीण भागातील आदिवासी कुटुंबाला 1 लाख रुपयाचे बील आले होते. आदिवासी माणूस एक लाखाचे बील कसे काय भरु शकणार आहे ? त्यामुळे ॲव्हरेज बील, वाढीव बील ठरावीक दिवसात ग्राहकाला भरण्याची संधी दिली तर तो हे बील भरु शकेल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी बाब सांगितलेली आहे ती तपासून घ्यावी लागेल. चुकीच्या बिलाच्या संदर्भात तक्रार आल्यानंतर त्या त्या विभागाने सदर तक्रारीचे निवारण 15 दिवसाच्या आत केले पाहिजे. 15 दिवसाच्या आत तक्रारीचे निवारण केले गेले नाही तर तेथील अधिक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता यांना जबाबदार धरुन कारवाई केली जाते.

श्री. केशवराव मानकर : वीज मंडळाची मिटर रिडींग घेण्याची पध्दत मोहम्मद तुघलकी पध्दती सारखी आहे. मिटर रिडींग न घेता 200 ते 500 युनीटची बिले पाठवली जातात. परंतु 100 युनीटसाठी वेगळे दर असतात, 100 ते 200 युनिटसाठी वेगळे दर असतात व 200 ते 500 युनीटसाठी जास्त दर असतात. त्यामुळे एकदम 500 युनीटचे बील भरायचे म्हटले तर त्यासाठी जास्त पैसे वीज ग्राहकाला भरावे लागतात. वाढीव बिलाचा फटका मला सुध्दा बसलेला आहे. मला सुध्दा 500 युनीटसाठी 4.75 रुपयांचा दर लावलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात चौकशी करुन ग्राहकांकडून जे जास्तीचे दर आकारले जातात ते कमी केले जातील काय?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 11.40

ता.प्र.क्र.39654....

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी जी भावना व्यक्त केली आहे त्या भावनेशी मी सहमत आहे. ज्यावेळी रेग्युलर बिलाचे रिडीग घेतले असते तर त्यामध्ये कदाचित कमी विजेचा वापर केल्यामुळे विजेच्या दरासाठी वेगळा स्लॅब लागला असता व त्याप्रमाणे बिल भरावे लागले असते. परंतु चार महिने बिलाचे रिडींग घेतले न गेल्यामुळे चार महिन्यानंतर जेव्हा बिलाचे रिडींग घेतले गेले तेव्हा युनिट वाढल्यामुळे वेगळा स्लॅब लागतो. त्यामुळे ग्राहकांचे आर्थिक नुकसान होते तेव्हा ग्राहकांचे आर्थिक नुकसान होऊ नये याची संपूर्ण काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी त्यांचा वैयक्तिक अनुभव सांगितलेला आहे त्यांचे बिल आणि इतर माहिती त्यांनी माझ्याकडे द्यावी. हा प्रश्न त्यांच्या एकटयाचा आहे असे नाही...

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी आमदार असल्यामुळे माझे विजेचे बिल कमी करुन देण्याची विनंती मान्य केलेली आहे.

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदवय, 2003 साली विजेचा कायदा मंजूर करण्यात आल्यानंतर एम.ई.आर.सी.ने स्टॅन्डर्ड ऑफ परफॉरमन्स बाबत काही गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. त्यानुसार ग्राहकांनी वेळेवर विजेचे बिल भरले नाही तर त्याचे विजेचे कनेक्शन कट करण्याचा अधिकार ज्याप्रमाणे वीज वितरण कंपनीला आहे त्याचप्रमाणे ग्राहकाचे प्रश्न वेळेत सोडविण्यात आले नाही तर संबंधित अधिकाऱ्याना दंड करण्याची तरतूद देखील स्टॅन्डर्ड ऑफ परफॉरमन्स बाबत दिलेल्या गाईडलाईन्समध्ये आहे. अर्थात या संदर्भात ग्राहकांची जनजागृती केली पाहिजे. ग्राहकाच्या हिताच्या दृष्टीने ज्या नवीन नवीन तरतुदी केल्या जातात त्यासंबंधीचा अभ्यास करुन ग्राहकांना मार्गदर्शन करुन या ऑर्गनायझेशनमधील सिस्टीम सुधारण्याच्या दृष्टीने आपल्या सर्वांना एकत्रितपणे प्रयत्न करावा लागेल आणि माझा तसा प्रयत्न आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आरोग्य विभागाच्या जीवनदायी योजनेच्या अंतर्गत परळच्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलने राज्यातील गरीब रूग्णावरील उपचार थांबविल्याबाबत**

**(३) * ३७९०७ श्री. प्रकाश शेंडगे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुधाकर गणगणे , श्री.सय्यद जामा , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री.राजन तेली :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब रूग्णासाठी आरोग्य विभागाच्या जीवनदायी योजनेच्या अंतर्गत परळच्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलने गेल्या एक वर्षात १८५ कॅन्सर रूग्णांवर उपचार केल्याचे २० लाख रूपयांचे बिल शासनाने अद्याप दिले नसल्याने टाटा रूग्णालयाने जीवनदायी योजनेअंतर्गत कॅन्सर रूग्णावर उपचार करण्याचे थांबविले असल्याचे माहे जानेवारी, २००८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटा रूग्णालयांची २० लाख रूपयांची थकलेली बिले त्वरीत देण्याबाबत तसेच गरीब रूग्णांवर जीवनदायी योजनेअंतर्गत थांबविण्यात आलेले उपचार पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच बिल न देण्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे,डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) टाटा रुग्णालय, मुंबई याची १४८ बिलांवरील रुपये १७,७८,२०४/- एवढी रक्कम दिनांक २२.१.२००८ रोजी धनादेशाद्वारे अदा केली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..



VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने 1999 साली गरीब कुटुंबातील लोकांच्या दुर्धर आजारावर उपचार करुन घेण्यासाठी 250 कोटी रुपयांची जीवनदायी योजना घोषित केली होती. 1999 सालापासून आतापर्यंत या योजनेसाठी निधी देण्यास मात्र सरकारला विसर पडलेला आहे त्यामुळे. टाटा मेमोरियल हॉस्पिटलने गरीब रुग्णांवर उपचार करण्याचे थांबविले आहे. या योजनेसाठी जर शासनाजवळ पैसे नसतील तर ही योजना बासनात गुंडाळण्यात आली असून या योजनेसाठी शासनाकडे पैसे नाहीत असे एकदा शासनाने जाहीर करुन टाकावे. टाटा मेमोरियल हॉस्पिटलने 185 कॅन्सर रुग्णांवर उपचार केले असून त्यांचे बिल एक वर्ष शासनाने पेडीग ठेवलेले आहे तेव्हा हे बिल पेन्डीग ठेवण्याचे कारण काय आहे ? त्याचप्रामाणे 1999 साली 250 कोटी रुपयाची ही योजना जाहीर करण्यात आल्यानतर त्या वर्षी 14 कोटी रुपयांची तरतूद केली होती आणि दर अर्थसंकल्पामध्ये 5 कोटी रुपयांची तरतूद केली जात आहे. गेल्या सात आठ वर्षापासून हाच प्रकार सुरु आहे तेव्हा या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये 250 कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या संदर्भात वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या आधारे त्यांनी हा प्रश्न विचारलेला आहे. एप्रिल ते नोव्हेंबर 2007 या कालावधीतील बिलाचा त्या बातमीत उल्लेख केला होता. टाटा मेमोरियल हॉस्पिटलने एक बिलाचा बंच पाठविला होता. ते आम्हाला दर महिन्याला बिले पाठवत नाही. 17 लाख रुपयांचे बिल पेडीग होते आणि बिलाचा बंच पाठविण्यात आल्यामुळे पुढच्या महिन्यात त्याचे पेमेट केले गेले. त्यानंतर फेब्रुवारी ते डिसेंबर या कालावधीतील 3 लाख 40 हजार रुपयांचे एक बिल त्यांनी पाठविले होते आणि 31 मार्चच्या अगोदर त्याचे पेमेन्ट करण्यात येणार आहे. त्यामुळे टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे कोणतेही बिल पेडीग राहिलेले नाही. टाटा मेमोरियल हॉस्पिटलने पाठविलेले एक पत्र माझ्याकडे असून त्यात त्यांनी असे म्हटलेले आहे की, " This is with reference to letter dated 30.11.2007 regarding the extension of credit facility under Jeevandayi Health Scheme, the Credit facility under this Scheme is in existence and it was never suspended."

नंतर श्री.सुंबरे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : 9 जानेवारीला वृत्तपत्रात ही बातमी आल्यानंतर तुम्ही लगेचच पैसे अदा करण्याची कारवाई केलेली आहे ते आपण सांगा ना.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, या टाटा मेमोरिअल हॉस्पिटलने एका सिंगल बंचमध्ये ही सारी बिले आपल्याकडे पाठविलेली आहेत. या हॉस्पिटलकडून दरमहा बिले पाठविली जात नाहीत. रूटीनमध्ये दरमहा बिले आल्यानंतर आम्ही ती लगेचच अदा करीत असतो पण या हॉस्पिटलकडून तशा प्रकारे दरमहा बिले न येता एकदम सिंगल बंचने बिले एकत्रित पाठविली जातात. त्यांच्याकडून बिले आल्यानंतर लगेचच महिन्याच्या आत आम्ही त्यांना त्यांचे पैसे दिलेले आहेत. सभापती महोदय, टाटा मेमोरिअल हॉस्पिटल ही एक देशातील चांगली संस्था आहे आणि तेथे अल्पभूधारक तथा बीपीएल खालील लोकांवर चांगल्या प्रकारे उपचार केले जातात असे असताना आम्ही त्यांचे पैसे कशासाठी देणार नाही ? किंबहुना आम्ही त्यांच्याकडून आलेली बिले प्राधान्याने अदा करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जीवनदायी योजना आपली ठरलेली आहे परंतु तरीही त्यासाठी पुरेशी तरतूद मूळ बजेटमध्ये न करता दरवेळी पुरवणी मागण्यांमधून रक्कम घेतली जाते. तेव्हा आपण मूळ बजेटमध्ये यासाठी पूर्ण तरतूद का करून घेत नाही ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, जीवनदायी योजनेमध्ये जेवढे रूग्ण येतील त्यांचे क्वांटम ठरवून मग बजेटमध्ये फिक्स निधी उपलब्ध करून दिला जातो आणि त्यापेक्षा जास्त निधी लागला तर पुरवणी मागण्यांतूनच रक्कम उपलब्ध करून देण्याची आपली नेहमीचीच पद्धत आहे त्यात गैर काही नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या योजनेसाठी 14 कोटीची तरतूद केलेली आहे आणि त्यापेक्षा जास्त गरज भासली तर पुरवणी मागण्यामधून ती पूर्ण केली जाईल. त्यात कोठलीही कमतरता भासणार नाही.

***

..... जे 2 ...



**कोल्हापूर, अंबाई टँक येथील अनंत हॉस्पीटलमध्ये एका गर्भवती महिलेचा डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या मृत्यूबाबत**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(4) * 40301 **श्री. सुरेशदादा देशमुख, श्री. संजय दत्त, श्री. गोविंदराव आदिक, श्री. शरद रणपिसे** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर, अंबाई टँक येथील अनंत हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आलेल्या एका गर्भवती महिलेचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याची घटना दिनांक 16 डिसेंबर, 2007 रोजी उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर डॉक्टरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (1) कोल्हापूर येथील अंबाई टँक येथील अनंत हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आलेल्या श्रीमती माधुरी मदन पाटील या गर्भवती महिलेचा दिनांक 15.12.2007 रोजी मृत्यू झाला.
(2) होय.
(3) जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार डॉक्टरांनी केलेले उपचार योग्य असल्यामुळे डॉक्टरांविरुध्द कारवाई करण्यात आली नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मला या लेखी उत्तरात एक छोटीशी दुरूस्ती करावयाची आहे. उत्तराच्या भाग 1 मधील 'गर्भवती' हा शब्द वगळण्यात यावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, श्रीमती माधुरी मदन पाटील या महिलेवर केलेले उपचार योग्य होते तर त्यांचा मृत्यू कोणत्या कारणांनी झालेला आहे आणि त्याबाबत पोस्टमार्टेम करण्यात आले होते काय ? असल्यास, त्याचा अहवाल काय आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, श्रीमती माधुरी मदन पाटील ही रूग्ण महिला 14.12.2007 रोजी युट्रेसीसच्या ऑपरेशनसाठी या रूग्णालयात भरती झाली होती आणि ऑपरेशन टेबलवरच तिचा मृत्यू झाला असून तिच्या बॉडीचे पोस्टमार्टेम झाले असून व्हिसेराची देखील तपासणी झालेली आहे. त्याचा एस्टोपॅथिक अहवाल आला असून त्यातून तिचा मृत्यू मेडिकल निग्लिजन्समुळे झाला असल्याचे दिसून आलेले नाही. सदरच्या अहवालात म्हटलेले आहे की," Cause of Death- Cardiac shock leading to pulmonoria.."

.... जे 3 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 40301 ....

या बाबतीत आम्ही डॉ.राठोड यांच्या अध्यक्षतेखाली चार लोकांची समितीदेखील नेमली होती आणि त्या समितीचा अहवाल आला असून त्यामध्ये देखील डॉक्टरी उपचारामध्ये कोणताही निष्काळजीपणा झालेला नाही असे म्हटलेले आहे.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, या महिलेवर जे उपचार करण्यात आले त्याची माहिती येथे मिळेल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ही महिला युट्रेसीसच्या ऑपरेशनसाठी या हॉस्पिटलमध्ये दाखल झाली होती आणि तिला ऑपरेशन टेबलवर घेऊन तिला ॲनेस्थेशिया दिल्यावर तिचे ब्लडप्रेशर एकदम खाली गेले आणि हार्टस्ट्रोकस् स्लो होऊन तिचा ऑपरेशन टेबलवरच मृत्यू झालेला आहे. त्यानंतर याबाबत पोलीस कारवाई झाली. पोलीस तपासणी झाल्यानंतर, हॉस्पिटलमध्ये पोलिसांनी तक्रार दिल्यानंतर आपण 6 लोकांची एक समिती नेमून याबाबत चौकशी केली आणि सदरहू महिलेच्या बॉडीचे पोस्टमार्टेम केल्यानंतर जो हिस्टोपॅथिक रिपोर्ट आला त्यामध्येही असे दिसून आले आहे की, त्यामध्ये कोणत्याही प्रकारे मेडिकल निग्लिजन्स झालेला नाही. ऑपरेशन टेबलवर ॲनेस्थेशिया दिल्यावर हार्टबिटस् विक होऊन रेअर केसमध्ये अशा प्रकारे रूग्णाचा मृत्यू होऊ शकतो. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे देखील या मताशी सहमत होतील.

***

( यानंतर श्री. सरफरे .... के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसंचालक व्यवसाय व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय**

**नागपूर यांचे कार्यालयातील प्रलंबित समस्या**

**(५) * ३७३९६ श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे : तारांकित प्रश्न क्रमांक २९४३१ ला दिनांक ३१ जुलै, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील एम.सी.व्ही.सी.व द्विलक्षी अभ्यास क्रमाकडील शिक्षक, निदेशक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन नियमित १ तारखेला अदा करणे, वैद्यकिय परिपूर्तीची देयके मंजूर करणे व इतर ३१ प्रकरणे निकाली काढण्या बाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, या संबंधी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (१) एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाकडे शिक्षक, निदेशक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन १ तारखेला होण्याकरीता व्यवसाय शिक्षण संचालनालयाचे पत्र दि.५.११.२००७ व दि.२१.२.२००८ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

नागपूर विभागातील ३१ वैद्यकीय परिपूर्तीच्या देयकांपैकी ३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. इतर प्रकरणे त्रूटींची पूर्तता करण्याकरीता संस्थेस परत करण्यात आली आहेत.

(२) प्रश्न उ्भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. नागपूर विभागामध्ये वेतन किती विलंबाने दिले जाते या संदर्भात हा प्रश्न विचारला आहे. याठिकाणी म्हटले आहे की, वेतन १ तारखेला देण्यासाठी दि. ५.११.२००७ ला आणि २१.२. २००८ ला पत्र पाठविले होते. शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन विलंबाने होणे ही शोकांतिका आहे. नागपूर जिल्हयामध्ये जानेवारी-फेब्रुवारी महिन्याचे वेतन दिले नाही. मार्च २००७ पासून डिसेंबर २००७ पर्यंत अनियमित वेतन दिल्यामुळे या कर्मचाऱ्यांवर जादा व्याजाचा भुर्दंड पडत आहे. तेव्हा वेतनाच्या विलंबाची कारणे शोधून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करणार काय? आणि यापुढे अजिबात विलंब न होता दर महिन्याच्या एक तारखेला वेतन होईल यासंबंधी काळजी घेणार काय? त्याचप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र. ३७३९६... श्री. व्ही. यू. डायगव्हाणे....

संघटनेने दिलेल्या निवेदनामधील ३१ प्रकरणांसंबंधी उत्तर देण्यात आले नाही. तसेच, या संदर्भात संचालकांच्या व सचिवांच्या पातळीवर या संघटनेबरोबर बैठक आयोजित करणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेले खरे आहे. आपण ट्रेझरीव्दारे बॅंकेकडे चेक पाठवितो. परंतु प्रत्यक्ष पेमेंट होतांना खूप विलंब होतो. त्यामध्ये एक-दोन महिन्यांचा गॅप होतो. याबाबत मी सकाळी अधिकाऱ्यांबरोबर बसून चौकशी केली असता हे खरे असल्याचे समजले. याकरिता आपल्याला ही सिस्टीम दुरुस्त करावी लागेल आणि दुसरी सिस्टीम फॉलो करावी लागेल. याबाबत आम्ही बॅंक ऑफ महाराष्ट्रला सूचना दिल्या आहेत. आम्ही ट्रेझरीमधून बॅंकेकडे डायरेक्ट चेक पाठवितो, त्यानंतर ते चेक कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक खात्यामध्ये जमा होतात. आता इंस्टिटयुशन, कॉलेजमध्ये बॅंकेमधून पैसे जातात व त्याठिकाणाहून पुन्हा कर्मचाऱ्यांच्या नावाने चेक काढून बॅंकेकडे पाठविले जातात ही सिस्टीम आपल्याला दुरुस्त करावी लागेल. या अधिवेशन काळात याबाबत बैठक घेऊन सिस्टीममध्ये योग्य ती दुरुस्ती करु. याबाबत आम्ही कधीही बैठक घेण्यास तयार आहोत.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी मोघम उत्तर देऊ नये. बैठक घेण्याकरिता आम्ही अनेक वेळा मागणी केली आहे.

श्री. सुरेश शेट्टी : पुढील आठवडयात बैठक घेऊ.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, शासन निर्णयाने नियमित वेतन देण्याची पध्दत निर्माण करण्यात आली आहे. तरीसुध्दा याठिकाणी आपले अधिकारी बेजबाबदारपणे काम करीत आहेत हा भाग वेगळा. या प्रश्नाचे उत्तर देत असतांना दोन परिपत्रके काढली एवढेच उत्तर दिले आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन १ तारखेला होते की नाही याबाबत उत्तर दिले नाही. मी आपले एका गोष्टीकडे लक्ष वेधतो त्याबाबत काय स्थिती आहे याचे उत्तर आपणाकडून आले पाहिजे. आम्ही केलेल्या तक्रारीबाबत उत्तर दिले नाही. फक्त दोन आदेश दिले आहेत. मला आपणाकडून दोन प्रश्नांना उत्तरे पाहिजेत. एक तारखेला वेतन अदा करण्याबाबत प्रत्यक्ष स्थिती काय आहे? आणि जे जबाबदार आहेत त्यांच्यावर काय कारवाई केली आहे किंवा करण्यात येणार आहे?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, वेतन वेळेवर मिळत नाही हे मी मान्य करतो. काही ठिकाणी एक महिना तर काही ठिकाणी दोन महिने विलंबाने होते. सद्याच्या सिस्टीममुळे हा विलंब होतो. त्यामध्ये कुणीही अधिकारी जबाबदार नाही. ट्रेझरीमधून एकरकमी चेक पाठविला जातो, तो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र. ३७३९६...

श्री. सुरेश शेट्टी....

बँकेमधून काढून त्याचे पुन्हा ५०-६० चेक तयार करुन ते पाठविले जातात. या प्रोसेसमुळे वेळ लागतो.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : इतर विभागामध्ये विलंब होत नाही. शालेय शिक्षण विभागामध्येच हा विलंब कां होतो?

श्री. सुरेश शेट्टी : शालेय शिक्षण विभागामध्ये काही बँकाबरोबर टाय अप केले आहे. ट्रेझरीकडून बँकेकडे पैसे जातात. उदा. बँक ऑफ महाराष्ट्रकडून डायरेक्ट वैयक्तिक खात्यामध्ये हे पैसे डिपॉझीट होतात असे सांगितले. तेव्हा एकत्रित बसून या सिस्टीममध्ये दुरुस्ती करण्यात येईल.

-------

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:55

**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या धर्तीवर निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत**

**(6) * 38643 श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. सुधाकर गणगणे : तारांकित प्रश्न क्रमांक 34013 ला दिनांक 29 नोव्हेंबर, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील कर्मचाऱ्यांना शासनाच्या धर्तीवर निवृत्ती वेतन योजना लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(3) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(4) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (1) होय.

(2),(3) व (4) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला सदनाच्या निदर्शनास एक महत्वाची बाब आणून द्यावयाची आहे. मागच्या वर्षी हाच प्रश्न दि.24 जुलै 2007 रोजी विचारला होता. त्यानंतर दि.29 नोव्हेंबर 2007 रोजी देखील विचारला होता. त्यावेळी शासनाने जे उत्तर दिले होते, नेमके तेच उत्तर आज विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात दिलेले आहे. त्यामध्ये काडीमात्र फरक पडलेला नाही. मला माननीय मंत्री महोदयांकडून माहिती हवी आहे की,शासनाकडे सदरहू प्रस्ताव केव्हा पासून विचाराधीन आहे ? तसेच या प्रस्तावाचे मूळ स्वरुप काय आहे ? या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी किती वेळ लागणार आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू व्हावी अशा प्रकारची त्यांची बऱ्याच वर्षापासूनची मागणी असून, ती प्रलंबित आहे. याबाबतीत अनेक वेळेला चर्चा देखील झालेली आहे. यासंबंधात त्यांनी वेळोवेळी संपाव्दारे आपल्या भावना देखील व्यक्त करण्याचा मार्ग पत्करला होता. यासंदर्भात माननीय उप मुख्यमंत्री आणि मी स्वत:, अशी दोघांनी मिळून या कर्मचाऱ्यांच्या युनियन बरोबर डिसेंबर 2006 मध्ये चर्चा झाली होती. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी आपला संप मागे घेण्याचे ठरविले. त्या चर्चेमध्ये असे ठरले होते की, यासंबंधात आपण होल्डींग कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केलेली होती.त्या समितीला काही गोष्टी तपासण्याबाबत सांगितले होते. तसेच कर्मचाऱ्यांनी

. . . .एल-2

ता.प्र.क्र.38643 . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

राज्य शासनाला जी निवृत्ती वेतनाची योजना सादर केलेली आहे, ती त्यांची मागणी एम.एस.ई.बी. अस्तित्वात होती, तेव्हापासून आहे. नंतर एम.एस.ई.बी.चे बायफरकेशन करुन तीन वेगवेगळया कंपन्या स्थापन केल्यानंतर सुध्दा त्यांच्या मागण्या कायम आहेत. एका बाजूला राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने नवीन येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना असू नये असा निर्णय घेतला आहे. या सर्व बाबी कमिटीसमोर गेल्या. याबाबत कमिटीने विचार केला. तसेच पुन्हा ही केस हाय कोर्टामध्ये गेली. यासंबंधात माननीय उच्च न्यायालयाने निदेश दिले की, राज्य शासनाने कर्मचाऱ्यां- बरोबर चर्चा करावी. त्याप्रमाणे आम्ही चर्चा देखील केली आहे. त्यानंतरच याबाबतचा प्रस्ताव तयार करुन तो राज्य शासनाकडे सादर केलेला आहे. राज्य शासनाने सुध्दा यावर अभ्यास करुन ही बाब मंत्रिमंडळासमोर सादर करावयाची आहे. अजूनपर्यंत मंत्रिमंडळ स्तरावर याबाबतीत निर्णय होऊ शकलेला नाही. हा विषय मंत्रिमंडळासमोर जाण्यापूर्वी एकदा माननीय मुख्यमंत्र्यांच्या लेव्हलवर चर्चा व्हावी लागेल आणि मग त्यानंतर ही बाब मंत्रिमंडळापुढे जाईल. त्यामुळे जोपर्यंत याबाबतीत मार्ग निघत नाही, तोपर्यंत याठिकाणी तेच उत्तर असणार आहे. पण याचा अर्थ खालच्या लेव्हलवर काही हालचाल झालेली नाही, काही विचार झालेला नाही अशी परिस्थिती नाही. यासाठी वेळ लागणार आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 1983 च्या पूर्वी खाजगी कॉलेज अस्तित्वात नसताना स्वत:च्या गुणवत्तेवर इंजिनिअर झालेले अनेक लोक आहेत. असे लोक एम.एस.ई.बी.मध्ये नोकरी करीत असल्याने आणि आता होल्डींग कंपनीमध्ये आल्यामुळे, त्यांच्यामध्ये अशी भावना निर्माण झ ाली आहे की, आपल्यावर फार मोठा अन्याय झालेला आहे.खरे म्हणजे नवीन पेन्शन योजना येण्यापूर्वी या सदनामध्ये माननीय माजी ऊर्जा मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांनी असे जाहीर केले होते की, आम्ही त्यांना ही योजना लागू करु. पण नंतर माननीय मंत्री महोदय बदलण्यात आले. या विषयाच्या बाबतीत शासनाने अतिशय सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची गरज आहे. याचे कारण म्हणजे या कर्मचाऱ्यांचा गट सर्व लाभापासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, जो प्रस्ताव तयार केला आहे, तो पहिल्या योजनेच्या अनुषंगाने तयार केलेला आहे की नवीन पेन्शन योजनेच्या अनुषंगाने तयार केलेला आहे ? तसेच या विषयाच्या .....

. . . .एल-3

बाबतीत निर्णय घेण्यासाठी काही कालमर्यादा घालून दिली पाहिजे. हा विषय अमर्याद काळपर्यंत तसाच राहू शकत नाही. नाहीतर माननीय मंत्री महोदयांनी म्हटल्याप्रमाणे जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत येथे असेच उत्तर राहणार आहे. त्यामुळे यासंबंधात कालमर्यादा घातली पाहिजे, तशी ती घालणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पेन्शनच्या संदर्भात जी योजना दिलेली आहे, ती मान्य करता येत नाही ही बाब राज्य शासनाने त्यांच्या संघटनांकडे वेळोवेळी स्पष्ट केलेली आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38643 ...... श्री. दिलीप वळसे-पाटील ....

त्यामध्ये त्यांना पर्यायी योजना देण्यास सांगितले होते. कर्मचारी संघटनेने अजूनही पर्यायी योजना सादर केलेली नाही. ते मूळ योजनेवरच आहेत. यासंदर्भात जी योजना राज्य सरकारने आधी ऑफर केली होती त्याला कर्मचारी संघटनेची मान्यता नाही. यासंदर्भात सगळी वस्तुस्थिती मंत्रिमंडळासमोर आणून याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाने घेणे अभिप्रेत आहे. ही बाब लवकरात लवकर मंत्रिमंडळाच्या समोर जाऊन त्यावर योग्य तो निर्णय होईल. तो निर्णय झाल्यानंतर सभागृहाला अवगत करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही बाब विचाराधीन आहे असे म्हटले आहे. ज्या विभागामध्ये पेन्शनचा प्रश्न आहे त्या खात्याचे शासन वेगळे असते आणि अर्थखात्याचे शासन वेगळे असते. एकत्रित शासनाकडे ही बाब विचाराधीन आहे काय ? एखादे प्रपोजल पाठविल्यानंतर वित्त व नियोजन विभाग नाही म्हणतात. अमुक तारखेनंतर पेन्शनचे कोणतेही प्रकरण मान्य करावयाचे नाही असा कॅबिनेटचा निर्णय आहे असे सांगतात. म्हाडा, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे स्वत:चे पैसे आहेत आणि त्या पैशामध्ये पुढची 42 वर्षे त्या ठिकाणी पेन्शन देता येऊ शकेल. त्यामध्ये काही अडचण नाही. परंतु सरकारचे अर्थखाते कॅबिनेटचा निर्णय आहे त्यामुळे होणार नाही असे सांगून मोकळे होतात. मागचा जो निर्णय आहे त्याचा फेरविचार करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, वेळोवेळी जी चर्चा झालेली आहे, ज्या गोष्टी समोर आलेल्या आहेत त्याची संपूर्ण परिस्थिती आम्ही मंत्रिमंडळासमोर मांडू. शेवटी याचा निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावयाचा आहे.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**नागपूर येथील मेयो रूग्णालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या ५० लाख रूपयाच्या घोटाळयाबाबत**

**(७) * ३७७५८ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मेयो रूग्णालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी रूग्णांच्या उपचारासाठी राज्यशासनाकडून मिळणाऱ्या निधीतून ५० लाख रूपयाचा घोटाळा केल्याची धक्कादायक बाब दिनांक ११ डिसेंबर, २००७ च्या सुमारास उजेडात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने निधीचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे पाटील यांच्याकरिता** : (१),(२) व (३) सप्टेंबर, २००७ मध्ये वैद्यकीय शिक्षण संचालकांनी केलेल्या अंतर्गत लेखा परिक्षणात संस्थेत रु. ४९,७२,२८९/- इतक्या रकमेचा सकृतदर्शनी अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. याअनुषंगाने दिनांक २१ नोव्हेंबर, २००७ च्या आदेशान्वये संबंधित अधिव्याख्याता (सांख्यिकी), प्रशासकीय अधिकारी व रोखपाल यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांच्या विरुध्द तहसील पोलीस स्टेशन, नागपूर येथे भा.दं.वि.क. ४०९, ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, रुग्णांच्या उपचारासाठी जे पैसे आलेले होते त्यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. नागपूर येथील मेयो हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी शासनाकडून जी औषध खरेदी होते त्याच्या बाबतीत आजपर्यंत शासनाकडे तक्रारी आलेल्या आहेत काय ? त्या ठिकाणी रुग्णांना औषध न देता ते दुकानदारांना दिले जाते आणि रुग्णांना बाहेरुन औषध घेण्यास सांगितले जाते. मेयो हॉस्पिटल हे मोठे हॉस्पिटल आहे. शासनाकडे यासंदर्भात तक्रार आली आहे काय आणि त्याबाबतीत काय चौकशी झाली ?

श्री. सुरेश शेट्टी : अजून तक्रार आलेली नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ता. प्र. क्र. 37758 ......

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, त्या ठिकाणी 50 लाखाचा घोटाळा झाला हे मान्य केलेले आहे. आपण त्या त्या हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे काही फंड देतो. त्यासाठी आपल्याकडे एखादी मॉनिटरींग सिस्टीम आहे काय ? असे घोटाळे नेहमी होत असतात. या ठिकाणी 50 लाखाचा घोटाळा झालेला आहे. आपण त्यांच्याकडे जो पीएल फंड देता त्यासाठी आपल्याकडे मॉनिटरींग सिस्टीम आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपण प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये पीएलएफ मेन्टेन करतो. त्याचे अकाऊंट आणि कॅशबूक असते. त्याचे दरवर्षी अंतर्गत लेखापरीक्षण होत असते तसेच महालेखापालांकडून सुध्दा लेखापरीक्षण होते. हा जो घोटाळा झालेला आहे तो अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये सापडलेला आहे. यामध्ये जे तीन अधिकारी जबाबदार होते त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. पोलिसांकडे एफआयआर दाखल केलेला आहे आणि चौकशी चालू आहे. ही बाब 50 लाखापर्यंत थांबलेली नसून ती हळूहळू पुढे जात आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी या पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील इंडोरामा कंपनीच्या एका गोदामाला लागलेली आग**

**(८) * ३८५२० डॉ. वसंत पवार , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जामा , श्री. सुधाकर गणगणे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी या पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील इंडोरामा कंपनीच्या एका गोदामाला दिनांक ३ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत किती प्राणहानी व वित्तहानी झाली आहे ?

**श्री.बाबा सिद्दीकी, श्री.गणेश नाईक यांच्यकरिता** : (१) बुटीबोरी जि.नागपूर या औद्योगिक क्षेत्रातील इंडोरामा सिंथेटीक्स (इं.) लिमिटेड, प्लॉट क्र.ए-३१, येथे दिनांक २.०१.२००८ रोजी सायंकाळी ५.१५ सुमारास भीषण आग लागली, हे खरे आहे.

(२) या आगीत प्राणहानी झालेली नाही. आगीमुळे सुमारे २५ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या गोदामाला आग लागण्याचे कारण काय आणि याप्रकरणी चौकशी करण्यात आली होती काय, असल्यास प्राथमिक चौकशीमध्ये काय आढळून आले आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, रिपोर्ट में प्रायमाफेसी रुप से यह बात सामने आई है कि इलेक्ट्रिकसिटी के शॉर्ट सर्किट की वजह से यह आग लगी है.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा पदे अनारक्षित केल्या प्रकरणी योग्य तो लाभ देण्याची कारवाई न होणे**

**(९) * ३७६३७ डॉ. एन. पी. हिराणी , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे : दिनांक २९ नोव्हेंबर २००७ रोजी सभागृहराच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सोळाव्या यादीतील प्रश्न क्रमांक २९३५५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघांच्या ( नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनात नमुद असलेल्या प्रस्तावा संदर्भात पदे अनारिक्षित करून संबंधितांना सेवा सातत्याने लाभ लागू करण्याबाबत शासनाने दिलेल्या आदेशाबाबत सहसंचालक व कुलसचिव यांनी आजपावेतो कोणतीही कारवाई केलेली नाही हे खरे आहे काय,
(२) कार्यवाही झालेली असल्यास, याबाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता शासनाने केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,
(३) कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) नाही.
(२) अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनास पाठविण्यांत आले आहेत. अशा सर्व अधिव्याख्यात्यांना विद्यापीठाद्वारे onwards approval देण्यांत आलेले आहे.
सहसचिव, नागपूर विद्यापीठ संघटना यांच्या दि.३० मे, २००५ रोजी दिलेल्या निवेदनातील अधिव्याख्यात्यांना सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, उत्तराच्या भाग दोनमध्ये 'सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे असे उत्तर देण्यात आले आहे. खूप विलंबाने का होईना ही कार्यवाही झाली आहे असे शासनाचे म्हणणे आहे, त्याबद्दल धन्यवाद. ही कार्यवाही केव्हा झाली आणि झालेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डिरिझर्व्हेशनचा प्रस्ताव होता....

३....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभागृहाचा वेळ जाऊ नये म्हणून मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो. डिरिझर्व्हेशनच्या बाबतीत आपण सांगितले की, विद्यापीठाला त्याबाबत अधिकार दिले होते. ती पदे खुल्या प्रवर्गातील आहेत असे शासनाने सांगितले आहे. तो प्रश्न आता मिटला आहे. मूळ मुद्दा पुढे आहे. हायकोर्टाने आदेश दिले होते की, डिरिझर्व्हेशन झाल्यानंतर त्यांना सेवासातत्याचे जे लाभ आहेत, मुख्य म्हणजे त्यांचे प्लेसमेंट १५ दिवसात करावे. त्याला २-३ वर्षे झाली आहेत. यामध्ये असे उत्तर दिले आहे की, सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, अमरावती यांनी केली आहे. ती कोणत्या तारखेला केली आणि कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ? मी पॉईन्टेड प्रश्न विचारलेला आहे, त्याला पॉईन्टेड उत्तर आले पाहिजे. नोटीसच्या बाहेर मी विचारत नाही.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यासंबंधीची कार्यवाही झालेली आहे. ही कार्यवाही कोणत्या तारखेला केली आहे त्याबाबतची वस्तुस्थिती सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : हे प्रकरण हायकोर्टामध्ये गेले होते. हायकोर्टाने आदेश देऊन अनेक वर्षे झाली, अनेक अधिवेशने झाल्यानंतरही आदेश मानण्यात आले नाहीत. त्यानंतर माननीय सभापतींनी बैठक घेतली होती. हायकोर्टाचे असे स्पष्ट आदेश आहेत की, डिरिझर्व्हेशन करावे. तरीही शासनाने डिरिझर्व्ह केले नाही, परंतु विद्यापीठाला शासनाने सांगितले होते. त्यानंतर विद्यापीठाने पत्र दिले की, ही पदे जनरलची आहेत, त्यामुळे ही पदे डिरिझर्व्ह झाली. त्यानंतर पुढील कार्यवाही झाली किंवा नाही याची माहिती घेण्यासाठी आम्ही हा प्रश्न विचारलेला आहे. आता आपण सांगत आहात की, कार्यवाही झालेली आहे. ती कोणत्या तारखेला झाली ते सांगावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : यासंबंधी विद्यापीठ स्तरावर रोस्टर मेंटेन झाले पाहिजे होते ते त्यांनी व्यवस्थितपणे मेंटेन केले नव्हते. विद्यापीठाने या नेमणुका करताना राखीव पदांच्या अगेंस्ट करीत आहोत अशाप्रकारची पहिल्यापासून भूमिका घेतली होती. विद्यापीठाने चुकीची भूमिका घेतली आहे असे आग्रहाने सभागृहात मांडण्यात आले होते. शासनाची यासंबंधीची भूमिका स्पष्ट होती. आता कोर्टकचे-या झाल्या आहेत. त्यासंबंधीचा निर्णय आलेला आहे. विद्यापीठाने असे कळविले आहे की, ती पदे राखीव पदांच्या अगेंस्ट दाखवित होतो आता आमचे रोस्टर दुरुस्त झालेले आहे....

४....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७६३७.....

प्रा.बी.टी.देशमुख : मंत्रिमहोदय, आपण हे सर्व मागील इतिहास सांगत आहात.

श्री.दिलीप वळसे-पाटील : मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. यासंबंधी विद्यापीठानेच कळविले आहे की, ही राखीव पदे नाहीत. त्यामुळे ही पदे अनारक्षित करण्याची आवश्यकता नाही. ओपन पदाच्या अगेंस्ट जर या नेमणुका झाल्या असतील त्यासंबंधीची बाब शासनाला विद्यापीठाने कळविल्यानंतर शासनाने त्यासंबंधीचा निर्णय घेतला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण हे उत्तर वाचावे. प्रश्न विचारल्यानंतर कारवाई केली आहे असे म्हटलेले आहे. कोणत्या तारखेला कार्यवाही केली आणि काय कार्यवाही केली या सोप्या प्रश्नाचे उत्तर देता येत नसेल तर आपण हा प्रश्न राखून ठेवावा. अनेकदा नोटीसच्या बाहेर जाऊन शेकडो प्रश्न विचारले जातात. या क्षणापर्यंत हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी झ ालेली नाही. आदेशाची अंमलबजावणी झाली असे मंत्रिमहोदय म्हणत आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 'सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे.' आमच्यादृष्टीने हा प्रश्न संपला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:10

(ता. प्र.क्र. 37637......) (प्रा. बी.टी.देशमुख....)

ही कारवाई कोणत्या तारखेला केली आणि काय कारवाई केली ? या दोन प्रश्नांची उत्तरे देता येत नसतील तर हा प्रश्न राखून ठेवून तो पुढील आठवड्यात घ्यावा.

श्री. दिलीप वळसे-पाटील : उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक 4 नोव्हेंबर 2006 रोजी पत्र पाठविले...

प्रा. बी. टी.देशमुख : उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पाठविलेल्या पत्राचे कौतुक सांगू नका. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी सेवासातत्याचे लाभ देण्याची कार्यवाही केली आहे. ही कारवाई कोणत्या तारखेला केली आणि काय कारवाई केली, या दोन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : नोटीस दिल्यानंतर सुध्दा ? सभापती महोदय, हा अन्याय आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्य म्हणतील तसे मंत्र्यांनी उत्तर देणे अभिप्रेत नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही तर आपल्याला धमकावणी आहे. येथे उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देणे अभिप्रेत नाही असे म्हणणे इष्ट नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड प्रश्न विचारलेला आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : तारीख पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नाही आणि म्हणून आम्हाला कार्यवाही पाहिजे आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड प्रश्न विचारला असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर देण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. म्हणून आज संध्याकाळपर्यन्त ही माहिती सभागृहासमोर ठेवावी.

प्रा. बी.टी.देशमुख : या प्रकरणी हायकोर्टाने आदेश देऊन देखील वर्षानुवर्षे अमलबजावणी न केल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी आदेश दिल्यानंतर थोडीशी कार्यवाही झाली. परंतु पूर्ण कार्यवाही झालेली नाही. तो विषय प्रश्नाच्या सुधारित उत्तरात येईल. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता. प्र.क्र. 37637......)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी पॉईंटेड प्रश्न विचारलेले आहेत. त्या प्रश्नाची माहिती न मिळणे ही प्रशासनाची चूक आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दोन प्रश्नांची उत्तरे आज सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी पटलावर ठेवावीत असे सांगितले आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : संसदीय आयुधांचा आम्ही वापर करतो. सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयाचा अवमान करण्याचा प्रश्न अशा रीतीने सभागृहामध्ये निकाली लागणे याचा निषेध करण्याशिवाय दुसरा उपाय राहात नाही. कारण हायकोर्टाकडे आम्ही हा निषेध दाखवू.

**उपसभापती** : येथे आपला अवमान होतो त्यामुळे हायकोर्टाच्या अवमानाची फार खंत बाळगू नये. त्याची सवय करुन घ्यावी..

प्रा. बी.टी.देशमुख : त्याची सवय आम्ही करु. माननीय मंत्री महोदयांना जे काही निवेदन करावयाचे असेल ते त्यांनी करावे. हा प्रश्न राखून ठेवल्यानंतर एकेका प्रश्नाचे उत्तर येईल.

**उपसभापती** : दुपारी 4.00 वाजता सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतील आणि त्या प्रश्नाला उत्तरे मिळतील.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्यानंतर देखील कालच्या प्रश्नाचे उत्तर अद्याप मिळाले नाही.

प्रा. बी.टी. देशमुख : संसदीय आयुधांच्या पध्दतीमध्ये ही नोटीस येते. म्हणून माझी विनंती आहे की, हायकोर्टाच्या निर्णयाच्या अवमानाची बाब यामध्ये इन्व्हॉल्व्ह असल्यामुळे आणि पॉईंटेड प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदय देऊ शकत नसल्यामुळे ते उत्तर देण्यासाठी आपण त्यांना वेळ द्यावा. त्यासाठी हा प्रश्न आपण राखून ठेवावा किंवा आपणाला योग्य वाटेल त्यावेळी तो घ्यावा. प्रश्नाची नोटीस दिलेली असल्यामुळे विदाऊट नोटीसीप्रमाणे त्या प्रश्नाची माहिती येता कामा नये. कारण विदाऊट नोटीस एखाद्या विषयाची माहिती पटलावर ठेवण्यात आली तर त्याबाबतीत प्रश्न विचारता येत नाहीत. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा जेणेकरुन आम्हाला त्यावर उपप्रश्न विचारता येतील.

**उपसभापती** : दुपारी 4.00 वाजता या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदय देतील.

आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

...नंतर श्री. गिते....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 12:15

**परीक्षा कालावधीत सुरु असलेल्या भारनियमनाबाबत**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, परीक्षा कालावधीत प्रत्येक सेंटरमध्ये विजेचे सुरु असलेले भारनियमन यासंदर्भात काल मुद्दा उपस्थित केला होता. सभापती महोदय, या मुद्याच्या बाबतीत सायंकाळपर्यंत निवेदन करण्यात यावे अशा प्रकारचे आपणच काल निदेश दिले होते. परंतु सदरहू मुद्याबाबत आतापर्यंत संबंधित माननीय मंत्रिमहोदयांकडून सभागृहात निवेदन करण्यात आलेले नाही. या ठिकाणी माननीय ऊर्जा मंत्री उपस्थित आहेत. त्यांना निवेदन करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, काल परीक्षा काळात होत असलेल्या भारनियमाच्या संदर्भामध्ये सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्या मुद्याच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा झाली आहे. सायंकाळचे भारनियमन आहे की परीक्षा काळामधील परीक्षा सेंटर्समधील भारनियमाबाबतची चर्चा सुरु आहे अशी मी विचारणा केली असता सभागृहाकडून असे सांगण्यात आले की, या ठिकाणी फक्त परीक्षा सेंटर्सवरील भार नियमनासंबंधीची चर्चा सुरु आहे. त्याला पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर्स देता येतील काय ते पहावे. याबाबतीत मी काल सांगितले होते की, सभागृहाची बैठक संपेपर्यंत यासंदर्भात शासनाची भूमिका मांडण्यात येईल. येथे चर्चा संपल्यानंतर माननीय सभापतींच्या दालनामध्ये माननीय सभापती, माननीय उप सभापती, माननीय मुख्यमंत्री, माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि मी अशी संयुक्त बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये या विषयावर बरीच चर्चा झाली. त्या चर्चेत माहिती मिळाली की, राज्यात 5 हजार परीक्षा सेंटर्स आहेत. या 5 हजार सेंटर्समध्ये जनरेटर पुरविण्याच्या संदर्भात शालेय शिक्षण विभागाला असे सुचविण्यात आलेले आहे की, या संदर्भात काय व्यवस्था शालेय शिक्षण विभाग करु शकते ? परीक्षा कंडक्ट करण्याचे काम शालेय शिक्षण विभाग आणि एच.एस.बी.बोर्ड करीत असते. यामध्ये ऊर्जा विभागाचा काहीही संबंध नाही. शालेय शिक्षण विभागाकडून या संबंधात जी काही कार्यवाही करण्यात येईल त्याबाबतची माहिती मी सभागृहास अवगत करण्यास सांगितले आहे. शालेय शिक्षण विभागाकडून यासंबंधीची माहिती सभागृहास अवगत केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

**उपसभापती** : हा प्रश्न जास्त काळ प्रलंबीत ठेवू नये यासंदर्भात माझी माननीय मंत्री महोदयांना सूचना आहे की, विद्यार्थ्यांचा परीक्षेचा जो काळ आहे, त्या काळात भारनियमाच्या वेळत जरुर बदल करा. कारण शालेय शिक्षण विभागाकडून जनरेटर खरेदी करणे आणि ते सर्व परीक्षा सेंटर्सवर वितरीत करणे यासाठी बराच कालावधी जाईल. त्या कालावधीत तर विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपून जातील. म्हणून विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या कालावधीत आपणच भारनियमनाच्या संदर्भातील आवश्यक त्या सूचना द्याव्यात. एम.इ.आर.सी.ची आणि इतर सर्व कामे आपण पुढे करु शकतो. ही मंडळी काय आकाशातून पडलेली नाहीत. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे आणि तो प्रश्न सोडविण्यासाठी आपण येथे बसलेलो आहोत. म्हणून माझी सूचना आहे की, निदान ज्या ठिकाणी परीक्षा सुरु आहे अशा केंद्रावर त्यावेळी तरी भारनियमन कमी करावे. आपण सांगाल की, दिवसा प्रकाश असतो, त्यामुळे परीक्षा सेंटर्सवर विजेची गरज नाही. परंतु विद्यार्थ्यांची काही परीक्षा सेंटर्स खूपच अडचणीच्या ठिकाणी आहेत. त्या सेंटर्समध्ये पुरेसा प्रकाश नसतो. तेथील परीक्षार्थी हवा नसल्यामुळे घामाघूम होतात. किमान त्या परीक्षार्थीना हवेची गरज असते. परीक्षार्थी कासावीस होतात. हवा, अन्न,वस्त्र,निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत. त्या सेंटर्सवर प्रकाश असतो, परंतु तेथे हवेची देखील गरज असते. त्या ठिकाणी विजेचा पुरवठा झाला तर पंखे सुरु होऊन विद्यार्थ्यांना हवा मिळेल. म्हणून निदान परीक्षेच्या काळात भारनियमनाच्या वेळेत बदल करण्यासंबंधी वीज मंडळाच्या अधिका-यांना सूचना द्याव्यात.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या संदर्भात मी काल सभागृहात स्पष्टपणे भूमिका मांडलेली आहे. आज राज्यात चार ते साडेचार हजार मेगावॅट विजेचा तुटवडा आहे. सभापती महोदय, ऊर्जा विभागास भारनियमन करण्याची काही हौस नाही... मला माझे विचार पूर्ण करु द्यावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये भारनियमाच्या संदर्भात सभागृहाचे नेते श्री. आर.आर.पाटील यांनी सुस्पष्ट आश्वासन दिले होत की, आम्ही परीक्षेच्या काळात पर्यायी व्यवस्था करु. परंतु माननीय ऊर्जा मंत्री भारनिमयमनाची आकडेवारी सांगत आहेत. महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत. परीक्षा सेंटर्सवर भारनियमन करण्यात येणार नाही यासंबंधीची माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी माहिती सांगावी.

यानंतर श्री. कानडे....



श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी यासंदर्भात स्पष्टपणे सांगू इच्छितो की, राज्यामध्ये जवळजवळ चार ते साडेचार हजार मे.वॅ.वीजेचा तुटवडा आहे. संपूर्ण राज्यामध्ये 24

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तासांच्या भारनियमनाचे नियोजन केलेले आहे. अशा वेळी 1 तास, 2 तास किंवा 3 तास किंवा काही वेळासाठी भारनियमन कमी करावयाचे म्हटले तर यासाठी फक्त दोनच पर्याय आहेत. एक तर वीज दुसरीकडून घेतली पाहिजे. याबाबत मी कालच खालच्या सदनात सांगितले की 1000 मे.वॅ. पेडेबल पॉवर देशाच्या अन्य भागातून मिळणे शक्य नाही. दुसऱ्या पध्दतीने रिलीफ द्यावयाचा म्हटले तर अन्य एखाद्या वर्गाची वीज कट करुन वीज उपलब्ध करुन द्यावी लागेल. गावांतून आणि शहरातून वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना यासूचना जरुर दिलेल्या आहेत की, ज्या ज्या ठिकाणी परीक्षा सुरु आहेत त्याठिकाणी असलेले भारनियमनाचे टाईम टेबल दुरुस्त करा. एमईआरसीचे आदेश असले तरी परीक्षा काळात भारनियमन कमी व्हावे यासाठी शासन संवेदनशील आहे. शासनाला याची जाणीव आहे. जेथे जेथे भारनियमन कमी करणे शक्य आहे तेथे तेथे आम्ही करीत आहोत. जेथे शक्य नाही तेथे अन्य पर्यायांचा विचार करावा अशा सूचना दिलेल्या आहेत. परीक्षा सेंटर्स आहेत त्याठिकाणी वीजेची व्यवस्था करण्यासाठी जे जे करावे लागेल ते ते करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. प्रश्न निर्माण होतो तो पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी खर्च येईल तो कुठून करावयाचा ? यासंदर्भातील शक्यता शालेय शिक्षण विभाग तपासून पहात आहे.

**उपसभापती** : शालेय शिक्षण विभागाने यासाठी असमर्थता दर्शविली तर काय ?

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या मंत्रीमहोदयांना सभागृहामध्ये त्यांच्या विभागाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी बोलवावे.

**उपसभापती** : राज्यातील एकूण परिस्थिती आणि सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना मंत्रीमहोदयांनी लक्षात घेतलेल्या आहेत. त्यांना याबाबतची तीव्रताही माहीत आहे. सदनाच्या माध्यमातून मी अशी सूचना करीन की, आज दुपारी 1.30 वाजेपर्यंत शालेय शिक्षण मंत्री यांच्याशी चर्चा करुन आणि आवश्यकता असेल तर उपमुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन यासंदर्भात जो निर्णय झाला असेल तो 1.30 वा. सभागृहाला अवगत करावा.

-----

......2



**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने क्लिअरींग आणि फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळाचा सन 2001-2002, 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे अकरावा, बारावा आणि तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1994-95 व 1995-96 चा अनुक्रमे दहावा व अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, 1994-95 व 1995-96 चा अहवाल आता म्हणजे 2008 मध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे. हा अहवाल ठेवण्यास इतका उशीर का झाला याचा खुलासा शासनाने करावा.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, ऑडिटर्स का सहयोग लेकर इस कार्य को स्ट्रीम लाइन करके आगामी 2 अधिवेशन के अन्दर इस वर्ष तक के अहवाल सदन के सामने पेश करने की कोशिश सरकार की तरफ से की जाएगी.

----

नंतर श्री. भोगले

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

ठाणे जिल्हयामध्ये बेलापूर पट्टीमध्ये पॉयशा ही कंपनी असून या कंपनीमध्ये 850 कामगार काम करीत होते. 1998 साली कंपनी बंद पडल्यानंतर या कंपनीतील 850 कामगारांना गेली 14 वर्षे त्यांची कायदेशीर देणी मिळालेली नाहीत. 10 मार्च, 2008 पासून कामगारांचे त्याठिकाणी आंदोलन सुरु आहे. कामगार कंपनीच्या गेटवर आमरण उपोषणास बसले आहेत. उपोषणकर्त्यांपैकी काही कामगार हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाले आहेत. 1998 साली कामगारांची कायदेशीर देणी नक्की झाल्यानंतरही अद्याप त्यांची देणी दिली गेली नाहीत ही बाब गंभीर आहे. मागील 14 वर्षात 850 पैकी 152 कामगार मृत पावले आहेत. त्यामुळे कामगारांचे कुटुंबिय देशोधडीला लागले आहेत. आजही कंपनीबाहेर कामगारांचे आंदोलन सुरु आहे. हे आंदोलन उग्र स्वरुप धारण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपली कायदेशीर देणी मिळण्यासाठी कामगारांनी किती काळ वाट पहावी याला देखील मर्यादा आहेत. या कंपनीने आपली जमीन विकल्यानंतर प्रथम कामगारांची देणी देणे आवश्यक होते. ती देणी न देता या कंपनीच्या जमिनीवर दुसरी कंपनी उभी राहिली. एका बाजूला शासन सांगते की कोणत्याही कंपनीची जमीन विकल्यानंतर प्रथम कामगारांची देणी दिल्यानंतर इतर देणी द्यावीत. या पॉयशा कंपनीच्या कामगारांची कोणतीही कायदेशीर देणी दिली गेली नाहीत. त्यामुळे औचित्याच्या मुद्याद्वारे मी या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. यासंबंधी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची गरज आहे. लिक्वीडेटरने कामगारांची देणी निश्चित केली असतानाही अद्याप कामगारांना त्यांची देणी मिळाली नसल्यामुळे शासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो.

--------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेच्या संदर्भात या सभागृहात अर्ध्यातासाची चर्चा उपस्थित केली होती. लक्षवेधी सूचना सुध्दा उपस्थित केली होती. 5 एप्रिल, 2005 रोजी या सभागृहात या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून झालेल्या चर्चेनुसार सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले होते की, तातडीने विभागीय शिक्षण उपसंचालकांना चौकशीचे आदेश देण्यात येतील आणि त्यांचा अहवाल प्राप्त झाल्याबरोबर तातडीने कारवाई करण्यात येईल. दरम्यान हे प्रकरण नागपूर खंडपीठाकडे गेले. नागपूर खंडपीठाने सुध्दा पोलीस खात्याला आदेश देऊन तातडीने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी अशा प्रकारचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. दिनांक 17.5.2007 रोजी पोलीस चौकशीचा अहवाल शासनाला सादर झाला. शिक्षण संचालकांनी सुध्दा पुन्हा दिनांक 12 जुलै, 2007 रोजी चौकशी करुन अहवाल दिला आहे. अद्याप या संदर्भात मागील तीन वर्षात वेगवेगळया माध्यमातून हा गैरप्रकार सिध्द होऊन याबाबत शिक्षण विभागाकडे मागणी करुन देखील कारवाई झाली नाही. सभागृहात आश्वासने देणे, त्या आश्वासनांचे पालन न होणे, भ्रष्टाचार आणि गैरमार्गाने संस्था चालविणाऱ्या संस्था चालकांना पाठिशी घालणे बरोबर नाही. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी विनंती करतो की, शासनाने या संदर्भात तातडीने लक्ष घालून अहवालाच्या आधारे दोषी अधिकारी आणि संस्था चालकांवर तातडीने कारवाई करावी.

----------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : राज्यामध्ये केंद्र शासनाच्या सहाय्याने व्यवसाय शिक्षण विभागाने किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरु केले. ज्याला इंग्रजीमध्ये एमसीव्हीसी असे शॉर्टमध्ये संबोधिले जाते व त्यानुसार इयत्ता 10 वी नंतर इयत्ता 11 वी व इयत्ता 12 वी साठी विविध तांत्रिक अभ्यासक्रम सुरु केले. त्यानुसार विद्यार्थी इयत्ता 11 व 12 वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी व पुढील शिक्षणासाठी प्रवेश मिळतो. परंतु इयत्ता 12 वी एमसीव्हीसी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी म्हणजे डी.एड. साठी प्रवेश दिला जात नाही. इच्छा असतांनाही त्यांनी डी.एड. चे शिक्षण घेता येत नाही. तरी इयत्ता 12 वी उत्तीर्ण एमसीव्हीसी विद्यार्थ्यांना डी.एड. साठी प्रवेश मिळण्यासाठी काही प्रमाणात जागा राखीव ठेवाव्यात, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाला करीत आहे.

--------------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मला शासनाच्या असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या 1 कोटीपेक्षा जास्त असून या जिल्ह्यात 15 तालुके व 6 महानगरपालिकांचा प्रचंड कारभार वाढलेला आहे. परिणामी विविध प्रकारच्या अडचणी म्हणजेच कायदा व सुव्यवस्था, आरोग्य, रोजगार, कुपोषण, शेती, पिण्याचे पाणी आणि सिंचन व्यवस्था इ. प्रश्न निर्माण होत आहेत. गेली दोन दशके ठाणे जिल्ह्याचे विभाजन करावे ही मागणी प्रलंबित आहे. त्याबाबत राज्याच्या तत्कालीन माननीय तीन मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला होता. मात्र अगोदरच्या विभाजित झालेले जिल्हे स्थिरस्थावर होत नाहीत होपर्यंत नवीन जिल्हा निर्मिती होऊ शकत नाही असा निर्णय शासनाने घेतला आहे. परिणामी ठाणे जिल्ह्याच्या जनतेवर अन्याय होत असल्याची भावना ठाणेकरांमध्ये पसरली आहे. ठाणे जिल्ह्याची भावना लक्षात घेऊन विभजन न करण्याबाबतच्या निर्णयात आवश्यक बदल करुन कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता आहे. माननीय महोदय, आपण देखील ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करीत आहात. मी आपणास विनंती करणार आहे की, याबाबतीत आपण पुढाकार घ्यावा अयि शासनाकडून लवकरात लवकर यासंबंधीची कार्यवाही करुन घ्यावी, अशी मी मागणी करतो.

-----------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथम आपले आभार व्यक्त करतो.

महोदय, विधिमंडळातील ज्येष्ठ सदस्य दिवंगत प्रमोद नवलकर यांच्या बाबतीत हा औचित्याचा मुद्दा आहे. दिनांक 21 नोव्हेंबर, 2007 रोजी आपण सर्वांनी या सभागृहामध्ये त्यांना श्रध्दांजली वाहिली. या सर्वोच्च सभागृहाचे ते सदस्य होते तसेच विधानसभेचे देखील काही काळ ते सदस्य होते. आणि ज्यावेळी आपण श्रध्दांजली अर्पण केली त्यावेळी सर्वांनी आपल्या भावना व्यक्त करुन असे म्हटले होते की, आपण नवलकर साहेबांची जेवढी भाषणे आहेत ती सर्व संकलित करुन त्याचे पुस्तक रुपाने प्रकाशन करणे आवश्यक आहे. यासाठी माननीय सभापतींनी सुध्दा मान्यता दिली होती. या मुद्याच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की, आपण या कामाला गती द्यावी व लवकरात लवकर यासंबंधीची हालचाल व्हावी तीच नवलकरांना खरी श्रध्दांजली होईल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याबद्दल शासनाने कार्यवाही करावी, अशी मी सूचना करतो.

--------------

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ MMP/ प्रथम श्री. खर्चे...... 12:35

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : माननीय सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील हत्तींचा प्रश्न दोन्ही सभागृहात उपस्थित झालेला आहे. असे असतांनाही हत्ती येऊन आंबा पिकांचे व शेतीचे नुकसान करीत असतात. दिनांक 18.2.2008 रोजी माझ्याच गावातील रहिवासी श्री. केशव उपरकर यांचा हत्तीकडून मृत्यू झालेला आहे. हत्तींना पकडण्यासाठी व शासनाकडून ठोस उपाययोजना होण्यासाठी मी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे.

श्री. बबनराव पाचुपते : सभापती महोदय, हत्तीचा विषय आपल्या महाराष्ट्रात अगोदर नव्हता. हत्तींचा प्रादुर्भाव महाराष्ट्रात 2002 पासून सुरु झालेला आहे. आतापर्यंत हत्तीच्या हल्ल्यामध्ये 8 व्यक्ती मृत झाल्या असून 17-18 लोक जखमी झालेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. हत्तींना अटकाव करण्यासाठी सर्व बाजूने तयारी झालेली आहे. यासंदर्भात एक ॲक्शन प्लॅन तयार झालेला असून दिल्लीमध्ये मिटिंग सुध्दा झालेली असून केंद्रीय मंत्री श्री. रघुपती यांनी महाराष्ट्राला भेट दिलेली आहे. वाईल्ड लाईफचे देशाचे प्रमुख यांनी सुध्दा साईट वर येऊन पाहणी केलेली आहे. यासाठी लागणा-या पैशांची देखील तरतूद झालेली आहे. कशा प्रकारे कार्यक्रम करावा यासंदर्भात ॲक्शन प्लॅन तयार झालेला असून हा प्रोग्राम त्वरित सुरु होणार आहे. याशिवाय जे हत्ती राहतील त्यांना पकडून एलिफंट व्हीलेज तयार करुन इको टूरीझमसाठी त्याचा वापर करण्यासाठी आमचा प्रस्ताव तयार झालेला आहे. हत्तीपासून ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यास शासनाला थोडा विलंब लागलेला आहे परंतु यासंदर्भातील नुकसानभरपाईची रक्कम अदा केली गेली आहे. हत्तीपासून जे नुकसान होईल ते नॅशनल कॅलॅमिटीज प्रमाणे धरावे यासाठी स्वतंत्र हेड तयार करण्यात आले असल्यामुळे हत्तीमुळे ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यास विलंब लागणार नाही.

--------

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये बेलापूर येथे पुरातन किल्ला आहे. पुरातत्व विभागाने सदर किल्ला आमच्या ताब्यात देण्यात यावा यासाठी 2005 मध्ये आग्रह धरला होता. परंतु ठाणे कलेक्टरने यासंदर्भात आजमितीस उत्तर न दिल्यामुळे या किल्ल्याची अतिशय दुर्दशा होत चालली आहे. हा किल्ला आता सिडकोच्या ताब्यात असून सिडको या किल्ल्याचे मेन्टेनन्स करते. ठाणे जिल्हयातील नव्या मुंबईतील या किल्ल्यावर चिमाजी अप्पा यांनी पोर्तुगीजांकडून हा किल्ला जिंकून घेतला होता. त्यामुळे सदर किल्ला पुरातत्व विभागाकडे त्वरित देण्यात यावा व त्याची देखभाल सिडकोने करावी आणि या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने पहावे.

---------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये निवेदन क्रमांक 1 पुढे ढकलण्याबाबत**

**उपसभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 1 पुढे ढकलण्यात आलेले आहे. आता नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 2 घेण्यात येईल.

----------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील परळ येथील केईएम रुग्णालयामध्ये पोसीट्रॉन एमीशन ट्रोमोग्राफीची नवीन मशिन जागेअभावी उपयोगात न आणणे.

**मु.शी.**: मुंबईतील परळ येथील केईएम रुग्णालयामध्ये पोसीट्रॉन एमीशन ट्रोमोग्राफीची नवीन मशिन जागेअभावी उपयोगात न आणणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. राजेश टोपे : (नगरविकास राज्यमंत्री ) सभापती महोदय, श्री. मधुकर चव्हाण यांनी "मुंबईतील परळ येथील केईएम रुग्णालयामध्ये पोसीट्रॉन एमीशन ट्रोमोग्राफीची नवीन मशिन जागेअभावी उपयोगात न आणणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**( निवेदन )**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, केईएम. हॉस्पिटलमध्ये कॅन्सरची मशीन एप्रिल 2007 मध्ये मशीन आणण्यात आली. ही मशीन आणल्यानंतर सुमारे 17 महिने होऊन सुध्दा या ठिकाणी मशीन इन्स्टॉल झाली निाही. कॅन्सरच्या रोगाचे निदान या मशीनने केले जात असते. कॅन्सरच्या रोगाचे सुरुवातीसच निदान झाले तर त्यावर उपचार होऊन रुग्ण बरा होऊन या रुग्णाचे प्राण वाचू शकतात. सदर मशीन आल्यानंतर त्या ठिकाणच्या इंजिनिअरने चार महिने घेऊन सुध्दा उत्तर दिले नाही. त्यानंतर हे मशीन तळमजल्यावर बसवावे की, दुस-या माळयावर बसवण्यात यावे यासंदर्भात देखील निर्णय झालेला नाही. कॅन्सर रुग्णाला या मशीन द्वारे 5 हजार रुपयांमध्ये उपचार करुन घेता येतो. बाहेर यासंदर्भातील तपासणी करण्यासाठी 15 ते 25 हजार रुपये खर्च येत असतो.

यानंतर श्री. गायकवाड.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 12.40

श्री.मधुकर चव्हाण ..

या बाबतीत माझा प्रश्न असा आहे की, ही मशिन बसविण्यास ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली त्यांच्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे ? दर दिवशी आठ पेशंटसच्या टेस्ट या मशिनच्या माध्यमातून होऊ शकतात त्यामुळे जर हे मशिन वेळेवर सुरु करण्यात आले असते तर जवळजवळ 1900 पेशंटसना त्याचा फायदा झाला असता आणि 8 ते 10 लाख रुपये त्यांचे वाचले असते. परंतु ही मशिन योग्य वेळी इन्स्टॉल न केल्यामुळे अनेक पेशटसना त्रास झाला व त्यांना अधिक पैसे खर्च करावे लागले. याबद्दल संबंधित अधिकाऱ्याच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे, त्याच प्रमाणे ही मशिन तातडीने दुसऱ्या मजल्यावर बसवू शकतो असा अहवाल आय.आय.टी.च्या इंजिनिअर्सनी दिला होता हे खरे आहे काय , आणि केईएमच्या संबंधित असलेल्या सिव्हील इंजिनिअर्सनी ही मशिन बसविण्यास चार महिने का लावले ?

श्री राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, ही मशिन बसविण्यास दिरंगाई झाली आहे याबद्दल वादच नाही. न्युक्लिअर डिपार्टमेन्टमध्ये पोसीट्रॉन एमीशन टोमोग्राफीची नवीन मशिन बसविण्याचा निर्णय न्युक्लिअर डिपार्टमेन्टच्या वतीने घेण्यात आला होता. ही मशिन आल्यानंतर या मशिनचे वजन 10 टन आहे असे समजले .केईम रुग्णालयाची इमारत पुरातन वास्तू म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर न्युक्लिअर डिपार्टमेन्ट असल्यामुळे तेथे ही मशिन बसवितांना पुरातन वास्तूच्या इमारतीच्या दृष्टीने काही अडचण निर्माण होऊ नये म्हणून चीफ इंजिनिअर यांच्याकडून यासंबंधीचा अहवाल मागविण्यात आला होता. तो अहवाल मागविण्यात वेळ गेला होता . ही मशिन बसविण्यासाठी 5 महिन्याची दिरंगाई झाली होती व एवढी दिरंगाई व्हावयास नको होती असा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचा पहिला मुद्दा होता. तेव्हा ही मशिन बसविण्यास झालेल्या दिरंगाईच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. फाटक यांच्याकडून चौकशी केली जाईल आणि या महिन्यात चौकशी करुन त्यांचा अहवाल त्यांच्याकडून घेऊन ज्या कोणी ंसबधित अधिका-यांनी जाणीवपूर्वक दिरंगाई केलेली असेल वा निष्काळजीपणा केला असेल तर त्यांच्या विरुध्द या अहवालाच्या आधारे निश्चितपणे कारवाई केली जाईल.

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय, शासकीय आणि महानगरपालिकेच्या रुग्णालयातील या नेहमीच्याच बाबी आहेत. अनेक रुग्णालयामध्ये पुरेसा स्टाफच नसतो. या मशिनचे वजन दहा टन आहे हे आपल्याला अगोदर माहीत नव्हते काय ? कोटयावधी रुपयांची मशिनरी वर्षानुवर्षे बसविली जात नाही. अर्थसंकल्पामध्ये बाकीच्या कामासाठी जी काही तरतूद करुन ठेवलेली असते त्या तरतूदीत कपात करुन या मशिनरीसाठी पैसे दिले जातात.औषधासाठी पुरेसा निधी न दिल्यामुळे रुग्णांना औषधे मिळत नाहीत त्यामुळे त्यांना गैरसोय सहन करावी लागते. परंतु अधिकाऱ्यांचा एकमेकाशी योग्य तो संपर्क नसल्यामुळे हे मशिन एक वर्षभर पडून राहिलेले आहे तेव्हा ही दिरंगाई मुद्दाम आणि जाणीवपूर्वक करण्यात आलेली नाही . या ठिकाणी संबंधित अधिका-यांचा बेजबाबदारपणा दिसून येतो. त्याचप्रमाणें कोणतीही कार्यवाही करीत असतांना त्याकडे योग्य पध्दतीने लक्ष दिले पाहिजे व योग्य ती काळजी घ्ेंतली पाहिजे. परंतु प्रत्यक्षात तसे घडत नाही. या कामाकडे योग्य पध्दतीने लक्ष दिले गेले नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येईल असे आश्वासन माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माझ्या उत्तरामध्ये मी स्पष्टपणे सांगितलेले आहे.की मशिन बसविण्यास उशीर करण्यात आला आहे हे मला स्पष्टपणे जाणवले असल्यामुळे चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. या मशिनमुळे न्युक्लिअस इमिशन होत असल्यामुळे कोणालाही त्याची बाधा होता कामा नये म्हणून बी.ए.आर.सी.च्या कमिटीकडून जागा निश्चित करुन घेणे आवश्यक असते. या मशिनच्या जागेसंबंधीचे संपूर्ण ड्रॉईग आणि डिझाईन देऊन त्या कमिटीकडून जागा निश्चित केली जाते. त्यानुसार आता जागा निश्चित करण्यात आलेली आहे आणि कोणत्याही स्थितीत मे जूनच्या दरम्यान ही मशिन काम करण्यास सुरु होईल असा मी सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो.

**उपसभापती** : मे - जून 2008 मध्ये मशिनचे काम सुरु होईल ना ?

श्री.राजेश टोपे : होय

---

असुधारित प्रत /प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी .: आंबा उत्पादकांना द्यावयाची नुकसान भरपाई

मु.शी : आंबा उत्पादकांना द्यावयाच्या नुकसान भरपाई बाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.विनय कोरे ( फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी "आंबा उत्पादकांना द्यावयाची नुकसान भरपाई" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो .

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..



- निवेदना नंतर -

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयातील अनेक आमदार या सभागृहात आहेत आणि आम्ही येथे मागणी केल्यानंतर गेल्या वर्षी आंबा उत्पादकांना नुकसानभरपाई देण्यात येणार आहे या बाबतीत चर्चा झाली होती व माननीय मंत्री महोदयांनी 15 हजार रुपये प्रती हेक्टरी मदत देण्याचे जाहीर केले परंतु प्रत्यक्षात तसे घडलेले नाही . माननीय मंत्री महोदयांनी त्याला कट लावला आहे. ठाणे, रत्नागिरी, सिंधूदूर्ग आणि रायगड मध्ये एकूण 1 लाख 64 हजार एवढे आंब्याचे क्षेत्र आहे. या निवेनात असे म्हटलेले आहे की ,

नतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ....

'कोकणातील आंबा पिकाचे अकाली पाऊस, उशिरा पडलेली थंडी व हवामानातील बदलामुळे आंबा पिकाच्या उत्पादनात 50 टक्केपेक्षा जादा घट झालेल्या शेतकऱ्यांना आंब्याच्या उत्पादनक्षम क्षेत्राच्या 60 टक्के भागासाठी रूपये 15 हजार प्रति हेक्टर याप्रमाणे प्रति शेतकरी दोन हेक्टर मर्यादेपर्यंत व किमान 1 हजार रूपये मदत देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.' पण सभापती महोदय, प्रत्यक्षात किती मदत दिली जाते आहे ? आपण यात देय रक्कम 9 हजार होते असे म्हटले आहे तर हे 9 हजार होण्याचे कारण काय ? आपला असा गैरसमज आहे किंवा कोणी तरी आपला असा गैरसमज करून दिलेला आहे की, दरवर्षी आंबा पीक होत नाही व ते दोन वर्षानी होत असते. दुसरे असे की, आपला तलाटी देखील पीकपाणी व्यवस्थित व वेळेवर काढत नाहीत त्यामुळे यावर पुनर्विचार होण्याची गरज आहे. तेव्हा आपण यामध्ये आंबा बागायतदारांना दोन हेक्टरी 15 हजार रूपये मदत देण्यास मान्यता दिली आहे ती कायम ठेवणार आहात का ? आणि तेवढीच मदत आंबा शेतकऱ्यांना मिळणार काय ? असल्यास आतापर्यंत अशा प्रकारे किती लोकांना मदत मिळाली आहे आणि कितींना अजून ती मिळणे बाकी आहे ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका येथे मांडली आहे त्याबद्दलची वस्तुस्थिती सभागृहासमोर ठेवावयाची म्हटली तर दोन वर्षांनी आंब्याचे पीक येते असा त्या उत्तराचा अर्थ निघत नाही ...

डॉ. दीपक सावंत : आंब्याचे पीक दरवर्षी येत नाही असे आपण या निवेदनात म्हटले आहे.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे आणि नंतर त्यांचा जो काही प्रश्न वा मुद्दा मांडावयाचा असल्यास मांडावा. मला आपल्यामार्फत त्यांना असे सांगावयाचे आहे की, एक हेक्टरमध्ये साधारणत: 100 झाडे असतील तर त्यातील 50 झ ाडे दरवर्षी फलधारणा करतात. अशा प्रकारचा त्या उत्तराचा अर्थ आहे आणि आतापर्यंत आंबा उत्पादकांच्या नुकसानीला जी जी मदत दिली गेली ती याच पद्धतीने दिली गेली आहे. त्यासाठी दोन हेक्टर इतकी मर्यादा आपण ठेवली आहे आणि त्यामुळे दोन हेक्टर पर्यंतच्या बागायतदार असेल तर त्याला पूर्ण 15 हजार रूपये मदत आपण करणार आहोत, त्यापेक्षा जराही कमी त्याला मिळणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, आतापर्यंत किती मदत याप्रमाणे प्रत्यक्षात वाटपउ केली असाही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. तर मी त्याबाबत त्यांना सांगू

..... व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे ....

इच्छितो की, शासनाकडून फलोत्पादन विभागाकडे 33 कोटी रूपये यासाठी उपलब्ध करून दिलेले आहे. ट्रेझरीने 14 कोटी रूपयांपर्यंतचे बील मंजूर केले असून 18 कोटी 22 लाख रूपये आपण विभागाकडे जमा झालेले आहेत आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यावर 5 कोटी 40 लाख रूपये जमा झालेले आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आमच्या कोकणाच्या बाबतीत अशी काही मदत द्यावयाची झाली की नेहमीच अशा प्रकारे शब्दाचा कीस काढत शासकीय निर्णयाची अमलबजावणी केली जाते. एक तर ही मदत घोषित करताना, संभाजीनगर येथील कॅबिनेटच्या बैठकीत घाईघाईने निर्णय घेतला त्यावेळेस एक तर खत टाकणे वगैरे कामे झालेली होती. त्यामुळे त्याचा उपयोग किती झाला हा भाग वेगळा. आंबा उत्पादकांना मदत घोषित करताना हेक्टरी निकष घोषित केला होता की हेक्टरातील उत्पादनावर घोषित केला होता ? माझे पीक आहे तर माझे पीक एक वर्षात होते ते एकाच वेळी अर्धे अर्धे येते वा येत नाही. तेव्हा सगळ्यांचेच असे असते असे नाही. काही शेतकऱ्यांच्या बाबतीत, उदा. सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांचीही आंबा बाग आहे त्यांच्याकडे एक वर्ष पूर्ण येते आणि एक वर्ष पूर्ण येत नाही. मग या वर्षी हेक्टरी 15 हजार म्हणजे 7 हजारच आपण देणार का ? खरे तर 50 हजार रूपयांची मदत मिळावी अशी आमची मागणी होती पण ती तुम्ही मान्य केली नाही. तेव्हा माझी विनंती आहे की, हे हेक्टरी 50 टक्के येतात, 50 टक्के येत नाहीत असे आपण काही करू नका. तर जे काही घोषित केले आहे त्याप्रमाणे पूर्ण मदत द्या. देताना नेहमीप्रमाणे 7-12 वर बरीच खाती असल्याने, तो आला, तो आला नाही वगैरे करून टाळू नका. आपण कितीही म्हटले तरी तुमचे खालचे अधिकार अशा प्रकारे अडवतात. त्यामुळे या अधिवेशनाच्या काळात या आंबा उत्पादकांच्या प्रतिनिधींची आपण एक बैठक घ्यावी त्यात आम्हीही तेथील लोकप्रतिनिधी येतो. आपले म्हणणे असते की, पैसे उचलले जात नाहीत वगैरे वगैरे. पण कोकणातील माणूस त्याला कारण नाही तर तुमचे अधिकारी त्याला कारणीभूत आहेत. तुम्ही हेक्टरी 15 हजार रूपये पूर्ण द्या आणि लवकरात लवकर याबाबतीत आंबा उत्पादकांबरोबर एक बैठक घेऊन हा प्रश्न सोडविणार का ?

( यानंतर श्री. सरफरे ...डब्ल्यू 1 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितलेली वस्तुस्थिती मी दिलेल्या उत्तराशी जुळणारी आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे यापूर्वी सुध्दा आंबा बागायतदारांना मदत देण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे, तो याच पध्दतीने घेतला आहे. आणि त्याची मर्यादा 2 हेक्टरपर्यंत नेली आहे. ज्यांच्याकडे तेवढी बाग असेल त्यांना 15 हजार रुपये मिळणार आहेत. दुसरी सूचना आपण केली की, प्रत्यक्ष मदत वाटतांना शेतकरी आणि विभाग यांच्यामध्ये समन्वय नसल्यामुळे अडचणी निर्माण होतात. त्या संदर्भात या अधिवेशन काळात आंबा उत्पादन क्षेत्रातील प्रतिनिधींबरोबर बैठक घेतली जाईल.

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी प्रश्न विचारतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराने आमचे समाधान झ ाले नाही...

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी बैठक घेण्याबाबत सांगितले आहे, त्यावेळी आपण आपले म्हणणे मांडा.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, आंबा हे कोकणातील एकमेव पीक आहे. याकरिता राज्य सरकारकडून आतापर्यंत सर्वात जास्त मदत दिली गेली आहे. त्याप्रमाणे इतर पिकांच्या बाबतीत मदत देतांना प्रत्यक्ष नुकसान किती झाले हे पाहून देत असतो. आंबा पिकाच्या बाबतीत सरसकट प्रत्येक शेतकऱ्याला मदतीचा फायदा झाला पाहिजे अशी भूमिका शासनाने घेतली. व त्याप्रमाणे पहिल्यांदा 10 हजाराची मदत दिली.

(अनेक माननीय सदस्य एकाच वेळी प्रश्न विचारु लागतात.)

श्री. विनोद तावडे : तुम्ही ऊस पिकाकरिता जास्त मदत कशी देता?

श्री. विनय कोरे : शासनाचे आतापर्यंत मदत देण्याचे धोरण आहे त्याप्रमाणे मदत दिली आहे.

(अडथळा)

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी शांत रहावे. मंत्रिमहोदयांनी बैठक घेण्याचे मान्य केले आहे. तरीसुध्दा मंत्रिमहोदयांना अधिक खुलासा करावयाचा असेल तर तो त्यांनी करावा.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे मघाशी असे म्हणाले की, माझे आंब्याचे पिक पहिल्या वर्षी पूर्णपणे येत नाही तर दुसऱ्या वर्षी पूर्णपणे येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे...

म्हणजेच एका वर्षामध्ये माझ्या बागेमध्ये 100 टक्के झाडांना फळधारणा होते. याबाबतीत माझे असे उत्तर आहे की, सन 2006-07 मध्ये वातावरणामध्ये बदल झाल्यामुळे आंबा पिकावर त्याचा परिणाम झाला. तरीसुध्दा प्रत्येक शेतकऱ्याला 15 हजार रुपये मिळाले पाहिजेत अशी सरकारची भावना असल्यामुळे ज्यांच्या झाडांना फळधारणा झाली नव्हती अशा शेतकऱ्यांनाच मदत न देता सरसकट सर्वच उत्पादक शेतकऱ्यांना मदत दिली. परंतु जर आपली भावना यापेक्षा वेगळी असेल तर सर्व आंबा बागायदारांचे आंब्याचे पीक तपासून घेऊन सन 2006-07 मध्ये फक्त ज्यांच्या झाडांना फळधारणा झाली नव्हती त्यांनाच मदत करण्यात येईल. त्यामुळे आपण म्हणता तशाप्रकारे मदतीचे वाटप होईल.

(अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी प्रश्न विचारतात.)

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी त्यांच्या दालनामध्ये बैठक घेण्याची आपली सूचना मान्य केली आहे. त्या बैठकीमध्ये या मुद्यासंबंधी आपण ऊहापोह करावा. आणि जर समाधान झाले नाही तर पुन्हा सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित करावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तोपर्यंत हे नियम 93 चे निवेदन आपण राखून ठेवावे. तसेच, ही बैठक मंत्रिमहोदयांच्या दालनामध्ये न घेता आपण आपल्या दालनामध्ये घ्यावी.

**उपसभापती** : नियम 93 चे निवेदन राखून ठेवण्यात येणार नाही. परंतु आपण केलेल्या सूचनेप्रमाणे ही बैठक माझ्या दालनामध्ये घेण्यात येईल.

------

( यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:55

पृ.शी. : मोर्शी (जि.अमरावती) नगरपरिषदेचे पदाधिकारी व अधिकारी यांनी मोर्शी जकात नाक्याची जागा भाडयाने दिल्यामुळे नगरपालिकेचे झालेले नुकसान.

मु.शी.: मोर्शी (जि.अमरावती) नगरपरिषदेचे पदाधिकारी व अधिकारी यांनी मोर्शी जकात नाक्याची जागा भाडयाने दिल्यामुळे नगरपालिकेचे झालेले नुकसान याबाबत सर्वश्री.जगदीश गुप्ता,पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी व सागर मेघे, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जगदीश गुप्ता,पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी व सागर मेघे यांनी "मोर्शी (जि.अमरावती) नगरपरिषदेचे पदाधिकारी व अधिकारी यांनी संगनमत करुन मोर्शी जकात नाक्याची जागा भाडयाने दिल्यामुळे नगरपालिकेचे झालेले लाखो रुपयांचे नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझे दोनच प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, हर्रास रद्द करण्याबाबत नगरपरिषदे समोर विषय ठेवण्यात आला आहे. त्याप्रमाणे तो रद्द केला आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, प्राथमिक शाळेची जागा नेमकी कोणाची आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबतीत सांगावयाचे तर हर्रास झाला होता. स्टॅण्डींग कमिटीने निर्णय घेतला होता की, लिलाव करुन फिक्स डिपॉझिटची रक्कम आणि भाडे ठरविण्यात आले होते. पण ते जनरल बॉडीने रद्द केले आहे. त्यामुळे ऑक्शन केलेले दुकान होते, त्यांना पत्र दिले आहे की, हर्रास रद्द केला आहे. त्यामुळे ज्या गाळयाच्या हर्रास संबंधात प्रश्न उपस्थित केला होता, त्याबाबतीत सांगावयाचे तर ती जागा नगरपालिकेच्या ताब्यामध्ये आली आहे. याबाबतीत परत एक नव्याने ऑक्शन करुन निर्णय घेण्याचे ठरविलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न जागेच्या बाबतीत विचारला आहे. याबाबतीत सांगावयाचे तर ही जागा शाळेच्या संस्थेच्या मालकीची आहे. तेथे जे बांधकाम केले होते, त्यासाठी परवानगी घेतलेली नव्हती आणि बांधकाम करताना समासिक अंतर ठेवलेले नव्हते. यासंबंधात संचालक, नगररचना यांनी असा निर्णय दिला आहे की, याबाबतीत दंड आकारणी करुन ते बांधकाम नियमित करण्यात यावे. याबाबतीत नगरपालिका निर्णय घेत आहे.

-----

. . . .एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्याबाबत
असलेली मागणी

मु.शी.: कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्याबाबत
असलेली मागणी याबाबत डॉ.दीपक सावंत वि.प.स.
यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.अनिल अहमद (मत्स्योद्योग मंत्री) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्याबाबत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाण मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .एक्स-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कोकणावर अन्याय करणारे हे आणखी एक उदाहरण आहे. माननीय मंत्री महोदयांनी कोकणातील मत्स्य विद्यापीठ नागपूरला घेऊन जाण्याचा घाट घातलेला आहे. पण नागपूर मध्ये मासे होतात की नाही हे मला माहिती नाही. मात्र कोकणामध्ये मासे होतात. त्यामुळे खरे म्हणजे विकसित तंत्रज्ञानाची आवश्यकता कोकणामध्ये आहे. तेथे समुद्र किनारा आहे. परंतु नागपूरमध्ये समुद्र किनारा नाही. तरी देखील निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "प्राप्त परिस्थितीत कोकणासाठी मत्स्यविज्ञान अभ्यासक्रमाकरिता स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची आवश्यकता नाही." खरोखरच हा कोकणावर अन्याय आहे, कोकणातील मच्छिमारांवर अन्याय आहे. मासे खाणाऱ्यांवर अन्याय आहे. कारण जर कोकणामध्ये मासेमारीचे तंत्रज्ञान विकसित झाले नाही तर मत्स्य दुष्काळ निर्माण होणार आहे. म्हणून शासनाने याबाबतीत फेरविचार करुन मत्स्य विज्ञान विद्यापीठ कोकणामध्येच ठेवणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, फिशरीज कॉलेज आई.सी.ए.आर. के अन्तर्गत आते हैं. मैं सभागृह को बताना चाहता हूँ कि रत्नागिरी का कॉलेज रत्नागिरी में ही रहेगा, नागपुर का कॉलेज नागपुर में ही रहेगा और उदगीर का कॉलेज उदगीर में ही रहेगा. प्रत्येक कॉलेज में विद्यार्थियों की संख्या 44 है और सभी सीट्स भरी हुई हैं. यह विद्यापीठ आप लोगों के समय का बना हुआ है और आप लोगों का यह निर्णय है कि यह नागपुर के अन्दर बनाया जाएगा. पहले यह विद्यापीठ कृषि विद्यापीठ के अन्तर्गत आता था. बाद में 4 कृषि विद्यापीठों को डिवाइड करके एनीमल हस्बेंडरी का एक विद्यापीठ बनाया है और फिशरीज साइंस इसकी एक फेकल्टी के रुप में कार्यरत है. इसका मतलब यह नहीं है कि पूरा विद्यापीठ कहीं से उठाकर लेकर गए हैं. उस समय मनोहर जोशी की सरकार थी और नागपुर में विद्यापीठ लाने का काम आपकी सरकार ने किया था. रत्नागिरी का कॉलेज वहीं पर रहेगा, उसमें कोंकण के बच्चे पढ़ रहे हैं. कोंकण के लोगों के ऊपर अन्याय नहीं होना चाहिए. अगर कोंकण के लोग इस विद्यापीठ का सब सेंटर कोंकण में खोलना चाहेंगे तो सरकार उसके लिए तैयार है.

. . . श्री. अहमद जारी, नंतर तालेवार/बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जगदीश गुप्ता )**

श्री. अनिस अहमद .....

आज रत्नागिरी के जो बच्चे पढ़ रहे हैं, वे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर के अन्तर्गत नहीं आते हैं. वे विद्यार्थी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ (BSKKV) के अन्तर्गत आते हैं. आप इस संबंध में जो भी रास्ता दिखाएंगे हम उसके अनुसार काम करने के लिए तैयार है. हमें मालूम है कि आप विदर्भ के दुश्मन नहीं है. आज विदर्भ में अनेक किसान आत्महत्या कर रहे हैं. किसानों को जोड़धंधा मिलना चाहिए इसलिए हम उस दिशा में काम कर रहे हैं. नागपूर में पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ के अन्तर्गत पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य विज्ञान इन तीनों शाखाओं का समावेश किया किया गया है. इसके माध्यम से वहां पर एलडीओ तैयार हो रहे हैं, पशु चिकित्सक तैयार हो रहे हैं. आज नागपुर में मत्स्य विज्ञान कोर्स के अन्तर्गत 32 विद्यार्थियों को शिक्षा प्रदान करने का काम शुरु किया गया है. विदर्भ में लगभग 2 लाख हेक्टर जमीन पर माजगुजारी तालाब है. जिस प्रकार से चीन में फिश मल्टीप्लाय होते हैं और वहां लोगों को अच्छा व्यवसाय मिला है, उसी प्रकार से हम चाहते हैं कि विदर्भ के किसानों को जोड़ धंधा उपलब्ध करके दिया जाए. विदर्भ में दो लाख हेक्टर जमीन पर जो माल गुजारी तालाब है, वहां पर 36 हजार स्माल, 15 हजार मीडियम और 19 हजार लार्ज इनलैंड है, वहां पर फिशरीज का अच्छा उत्पादन हो रहा है. नागपुर में 32 विद्यार्थियों को एक क्लास रुम में मत्स्य विज्ञान की शिक्षा दी जा रही है. सबसे ज्यादा कोर्सेस तो रत्नागिरी में ही शुरु है. जो कोर्सेस पढ़ाये जा रहे हैं, उनमें एक्वाकल्चर, फिशरीज बायोलॉजी, फिशिंग प्रोसेस, फिशरीज हायड्रोग्राफी, फिशिंग इंजीनियरिंग और एक्सटेंशन एजुकेशन इत्यादि कोर्सेस हैं. मैं यह भी बताना चाहता हूं कि रत्नागिरी  के किसी भी कर्मचारी का ट्रांसफर नागपूर के विद्यापीठ में नहीं किया जाएगा. अगर आपको किसी ने यह बताया होगा तो मैं यह कहूंगा कि आपको गलत प्लीडिंग किया गया है. मैं आपको विश्वास दिलाना चाहता हूं कि रत्नागिरी विद्यापीठ के किसी भी कर्मचारी का तबादला नागपुर विद्यापीठ में नहीं किया जाएगा. मैं आपको यह भी बताना चाहता हूं कि सभी राजनीतिक पार्टियों ने एक साथ मिलकर यह कहा है कि मत्स्य विज्ञान विद्यापीठ को नागपुर में ही रखा जाए. यह कॉलेज बीएसकेकेव्ही के अन्तर्गत ही रहेगा और आयसीआर, दिल्ली के स्तर की ही डिग्री दी जाएगी.



असंशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या काही वक्तव्यांचे मी स्वागत करतो. त्यांनी दोन तीन महत्वाची वाक्ये उच्चारलेली आहेत. आम्ही विदर्भाचे शत्रू नाही असे त्यांनी जे सांगितले त्याचे मी स्वागत करतो. आम्ही विदर्भाचे शत्रू नाही. सभापती महोदय, हा विद्यापीठाचा विषय आहे. माननीय मंत्रिमहोदय कॉलेजविषयी बोलत आहेत. आम्ही विद्यापीठाविषयी बोलत आहोत. आम्ही कॉलेजविषयी बोलत नाही. त्या ठिकाणी मालगुजारी तलाव आहेत आणि तेथे फिशरीज वाढली पाहिजे, त्याबाबत तेथे शिकवले गेले पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, त्या विद्यापीठाचे सबसेंटर या ठिकाणी करु. आमची अशी मागणी आहे की, मत्स्य विद्यापीठ रत्नागिरीला ठेवावे आणि सबसेंटर नागपूरला करावे. ही मागणी शासन मान्य करणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : मैं यह बताना चाहूंगा कि वहां पर महाराष्ट्र एनिमल हसबेंडरी है, मत्स्य विज्ञान विद्यापीठ नहीं है. मत्स्य विज्ञान के अन्तर्गत 32 विद्यार्थी शिक्षा ग्रहण कर रहे हैं. सबसे ज्यादा विद्यार्थी रत्नागिरी विद्यापीठ के अन्तर्गत रत्नागिरी में शिक्षा ग्रहण कर रहे हैं. नागपुर में वेटरनरी कॉलेज है. नागपुर में मत्स्य विज्ञान विद्यापीठ की स्थापना आपके ही शासनकाल में की गई थी. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ के अन्तर्गत मत्स्य विज्ञान का एक कोर्स है. मुख्य कॉलेज रत्नागिरी में ही है. नागपुर में वेटरनरी डॉक्टर तैयार हो रहे हैं, एलडीओ तैयार हो रहे हैं. नागपुर में केवल 32 विद्यार्थी पढ़ रहे हैं. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ(BSKKV) रत्नागिरी में ही है. रत्नागिरी के विद्यापीठ को नागपुर में नहीं लाया गया है.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापति (श्री जगदीश गुप्ता)** : सम्माननीय सदस्यों की भावना यह है कि कोंकण में मत्स्य विज्ञान का स्वतंत्र विद्यापीठ होना चाहिए. क्या आप उसे कार्यान्वित कर सकते हैं ?

श्री अनिस अहमद : हम रत्नागिरी का विद्यापीठ नागपुर में नहीं ले गए हैं. रत्नागिरी का विद्यापीठ रत्नागिरी में ही है. कोंकण से कोई विद्यापीठ नागपुर में नहीं लेकर आए है.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, महाराष्ट्रात 720 कि.मी. समुद्र किनारपट्टी आहे. राज्यातून 1200 कोटी रुपयांचे मत्स्य उत्पादन निर्यात होते. संपूर्ण किनारपट्टीचा विचार केला तर हे विद्यापीठ कोकणात होणे आवश्यक आहे. मंत्रिमहोदय म्हणत आहेत की, युतीच्या काळामध्ये हे केले पाहिजे होते. ठीक आहे, युतीमध्ये झाले नाही, आता आपण आपल्या काळामध्ये हे विद्यापीठ कोकणामध्ये करावे. माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मघाशी म्हटले होते की, आंबा उत्पादकांवर नेहमीच अन्याय केला जातो. सध्या मत्स्य दुष्काळाचा प्रश्न दोन्ही सभागृहात गाजतो आहे. गेल्या 30 वर्षापासून मच्छिमारांना न्याय मिळालेला नाही. मच्छिमारीचे चुकीच्या पध्दतीने मूल्यमापन केले जाते. ज्या मच्छिमारी बोटी बंद आहेत त्यातूनही उत्पादन मिळते असे गृहित धरले जाते. वस्तुस्थिती अशी आहे की, सध्या 50 टक्के सुध्दा मत्स्य उत्पादन होत नाही. त्यामुळे मच्छिमारांना मदतीचा हात दिला पाहिजे. हे विद्यापीठ कोकणामध्ये होणे आवश्यक आहे. तशाप्रकाराचे मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले तरच संपूर्ण किनारपट्टीला न्याय मिळणार आहे.

श्री.अनिस अहमद : रत्नागिरी के कॉलेज को अपग्रेड करके सब-सेंटर बनाया जा सकता है. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ और मत्स्य विद्यापीठ दोनों एक साथ है. मत्स्य विज्ञान विद्यापीठ अलग से नहीं है. मत्स्य विज्ञान एक फेकल्टी है. माननीय सदस्य ने सब-सेंटर बनाने का सुझाव दिया है. वहां पर पीकेव्ही की जमीन है. वहां पर पीकेव्ही की जमीन हमारे विभाग को देंगे तो हम वहां पर कॉलेज को अपग्रेड करके सब-सेंटर बनाने के लिए तैयार है.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयात अधिका-यांनी पोल्ट्रीधारकांच्या संगनमताने खोटे पंचनामे करुन लाखो रुपयांची लूट करणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयात अधिका-यांनी पोल्ट्रीधारकांच्या संगनमताने खोटे पंचनामे करुन लाखो रुपयांची लूट करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.अनिस अहमद ( पशुसंवर्धन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयात अधिका-यांनी पोल्ट्रीधारकांच्या संगनमताने खोटे पंचनामे करुन लाखो रुपयांची केलेली लूट" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक 3.4.2007 रोजी कुक्कटपालनाच्या अनुदानाचे चुकीच्या पध्दतीने वाटप करुन मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा विषय नियम 93 अन्वये मांडण्यात आला होता. त्यावेळी हे अधिवेशन संपण्यापूर्वी चौकशी करुन कारवाई केली जाईल असे उत्तर दिले होते. ते उत्तर आणि आता दिलेले उत्तर सारखेच आहे. अजूनही याप्रकरणाची चौकशी सुरु आहे. या चौकशीला आणखी किती वर्षे लागणार आहेत ? सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये अजूनही 70 टक्के अनुदान दिले जात आहे. उर्वरित 30 टक्के अनुदान केव्हा दिले जाणार आहे ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, पिछले अधिवेशन में राज्य मंत्री जी ने इस मामले की जांच करने का आश्वासन दिया था. तद्नुसार इस मामले की जांच करने के लिए प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त की नियुक्ति की गई थी. सह आयुक्त ने अपनी रिपोर्ट 10.04.2007 को कमिश्नर को सादर की थी. उस के बाद कमिश्नर के द्वारा वह रिपोर्ट शासन को सादर की गई है. लेकिन इस रिपोर्ट से शासन कनविन्स नहीं था. इसलिए शासन ने 17 अक्तूबर को पुन: रिपोर्ट मंगाई है. जिन लोगों को मुआवजा नहीं मिला है उनको मुआवजा देने के संबंध में वित्त विभाग से बात हुई है. मुआवजा देने के लिए बजट में प्रावधान किया जाएगा. बर्ड फ्ल्यू के संबंध में सभी संबंधित लोगों को मुआवजा दिया जाएगा. मैं यह भी बताना चाहता हूं कि जिन अधिकारियों ने गड़बड़ी की है, उस संबंध में आपके पास सुबूत होंगे तो वे सुबूत आप हमें दें, हम उन अधिकारियों के खिलाफ कड़ी कार्रवाई करेंगे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या संदर्भात या ठिकाणी उत्तर देण्यात आले. ठाणे जिल्हयात देखील बर्डफ्लू रोगाच्या प्रादुर्भावामुळे पोल्ट्रीधारकांना अनुदान वाटप करण्यामध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी आम्ही माननीय मंत्री महोदयांकडे दिलेल्या आहेत. त्याबाबतीत कोणती कारवाई करणार आहात ?

श्री. अनिस अहमद : कारवाई करणार आहोत.

ॲड. अनिल परब : मघाशी माननीय मंत्री महोदयांनी चौकशी करण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्या चौकशीचा अहवाल पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. अनिस अहमद : होय.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर व सागर मेघे यांनी "राज्यातील इथेनॉल निर्मिती करणा-या साखर कारखान्यांनी मोठ्या प्रमाणावर इथेनॉलचे उत्पादन करुनही केंद्र शासनाच्या मालकीच्या ऑईल कंपन्या कारखान्यांकडून इथेनॉल घेण्यास करीत असलेली टाळाटाळ, यासंबंधात माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांकडे शिष्टमंडळ नेण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "मुंबई हाय (वसई)मध्ये नैसर्गिकरीत्या मिळत असलेले स्वस्त इंधन घरोघरी पाईपलाईनने पुरवून उद्योगधंदा वाढीस चालना देण्याची होत असलेली मागणी, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व विनोद तावडे यांनी "आरोग्य सेवेबाबत महाराष्ट्र राज्य पिछाडीवर असल्याचे टाटा सामाजिक संस्थेच्या अहवालाद्वारे स्पष्ट होणे, धर्मादाय संस्थांनी गरीब रुग्णसेवेच्या नावावर सवलती मिळूनही गरिबांना सवलतीच्या दरात सेवा उपलब्ध करुन न देणे, आर्थिकदृष्टया मागासलेल्या गरोदर महिलांना वैद्यकीय सेवा न मिळाल्याने बालमृत्यूचे प्रमाण वाढणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे व प्रा. बी.टी. देशमुख यांनी "राज्यातील आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजनाबाह्य क्षेत्र यातील 29 माध्यमिक शाळा शालेय शिक्षण

...3..

विभागाच्या दिनांक 30 जून, 2006च्या शासन निर्णयाप्रमाणे पात्र असूनही या शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान मंजूर करण्यास शासनाने नकार देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे व प्रा. बी.टी.देशमुख यांनी "वर्ग 5 ते 10 व 11वी व 12वीच्या अनुक्रमे 1170 व 414 वर्ग तुकडया शासन निर्णयाप्रमाणे अनुदानावर येऊनही अनुदान खर्ची न घालणे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षक कर्मचा-यांचे वेतन विलंबाने होणे, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न होणे, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी अजूनही अनुदान न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, ॲड अनिल परब, सर्वश्री अरविंद सावंत व परशुराम उपरकर यांनी "अंधेरी(पूर्व) येथील एम. व्ही. आणि एल.यू. कॉलेज व चिनॉय कॉलेजमधील इयत्ता 11वीचे वर्ष पुढील शैक्षणिक वर्षापासून बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेणे, सदर महाविद्यालयातील 48 शिक्षकेतर कर्मचा-यांना व्यवस्थापनाने नोकरीवरुन काढून टाकण्याच्या दिलेल्या नोटीसा, या कर्मचा-यांना आकृतिबंधानुसार अन्य महाविद्यालयांमध्ये सामावून घेण्याबाबत प्रस्ताव सादर करुनही सदर प्रस्तावावर शासनाने अद्यापही निर्णय न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

**(सभापतीरस्थानी माननीय उपसभापती)**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व जगदीश गुप्ता यांनी "शासनाने दारिद्रय रेषेखालील रुग्णांना मोफत उपचार मिळावेत यासाठी सुरु केलेल्या जीवनदायी योजनेंतर्गत हृदयरोग विकाराच्या रुग्णांना महिनोन्महिने उपचार न मिळणे, शेकडो

..4..

(उपसभापती....)

रुग्ण शस्त्रक्रियेच्या प्रतिक्षेत असणे, 120 कर्क रुग्णांपैकी केवळ 14 रुग्णांवरच उपचार करण्यात येणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे यांनी "सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून होणारे लाल गव्हाचे वाटप, तो गहू खाण्यास अयोग्य असल्याचे निदर्शनास येणे, लाल गव्हाऐवजी देशी गहू पुरविण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनास केलेली विनंती." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....यानंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती.....**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील यांनी " राज्याच्या सागरी किनारपट्टीमध्ये सुमारे 2,500 परप्रांतीय बोटींनी घुसखोरी करणे, मत्स्य विभागाच्या लाचखाऊ धोरणामुळे गुजरात, गोवा, केरळ व कर्नाटक या राज्यातील मच्छिमारांचा कोकण सागरी किना-यावर धुमाकुळ चालू असणे, परप्रांतीय मच्छिमारांना अटकाव करण्याची आवश्यकता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी " कळवा खाडीच्या किना-यावर खारफुटींच्या झाडांची कत्तल करुन बांधण्यात येत असलेल्या झोपडया, या प्रकाराला पोलिसांचा आशिर्वाद असणे, या झोपडयांमुळे एम.आय.डी.सी.च्या जलवाहिन्यांना निर्माण झालेला धोका व याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये अतिशय महत्वाची सूचना सभागृहात मांडली आहे. सूचनेतील विषय हा अतिशय गंभीर आहे. कळवा खाडीच्या किना-यावर खारफुटींच्या झाडांची कत्तल करुन त्या जागेवर मोठया प्रमाणात झोपडयांचे अतिक्रमण झालेले आहे. तसेच ते अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. या अतिक्रमणामुळे एम.आय.डी.सी.च्या जलवाहिन्यांना मोठया प्रमाणात धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी असलेल्या झोपडयांचे अतिक्रमण आजच्या आज तोडण्यासंदर्भात ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांना माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी आदेश द्यावेत. सदरहू अतिक्रमण हे पोलीस बंदोबस्तात काढण्यात यावे. तसेच या संदर्भात नगरविकास विभागाकडून काय कार्यवाही करण्यात आली त्याबाबतचा अहवाल सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे ठाणे महानगरपालिका आयुक्तांना यासंबंधी आदेश देण्यात येतील व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सूचनेच्या संदर्भात शासनास निवेदन करण्यास सांगावे.

**उपसभापती** : यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माननीय मंत्री महोदय सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहेत. त्यामुळे यासंदर्भात स्वतंत्र निवेदन करण्याची काही आवश्यकता नाही असे मला वाटते.

श्री. मधुकर चव्हाण : ठीक आहे.

----------------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : के.ई.एम.रुग्णालय, परेल ( मुंबई ) येथील कच-यातील सलाईनच्या बाटल्या, सीरींज, ऑक्सीजन मास्क वेचून त्यांची विक्री होणे.

**मु. शी.** : के.ई.एम.रुग्णालय, परेल ( मुंबई ) येथील कच-यातील सलाईनच्या बाटल्या, सीरींज, ऑक्सीजन मास्क वेचून त्यांची विक्री होणे यासंबंधी सर्वश्री. सय्यद जामा, संजय दत्त, गोविंदराव आदिक, शरद रणपिसे, प्रतापसिंह मोहिते पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"के.ई.एम रुग्णालय, परेल (मुंबई) आवारातील गेट क्रमांक 8 येथे टाकल्या जाणाऱ्या जैविक कचऱ्याला वेगळा करण्याचे काम एका संघटनेला देण्यात आले असून सदरहू कचऱ्यातील सलाईनच्या बाटल्या, सीरीज, ऑक्सीजन मास्क वेचून बाहेर विकण्याची परवानगी नसतानाही या संघटनेचे काही कर्मचारी पैशाच्या लोभाने हे प्लॅस्टिक साहित्य बाहेर नेऊन विकत असल्याचे दिनांक 28 फेब्रुवारी,2008 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, पिशव्यातील घातक कचरा उघड्यावर ओतला जात असणे, त्यामुळे निर्माण होणाऱ्या असह्य दुर्गंधीमुळे बाजूच्या गॅरेज चाळ, शिपाई चाळ येथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कुटूंबिय वारंवार आजारी पडत असणे, सदरहू विभागातील नागरिकांनी महापालिका व रुग्णालय प्रशासनाकडे यापूर्वी तक्रारी करुनही कारवाई न होणे, सदरहू जैविक कचऱ्याबाबत आवश्यक ती उपाययोजना तसेच दोषि व्यक्तिविरुध्द कारवाई होत नसल्याने उपरोक्त परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याप्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सुरक्षा रक्षकांनी स्त्री मुक्ती संघटनेविरुध्द भोईवाडा पोलीस ठाण्यात दिनांक 5.3.2008 रोजी तक्रार नोंदविली आहे. त्या तक्रारीचे स्वरुप काय आहे? त्या तक्रारीच्या अनुषंगाने राज्य शासनाने चौकशी केली आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, स्त्री मुक्ती संघटना आणि के.ई.एम.रुग्णालय यांच्यात ॲग्रीमेंट करण्यात आले आहे. सदरहू स्त्री मुक्ती संघटनेला के.ईएम. रुग्णालयातील ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा करण्याचे काम दिलेले आहे. या रुग्णालयातील सलाईनच्या रिकाम्या बाटल्या, सीरींज, ऑक्सीजन मास्क यांची संघटनेतील महिला कामगारांकडून विक्री होत असते अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्या ठिकाणी तीन ते चार काळया पिशव्यांमध्ये रिकाम्या सलाईनच्या बाटल्या ठेवलेल्या आढळून आल्या. ही बाब सुरक्षा रक्षकांच्या निदर्शनास आल्यानंतर के.ईएम. रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांनी स्त्री मुक्ती संघटने विरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

ॲड. अनिल परब : महानगरपालिकेच्या अखत्यारितील रुग्णालयांमधील ओला कचरा आणि सुका कचरा वेगवेगळा करण्याचे कंत्राट दोन ठेकेदारांना दिले जाते. त्यामुळे रुग्णालय परिसरात अशा प्रकारच्या घटना घडतात. सुका कचरा आणि ओला कचरा वेगवेगळा करण्यासाठी पैसे खर्च केले जातात. ओला कचरा आणि सुका कचरा वेगवेगळा करण्यासंबंधीचे कंत्राट एकाच ठेकेदारास दिले तर असे प्रकार होणार नाहीत. म्हणून ही दोन्ही कामे एकाच ठेकेदाराकडे देण्यात येतील काय ? त्याचप्रमाणे मुंबई शहरात रस्त्यावर मोठया प्रमाणात ओला आणि सुका कचरा जमा होतो तो कचरा तात्काळ उचलण्यासाठी शासनाकडून काय उपाययोजना करण्यात येत आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या रुग्णालयामध्ये ओला कचरा आणि सुका कचरा यासाठी रुग्णालयाकडून पैसे खर्च केले जात नाहीत. उपजिविकेचे साधन म्हणून ओला कचरा आणि सुका वेगवेगळा केला जातो. सुका कच-यात काही गोष्टी आढळून येतात त्यातील काही गोष्टी कचरा वेचणा-या महिला विकतात.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु .....

श्री. राजेश टोपे .....

सभापती महोदय, यानिमित्ताने ज्या काही सूचना करण्यात आल्या आहेत त्याबाबतीत विचार करण्यात येईल. 2/3 संघनांऐवजी एकाच संघटनेला काम देण्यात यावे. या सूचनेबाबत निश्चितपणाने विचार करण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, कचरा उलचण्यासाठी पैसे दिले जातात. पैसे दिले जात असतील तर काम देखील व्यवस्थितपणे होणे आवश्यक आहे आणि ते पाहण्याची जबाबदारी मॅनेजमेंटची आहे. याबाबतीत सुध्दा शासनाने योग्य त्या सूचना रुग्णालयाच्या प्रशासनाला द्याव्यात.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, केईएम रुग्णालयाने काही अटींचे पालन केले नाही म्हणून रुग्णालय बंद करावे असे निदेश हायकोर्टाने दिले आहेत हे खरे आहे काय ? या रुग्णालयातील वॉर्ड क्र. 6, 7, 8, 9, 11, 28 आणि 30 याठिकाणी अतिशय दुर्गंधीयुक्त वातावरण आहे. यासंदर्भात देखील रुग्णालयाचे सहाय्यक अधिष्ठाता आणि एेएमओ यांच्याकडे तक्रारी केलेल्या आहेत हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, रुग्णालय बंद करण्याबाबतचे कोणतेही निदेश हायकोर्टाने दिलेले नाही. अशा पध्दतीची माहिती माझ्याजवळ नाही. दुसरा प्रश्न काही वॉर्डामध्ये दुर्गंधी आहे असा उपस्थित करण्यात आला. त्याबाबतीत रुग्णालयाचे डीन आणि व्यवस्थापन यांना वॉर्डामध्ये योग्य पध्दतीचे वातावरण ठेवण्याबाबत सूचना देण्यात येतील.

-----

**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यासंबंधी**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 2 आणि 3 पुढे ढकलण्यात आल्या आहेत. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 4 चर्चेला घेण्यात येईल.

-----

.....2

**पृ. शी.** : गोंदिया जिल्हयातील बुरड कामगारांना बांबूचा पुरवठा न होणे

**मु. शी.** : गोंदिया जिल्हयातील बुरड कामगारांना बांबूचा पुरवठा न होणे यासंबंधी सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, गोविंदराव आदिक, राजन तेली, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोंदिया जिल्ह्यात बुरड व्यवसायात कोट्यावधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या बुरड कामगारांना वन विभागाने बांबू पुरविणे बंद केल्याचे माहे मार्च, 2008 च्या सुमारास आढळून येणे, त्यामुळे या जिल्ह्यातील सुमारे 50 जहाज बुरड कामगारांवर कोसळलेली बेकारीची कुऱ्हाड या जिल्ह्यातील तिरोडा, आमगाव, गोंदिया, देवरी, अर्जुनी मोरगांव व सडक अर्जुनी या तालुक्यात मोठया प्रमाणात बुरड कामगारांची संख्या असल्याचे आढळून येणे, हे कामगार चटया, पेटारे, सूप, ढोल्या, टोपल्या, सितका, गोळे, बेंडवे, चटई व गणेरी अशा अनेक गृहोपयोगी वस्तू बनवून आपला व आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत असणे, एका बुरड कामगाराला वनविभागाच्या आगारातून 200 तसेच प्रति बसोडवहीधारक कामगाराला 1500 बांबू पुरवठा करण्याचे शासनाचे निर्देश असूनही गेल्या अनेक दिवसापासून त्यांना बांबू पुरवठा बंद केल्यामुळे या बुरड कामगारांवर व त्यांच्या कुटूंबावर आलेली उपासमारीची वेळ, त्यामुळे या बुरड कामगारांमध्ये निर्माण होत असलेले चिंतेचे वातावरण, तसेच या बुरड कामगारांचा परंपरागत चालत आलेला व्यवसाय कायमचा बंद होऊ नये यासाठी बुरड कामगारांना त्वरित बांबूचा पुरवठा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

"

श्री. बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती / उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

.....3



SSK/ SBT/ KTG/ 13:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**<u>निवेदनानंतर</u>**

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, 1 लाख 93 हजार बांबूपैकी 52 हजार बांबूंची फक्त उचल करण्यातआली. बाकी बांबू तसेच शिल्लक राहिले. डेपोमध्ये बांबू आल्यानंतर ते बंदीस्त असतात. हे बांबू बुरुडांना पाहण्याची संधी दिली जाते काय ? हे बांबू चांगल्या दर्जाचे नसतात. नागपूर वनक्षेत्र मोठे आहे तेथे बांबू आणू शकतात. खराब बांबू आणले जातात आणि तेच बुरुडांना मिळतात.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, बुरुडांना खराब बांबू मिळतात अशी परिस्थिती नाही. बुरुंडांना बांबू देताना गोलाकार आणि ठराविक जाडीचे दिले जातात. बुरुडांना हिरवा रंगाचा बांबू दिला जातो. हा बांबू सुमारे 80-90 कि.मी.अंतरावरुन आणावा लागतो. लायसनधारक कोणीही बुरुड आला तरी त्याला योग्य प्रतीचा बांबू तात्काळ दिला जाईल.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, जंगल कामगारांनी बांबू निष्कासनासाठी सोसायटया स्थापन करुन कूप देण्याची व्यवस्था शासन करील काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, बांबू निष्कासनाचे काम अवघड असते. अतिशय दुर्गम भागातून आदिवासी लोक बांबू आणतात आणि बाहेरच्या लोकांना ते येऊ देत नाहीत. बुरुडांना हिरवा बांबू दिला जातो. तो ठराविक जाडीचा असतो. सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी सूचना केल्याप्रमाणे बुरुडांनी संस्था स्थापन केल्यास कूप देण्याबाबत शासन विचार करील.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.......... लक्षवेधी सूचना क्र.4...

वॅट रद्द करण्याच्या संदर्भात आम्ही फाईल पाठविली होती, परंतु काही अडचणी आल्या. आता फक्त निस्ताराचा भाग आहे, सवलतीने त्यांना बांबू देणार आहोत. पुन्हा एकदा प्रस्ताव पाठवून असणारा कर कमी करण्याचा प्रयत्न करु.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, 67 लाख बांबू अनुज्ञेय ठरत असताना उत्पादन फक्त 11 लाख बांबूचे होत आहे. हे उत्पादन वाढविण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे? गोंदिया जिल्हयात जवळपास 3500 बुरुड कामगार आहेत. 2007-08 मध्ये फक्त 645 कामगारांनी माल उचलला. याचे मुख्य कारण म्हणजे बुरुड कामगारांना आवश्यक असणारा हिरवा बांबू मिळत नाही. बुरुड कामगारांना रोजगार मिळावा म्हणून हिरवा बांबू शासन उपलब्ध करुन देईल का?

श्री.बबनराव पाचपुते : लगेच तशा प्रकारची व्यवस्था करु. सजेशन फॉर ॲक्शन.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : अपंग युवकांना ठाणे महापालिकेकडून बूथ
मंजूर करणे

**मु. शी.** : अपंग युवकांना ठाणे महापालिकेकडून बूथ
मंजूर करणे याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"ठाणे महापालिकेत अपंग युवक श्री.सुनिल कोर्डे, रा.ठाणे याने सन 2002 साली उपजिवीकेचे साधन म्हणून बूथ मिळण्यासाठी केलेल्या विनंती अर्जानुसार महापालिकेने महासभा ठराव क्र.196, दिनांक 7.10.2003 अन्वये बूथ मंजूर करुन 15 दिवसात त्यासंबंधीची अत्यावश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास कळविले. त्यानुसार सर्व पूर्तता करुनही संबंधित अपंग युवक गत 5 वर्षापासून बूथ मिळण्याची वाट पहात आहे. महापालिकेने मात्र मर्जीतील लोकांना बूथ दिले. ते बूथ संबंधितांनी भाड्याने दिलेले आहेत. परंतु ज्यास खरोखरच आवश्यकता आहे तो मात्र गत 5 वर्षे बूथ मिळण्यापासून वंचित आहे. महापालिकेचे माननीय आयुक्तसाहेब यांचे सोयीस्कररित्या मौन याबाबत शंकेस कारणीभूत होत आहे. त्यामुळे अपंग युवक निराशेने घेरला असून कधीही आत्महत्या करण्याची शक्यता आहे." सदरची बाब मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. तरी याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी, ही विनंती.

**उपसभापती** : माननीय वनमंत्री महोदय, ही बाब गंभीर आहे. या अपंग युवकाने आत्महत्या केली तर महापालिकेच्या आयुक्तांना जबाबदार धरावे लागेल. सर्व प्रोसीजर पूर्ण केली असेल तर याबाबत विलंब का होत आहे याची संबंधितांकडे विचारणा करुन सभागृहाला अवगत करावे.

श्री.बबनराव पाचपुते : ठीक आहे. धन्यवाद.

-------------

..3..



**पृ. शी.** : शाळातील मुलांना ने-आण करणाऱ्या व्हॅनला लाग लागून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चार कोवळ्या मुलांचा मृत्यू होणे.

**मु. शी.** : शाळातील मुलांना ने-आण करणाऱ्या व्हॅनला लाग लागून चार कोवळ्या मुलांचा मृत्यू होणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"जोगेश्वरी पश्चिम येथील मिल्लत स्कूलमध्ये मारुती व्हॅनला आग लागून चार कोवळ्या मुलांच्या जिवावर बेतले. याप्रकरणी व्हॅन चालकाचा निष्काळजीपणा मुलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. संपूर्ण मुंबईमध्ये अशा अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांची नेआण करण्याकरिता अनधिकृत गाड्या वापरल्या जातात. यातील अनेक गाड्या अत्यंत खराब म्हणजे भंगारमध्ये काढण्याच्या स्थितीत असूनही त्यांचे मालक जास्त नफा मिळविण्याकरिता गाड्या तशाच स्थितीत वापरतात. त्यामुळे अनेक वेळा विद्यार्थ्यांच्या जिवावर बेतण्यासारखे प्रसंग ओढवतात. त्याचबरोबर क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी भरणे, गाड्यांचे दरवाजे बरोबर नसल्यामुळे उघडे राहणे, अशा अनेक समस्या असून सुध्दा अवैधरित्या खाजगी गाड्यातून विद्यार्थ्यांची नेआण करण्यात येते. त्यामुळे या खाजगी गाडी चालकांवर प्रादेशिक परिवहन खात्याने व वाहतूक खात्याने कारवाई करणे गरजेचे असून शासनाने वरील गोष्टींचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे असून सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे. शासनाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरित कारवाई करावी. धन्यवाद.

----------

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विना अनुदान तत्वावरील शाळांना मिळत असलेल्या टप्पानिहाय अनुदानाचा लाभ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना न मिळणे

**मु.शी.**: विना अनुदान तत्वावरील शाळांना मिळत असलेल्या टप्पानिहाय अनुदानाचा लाभ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना न मिळणे. या विषयासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महोदय, विना अनुदानित तत्वावरील तुकडयांना पाच वर्षानंतर टप्पानिहाय अनुदान देण्याचा शासन विचार करीत असते. ज्या वर्गांना टप्पानिहाय अनुदान मिळते ते वर्ग विना अनुदानित असताना त्यावर काम करणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शिक्षणाधिकाऱ्याची मान्यता घेणे बंधनकारक असते व तशी मान्यता घेतली जाते. ज्यावेळी हे वर्ग अनुदान मिळण्यास पात्र होतात त्यावेळी या वर्गांवर काम करणाऱ्या शिक्षकांना 20, 40, 60 टक्के असे टप्प्याटप्प्याने अनुदान मिळते, त्यानुसार त्यांना वेतन देखील मिळू शकते. पण या वर्गांवर काम करणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मान्यता असतांना देखील कुठल्याही प्रकारचे अनुदान शासन देत नाही. अशा प्रकारचे अनुदान मिळत असतांना शिक्षकांबरोबरच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही वेतन अनुदान शासनाने द्यावे, अशा प्रकारची विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत असून दुपारी 2.00 वाजता बैठक पुन: भरेल त्यावेळेस माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचे उत्तर सुरु होईल.

( दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतर )

-------------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यानंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. जितेंद्र आव्हाड : माननीय सभापती महोदय, राज्यसभेची निवडणूक जाहीर झ ााल्यामुळे विविध पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य नामनिर्देशनपत्र भरण्याकरिता निवडणूक कार्यालयामध्ये गेलेले आहेत त्यामुळे सभागृहात आवश्यक ती गणसंख्या नाही. तरी आपण यासंदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा.

**उपसभापती** : आता माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर उत्तर दिले जाणार होते परंतु राज्यपाल महोदयांच्या अभिभाषवरील उत्तर सोमवार दिनांक 17 मार्च, 2008 रोजी पुरवणी मागण्यांच्या अगोदर होईल. आता सभागृहाची बैठक मी 2.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 2.00 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- स्थगिती नंतर -

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.व मु.शी.** : सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री.आर.आर. पाटील ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्रीमती फौजिया खान यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्रीमती फौजिया खान यांनी शपथ घेतली.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KGS/ MMP

**पृ.शी.व मु.शी** : औचित्याचा मुद्दा

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यामध्ये दहावीच्या परीक्षा सध्या सुरु असून विजेच्या भारनियनाचा त्रास या विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे परीक्षेच्या ठिकाणी जनरेटर्स बसविण्याबाबत आपण निदेश दिले होते. त्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी काय प्रगती झाली आहे ? भार नियमनामुळे परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना अतोनात त्रास साहन करावा लागत आहे. जनरेटर्स बसविण्यासाठी आमदार निधीतून पैसे देण्यासबंधात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा करावी. या शासनाला कोणीही डोनेशन देण्यास तयार आहे. इनव्हर्टर, जनरेटर, हेल्मेट आणि मेणबत्ती या बाबतीत आपण अभूतपूर्व असे काम केलेले असल्यामुळे शासनाला कोणतीही कंपनी डोनेशन म्हणून जनरेटर्स देईल. किर्लोस्कर कंपनीच्या जनरेटर्सच्या विक्रीमध्ये 25 टक्के वाढ झालेली आहे. भारनियमनामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या कालावधीत त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे या संदर्भात देण्यात आलेल्या निदेशाचे काय झाले आहे ? जनरेटर्स बसविण्यासाठी जर निधी कमी पडत असेल तर हा निधी मिळविण्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात यावी .किंवा आपण झोळी घेऊन हा निधी मिळविण्यासाठी इतरांकडे जाऊ. सन्माननीय वन मंत्री श्री बबनराव पाचपुते देखील "विठ्ठल विठ्ठल" म्हणत आपल्या बरोबर येतील.

**उपसभापती** : मी मघाशी सन्माननीय उर्जा मंत्र्यांना अशी सूचना केली होती की, त्या ठिकाणी जनरेटर्स बसविता न आल्यास भारनियमनाच्या वेळेत बदल करण्यात यावा आणि परीक्षेच्या दोन तीन तासाच्या कालावधीसाठी विद्यार्थ्यांना वीज उपलब्ध करुन देण्यात यावी .

श्री.आर.आर.पाटील : ते वर्क आऊट करण्याचे काम सुरु आहे.

श्री.नितीन गडकरी : या संदर्भात केव्हा निवेदन करणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : आजच्या आज करण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला आजही थोड्याशा वेदनाच झाल्या. खरे म्हणजे आपण जे काही येथे सांगता त्याला आपण ओव्हरऑल निदेश म्हणा वा म्हणू नका, वाटल्यास, सूचना केली असे म्हणा. पण आपण जे काही रूलिंग असेल ते दिल्यानंतरदेखील मंत्री महोदय उभे राहतात आणि त्यावर भाषणला सुरूवात करतात हे मला बरोबर वाटत नाही. कारण पीठासीन अधिकाऱ्याने निर्णय दिल्यानंतर त्यावर वाद करता येत नाही, भाष्य करता येत नाही ही आपली प्रथा, परंपरा आहे, किंबहुना तो एक प्रकारे नियमच आहे. असे करणे केव्हाही उचित नाही. शेवटी ही सदनाची प्रतिष्ठा आहे आणि ती प्रतिष्ठा पाळण्याची जबाबदारी या सदनातील प्रत्येक सदस्याची आहे आणि त्याला मंत्री देखील अपवाद नाहीत. सभापती महोदय, मी खरे तर तेव्हाच हा मुद्दा उपस्थित करणार होतो. पण त्यावेळी जी काही शांतता येथे होती तिचा भंग होऊ नये म्हणून मी तेव्हा गप्प बसलो. परंतु असे वारंवार होत असेल तर मात्र याबाबत आपण सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात किंवा याबाबतीत आपण सर्व गटनेत्यांची एक बैठक घेऊन त्यात याबाबत चर्चा करावी. आपण, पीठासीन अधिकाऱ्यांनी निदेश दिल्यानंतर, निर्णय दिल्यानंतर त्याचे पालन, केवळ पालन करणे हेच येथील प्रत्येकाचे, मंत्र्यासहित प्रत्येक सदस्याचे काम आहे.

**उपसभापती** : मी या संदर्भात निदेश देतच नाही ...

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, आपण सदनामध्ये काही सांगितले त्यातून हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पण माझ्या मनातील शंका मी येथे बोलून दाखवू इच्छितो. मुळात या परीक्षा दिवसाच्या काळात आहेत आणि मुंबई, पुणे, नागपूर सारख्या महापालिका असणाऱ्या शहरांमध्ये ज्या शाळा आहेत की जेथे परीक्षा केंद्र आहे त्या ठिकाणी अंधाऱ्या खोल्या असतील असे मला वाटत नाही. म्हणून मी शासनाला आपण म्हटल्याप्रमाणे विनंती करतो, कदाचित या अशा शाळा कमी असतील की ज्या ठिकाणी अंधाऱ्या वर्गखोल्या आहेत, अडचणीच्या जागी आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक ही मोठी शहरे आहेत आणि तेथे होणाऱ्या परीक्षा या दिवसा होत आहेत त्यामुळे तेथे उजेडाचा प्रश्न फारसा मोठा नाही ...

श्री. नितीन गडकरी : पण उन्हाळ्याचे दिवस असल्याने तेथे वारा येण्यासाठी पंखे असणे तरी आवश्यक आहे ना ?

..... एचएच 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : पंख्याच्या वाऱ्याने कदाचित परीक्षार्थी लिहित असलेले पेपर्स उडण्याची शक्यता आहे त्यामुळे ते पेपर्स सावरण्यात त्यांचा वेळ जाईल व म्हणून एक प्रकारे त्याची अडचणच त्यांना होण्याची शक्यता आहे. ही एक प्रॅक्टिकल अडचण मी आपल्याला सांगतो. ..

**उपसभापती** : मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाला कारण नसताना वेगळे फाटे फोडण्यापेक्षा आपण सर्वांनीच याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे असे मला वाटते. मी याबाबत निदेश नाही तर सूचना देतो की, या बाबत शासनाने मी यापूर्वी सांगितले त्याची अमलबजावणी करावी अशी माझी स्वत:ची इच्छा आहे. ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला एक विनंती आहे ...

**उपसभापती** : आपण माझे बोलणे विजेप्रमाणे मध्ये मध्ये खंडित करीत आहात ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आपला झालेला आणि होत असलेला अपमान सहन होत नाही म्हणून मला मध्येच बोलावे लागते आहे. आपण पीठासीन अधिकाऱ्याच्या आसनावरून जे काही बोलता, सूचना करता ते निदेशच आहेत. शेवटी ती पीठासीन अधिकाऱ्याची खुर्ची आहे. तेथे कोणी 'वसंत डावखरे' एक व्यक्ती म्हणून बोलत नाही. सभापती महोदय, आपण त्या आसनावरून जे काही सांगता ते निदेशच असतात आणि ते सर्वांना बंधनकारक आहेत. आपण त्या आसनावरून निदेश देऊ नयेत यासाठी आपल्यावर बाह्य शक्तींकडून दबाव येतो आहे. पण कोणीही कितीही दबाव आपल्यावर आणत असतील तरी आम्ही आपल्या पाठीमागे आहोत. आपण नि:संकोचपणे निदेश देतो आहे असे म्हणूनच निदेश द्यावेत. सूचना वा विनंती करतो असे आपण म्हटले तरी ते निदेशच असतात. कारण पीठासीन अधिकाऱ्याच्या आसनावरून दिलेली ती सूचना वा विनंती हे निदेशच असतात हेही आपण येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. तेव्हा आम्ही आपल्यासाठी संघर्ष करण्यास तयार आहोत. बाह्य शक्तींकडून या बाबतीत आपल्यावर जो दबाव आणला जात आहे त्याने आपला जो संकोच होत आहे तो आम्हाला बरोबर वाटत नाही एवढेच मला आपल्याला सांगावयाचे आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी आपल्या सर्व निदेशांचा कसा संकोच होत आहे ते सांगितले. पण माझ्या मते सगळ्यात वाईट गोष्ट कोणती असेल तर आपण आज सकाळीदेखील मंत्री महोदयांना या संबंधात वेळ देऊन संधी

..... एचएच 3 ...



KBS/MMP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 14:35

दिली. असे असताना त्यांनी त्या विशिष्ट वेळेत येऊन सभागृहाला अवगत करायला पाहिजे होते की, आपण दुपारी अमुक इतक्या वेळेस सभागृहास अवगत करण्याची संधी मला दिली होती परंतु आम्ही अजून निर्णयाप्रत येऊ शकलो नाही तरी मला त्यासाठी आणखी मुदत द्यावी. असे काही तरी सांगण्यासाठी तरी मंत्र्यांनी, शासनाने पुढे यायला पाहिजे होते. पण तसेही झालेले नाही. म्हणजे तुम्ही काहीही सांगा, निदेश द्या वा सूचना करा किंवा विनंती करा. आपली दखलच घ्यायची नाही असे शासनाने, शासनातील मंत्र्यांनी ठरविले असावे असे दिसते आहे. तुम्ही काहीही सांगा, आमच्या मनाला येईल तेच आम्ही करू असेच त्यांचे एकूण वागणे आहे. आताही त्यांनी स्वत:हून पुढे येऊन काहीही सांगितले नाही वा तशी इच्छाही दर्शविलेली नाही. परीक्षा संपल्यानंतर त्यांनी येऊन त्याबाबत काही सांगणे कितपत योग्य होणार आहे ? म्हणून अगदी कडवट शब्दामध्ये मी या वृत्तीचा निषेध करतो. शासन यातून केवळ आपलाच नाही तर या सदनाचा अपमान करीत आहे असेच आम्ही मानतो. आपण त्यांना या बाबतीत दोन वेळा दिल्या होत्या. एक दुपारी दीड वाजताची आणि 4 वाजताची वेळ दिली होती. ....

( यानंतर श्री. सरफरे .....आयआय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत......

एका विषयाला दीड वाजताची वेळ दिली आणि दुसऱ्या विषयाला चारची वेळ दिली आहे. असे दोन विषय आहेत. आपणाकडून वेळेनुसार सूचना दिल्या गेल्या आहेत. परंतु सभागृहाची पर्वा न करण्याची सत्ताधाऱ्याची पध्दत सुरु झाली आहे, ती लोकशाहीला घातक आहे, लोकशाहीचा अवमान करणारी आहे. सतत छत्रपति शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन जनतेच्या पाठीत वार करणारी ही पध्दत आहे एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

**उपसभापती** : माननीय उप मुख्यमंत्री महोदय, आपण या सभागृहाचे नेते आहात. सध्या राज्यामध्ये विजेचे भारनियमनाचे जे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे त्यामध्ये थोडा फेरफार करण्याची आवश्यकता आहे. राज्यामध्ये दहावीची परीक्षा सुरु असल्यामुळे परीक्षेच्या काळात एक-दोन तासाकरिता भारनियमनाचे वेळापत्रक थोडे शिथिल करण्याबाबत आपण माननीय ऊर्जा मंत्र्यांना आदेश द्यावेत.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी याबाबत आपणास कल्पना दिली आहे. आणि सभागृहाला सांगितले आहे की, ज्या केंद्रावर परीक्षा सुरु आहे, त्या गावातील शाळेमधील विद्युत पुरवठा परीक्षा सुरु असतांना खंडीत होणार नाही याबाबत वर्कआऊट करण्याचे काम मंडळामार्फत करण्यात येत आहे. दहावीची परीक्षा सुरु असलेल्या अशा केंद्रांना भारनियमनामध्ये कशाप्रकारे सवलत देता येईल याबाबत वर्कआऊट करण्यात येत आहे. आणि जास्तीत जास्त ठिकाणी विद्युत पुरवठा कसा सुरु ठेवता येईल याबाबत एम.एस.ई.बी. अभ्यास करीत असून याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

**अशासकीय कामकाज विधेयके**

**पृ.शी.**: मोटार वाहन (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO.XIV OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MOTOR VEHICLES ACT, 1988, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन 2007 चे वि.प.वि. क्रमांक 14 मोटार वाहन अधिनियम, 1988 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदया, याठिकाणी मोटर वाहन अधिनियम 2000 च्या सेक्शन 185 मध्ये अतिशय तुटपुंजी शिक्षा सुचविण्यात आली आहे. दारु पिऊन किंवा कोणत्याही प्रकारचे मादक द्रव्य सेवन करुन गाडी चालविण्यामुळें जे अपघात होत आहेत त्यांचे प्रमाण दिवसें-दिवस वाढत चालले आहे. अशा अपघातामध्ये निरपराध व्यक्तींना आपला जीव गमवावा लागत आहे. सभापती महोदया, गेल्या दोन-तीन वर्षापासून आपण मुंबई शहरामये पाहिले असेल की, नोव्हेंबरपर्यंत 638 माणसे ठार झ ाालेली आहेत. मद्यपि विद्यार्थ्यांनी दोघांना गाडीखाली चिरडल्यामुळे दोन निरपराध व्यक्ती जागच्या जागी ठार झाल्या. तसेच, मोबाईलवर बोलून वाहन चालवितांना अपघात झाल्यामुळे त्यामध्ये अनेक माणसे ठार झाल्याचे आपल्या लक्षात येईल. सभापती महोदय, मागील वर्षी अशाप्रकारच्या अपघातामध्ये मरण पावलेल्यांची माहिती आपणापुढे सादर करतो. जानेवारी 2007 मध्ये लिंकिंग रोडवर भरधाव वाहनाची धडक एका घरकाम करणाऱ्या तरुणीला लागून ती जागीच ठार झाली. त्यानंतर 3 फेब्रुवारी रोजी मुंबई-गोवा महामार्गावरील वडखळ नाका येथे एका अज्ञात वाहनाने ठोकर मारल्यामुळे दुचाकीवरील तिघेजण जागीच ठार झाले. सभापती महोदया, म्हणून मला असे वाटते की, मोटार वाहन अधिनियमाच्या सेक्शन 185 मध्ये केवळ 2000, 4000, 5000 रुपये दंड करण्याची तरतूद असल्यामुळे या वाहन चालकांना कोणत्याही प्रकारची भीती

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

राहिलेली नाही. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, त्याठिकाणी 2000 रुपयांऐवजी 25000 रुपयांचा दंड करण्यात यावा. जर त्याने दुसऱ्यांदा अपघात केला तर 3000 रुपये दंड आकारण्यात येतो. ही रक्कम किरकोळ असल्यामुळे ती भरुन तो सुटू शकतो. चित्रपट अभिनेता श्री. आदित्य पांचोली याने केलेल्या अपघातामध्ये एक व्यक्ती ठार झाली असतांना त्याला 900 रुपयांचा दंड लावून त्याला सोडून देण्यात आले. त्याच्यावर नंतर कोर्टात केस चालविण्यात आली. मला असे वाटते की, दारु पिऊन वाहन चालविल्यामुळे अपघात झाल्याचे सिध्द झाल्यानंतर कमीत कमी 1 लाख रुपये दंड आणि 10 वर्षापर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा याठिकाणी केली गेली पाहिजे.

सभापती महोदया, मुंबई, महाराष्ट्र किंवा देशामधील अपघाताच्या आकडेवारीसंबंधीचा जो अहवाल आला आहे त्यामध्ये तामिळनाडू व आंध्र प्रदेश राज्यानंतर आपला नंबर लागत आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यापर्यंत 11200 माणसे रस्त्यावरील अपघातामध्ये ठार झालेली आहेत. त्यामध्ये जवळ जवळ 40 ते 45 टक्के माणसे ही केवळ दारु पिऊन वाहन चालविल्यामुळे ठार झाली आहेत. त्यामुळे कायद्याची भीती कुणाला राहिलेली नाही. हे कायदे ब्रिटीशांच्या काळापासून चालत आलेले आहेत. त्या काळात मुंबई शहराची लोकसंख्या 20,30,40 लाख होती. आता रस्त्यांची संख्या कमी झाली आहे, पदपथांची संख्या कमी झाली आहे, वाहनांची पार्किंगची व्यवस्था नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:45

श्री.मधुकर चव्हाण . . . .

आज व्यसनाधीन लोकांची संख्या वाढलेली आहे. म्हणून आपण यासंबंधात अत्यंत कठोर कायदा करावयास पाहिजे आणि या केलेल्या कठोर कायद्याची तितक्याच प्रभावीपणे, कठोरपणे अंमलबजावणी करणेही अत्यंत आवश्यक आहे. ज्यावेळी सदनामध्ये हे विधेयक विचारासाठी मांडले जाईल, तेव्हा मी विस्तृतपणे माझे विचार मांडेन. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, याठिकाणी माझे अशासकीय विधेयक स्विकारुन, ते याठिकाणी मला मांडण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आभारी आहे. हे अशासकीय विधेयक मला सदनामध्ये मांडण्यासाठी परवानगी द्यावी आणि सभागृहासमोर ठेवण्यात यावे अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि. क्रमांक - 14 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

. . . .2 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C. Bill No. I of 2008

(A BILL FURTHER TO AMEND THE HINDU MARRIAGE ACT, 1955 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

(माननीय सदस्य श्री.संजय दत्त अनुपस्थित)

----

**पृ.शी.**: रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांना सोयी व सुविधा पुरविणे आणि महाराष्ट्र शासनाने त्यांची जबाबदारी स्विकारणे.

L.C. BILL NO. II OF 2008

(A BILL TO PROVIDE FOR CERTAIN FACILITIES AND AMENITIES TO AND ACCEPTANCE OF RESPONSIBILITY BY GOVERNMENT OF THE CHILDREN LIVING ON THE STREETS OF CITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

(माननीय सदस्य श्री.संजय दत्त अनुपस्थित)

----

**पृ.शी.**: हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक.

L.C. BILL NO. III OF 2008

(A BILL TO PROVIDE FOR PROHIBITION OF ADVERTISEMENTS AND HOARDINGS WHICH TEND TO INSTIGATE VIOLENCE OR SEXUAL OFFENCES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

(माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील अनुपस्थित)

----

. . . .2 जे-3



**<u>अशासकीय कामकाज - ठराव</u>**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना 100 टक्के अनुदान देणे.

**मु.शी.**: राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना 100 टक्के अनुदान देणे या विषयावरील श्री.विक्रम काळे, वि.प.स.यांचा ठराव

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

. . . .2 जे-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी.: राज्यात झपाटयाने होत असलेल्या शहरीकरणामुळे पायाभूत नागरी सुविधांवर होणारा विपरित परिणाम

मु.शी.: राज्यात झपाटयाने होत असलेल्या शहरीकरणामुळे पायाभूत नागरी सुविधांवर होणारा विपरित परिणाम या विषयावरील श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"राज्यात झपाटयाने होत असलेले शहरीकरण, जवळजवळ निम्म्यापेक्षा अधिक जनता शहरामध्ये रहात असणे, त्यामुळे शहरातील पायाभूत नागरी सुविधांवर त्याचा होणारा विपरित परिणाम, त्यातच ग्रामीण भागातील जनता शेती परवडत नसल्यामुळे शहराकडे मोठया प्रमाणावर स्थलांतरीत होत असणे, परिणामी राज्यातील लाखो एकर जमीन शेतीविना ओस पडत असून शेती उत्पादनावर त्याचा मोठया प्रमाणावर होत असलेला अनिष्ट परिणाम, ही परिस्थिती लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेचे शहराकडे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी ग्रामीण भागातील शेती व्यवसायाला योग्य ते प्रोत्साहन देऊन रोजगार उपलब्ध करण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदया, एकूणच देशामध्ये नागरीकरणाचे प्रमाण 27 टक्के आहे. सर्व देशामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये नागरीकरणाचे प्रमाण 48 ते 49 टक्के आहे. या महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या सुमारे 11 कोटी इतकी आहे. त्यातील 4 कोटी 95 लाख नागरिक हे वेगवेगळया शहरांमध्ये राहतात. मुंबई सारख्या शहरामध्ये, जेथे असे म्हटले जाते की, भौगोलिकदृष्टया या शहराच्या चारही बाजुने पाणी आहे आणि विकासासाठी एक इंच जमीनही कुठे वाढवू शकत नाही अशी स्थिती आहे. या शहरामध्ये चालण्यासाठी, व्यवहारासाठी, खेळाची मैदाने, रुग्णालय, पदपथ, रस्ते, पार्कींग,पार्कस् इ.सगळया गोष्टी लक्षात धेतल्या तर या शहरामध्ये फक्त 60 लाख लोकसंख्याच असली पाहिजे. पण प्रत्यक्षात या मुंबई शहरामध्ये कोटी-सव्वा कोटीच्या वर लोकसंख्या आहे. मला असे वाटते की, आम्ही या विषयावर पुढे काही बोलल्यानंतर तो टीकात्मक भाग वाटेल.पण आपण सगळयांनी मिळून जर याबाबतीत विचार केला नाहीतर एक भयानक स्थिती

. . . .2 जे-5



श्री.मधुकर चव्हाण . . . .

या महाराष्ट्र राज्याची निर्माण होईल. या राज्यातील निम्मी लोकसंख्या शहरामध्ये राहते. आपले पोट हातावर घेऊन लोक शहरामध्ये का येतात ? याचा आपण विचार केला पाहिजे. हे लोक शहरामध्ये

येतात आणि मिळेल तेथे राहतात, झोपडपट्टीमध्ये राहतात, पदपथावर झोपतात, रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर झोपतात. या शहरामध्ये रेल्वेच्या एका डब्यामध्ये जवळ-जवळ 70 ते 75 लोकांच्या बसण्याची व्यवस्था असते, परंतु प्रत्यक्षात तेथे 200-200, 300-300 माणसे आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करीत असतात. काही काळापूर्वी मुंबईतील पदपथ मोठे होते, फुटपाथ धुतले जात असत. परंतु आता येथील लोकसंख्या इतकी वाढलेली आहे की, गलिच्छपणा देखील वाढलेला आहे. मी कोकणातून आलो आहे. कोकणामध्ये पाहिले तर रत्नागिरी, सिंधुदूर्ग,रायगड इ.जिल्हयां- मध्ये केवळ म्हातारी माणसे, दुदैवाने ज्या महिला विधवा झालेल्या आहेत त्या सोडल्या तर बाकी सगळी माणसे, तेथील तरुण माणसे मुंबई,पुणे आणि इतर अजुबाजूच्या शहरांमध्ये काम शोधण्यासाठी जात आहेत. या राज्यातील लोक आपल्या शेताला पाणी, हाताला काम, चालण्यासाठी रस्ते, आरोग्याला औषध अशाच गोष्टींची मागणी करीत असते. महाराष्ट्रातील जनता आपल्या घरावर सोन्याची कौल, चालण्यासाठी गालिचा, अंगावर भरजरी वस्त्र आणि दागिने मागत नाही. तर आम्ही ज्याठिकाणी राहतो, त्याठिकाणी आम्हाला मुलभूत गरजा उपलब्ध करुन द्याव्यात.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

मधली पाच वर्षे सोडली तर 60 वर्षे काँग्रेसचेच राज्य आहे. निसर्गाने दिलेले पाणी तसेच सगळ्या गोष्टींचा उपयोग करुन हजारो हेक्टर जमीन, जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली कशी येईल याचा कधी दूरदृष्टीने विचार केला आहे काय ? माझ्यासारखा सदस्य या ठिकाणी पहिल्यांदा आल्यानंतर गेली चार वर्षे ज्या चार प्रमुख गोष्टींबद्दल चर्चा झाली त्यामध्ये सिंचन, वीज आणि अन्य गोष्टींची चर्चा झालेली या ठिकाणी पाहतो. या ठिकाणी प्रकर्षाने त्या विषयावर चर्चा होते. सभागृहामध्ये आरडाओरड होते, आम्ही कधी तरी बहिर्गमन करतो किंवा गेंड्याची कातडी असल्यासारखे समोरुन उत्तर दिले जात नाही. आम्ही राजकीय चर्चा करतो. या महाराष्ट्रामध्ये एक चिंतेची बाब सुरु झालेली आहे. पुणे, मुंबई, नागपूर, सोलापूर कोल्हापूर सातारा सांगली ही शहरे वाढत चाललेली आहेत. आज या अनेक शहरांमध्ये सांडपाण्याची व्यवस्था नाही. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. कचऱ्याच्या विल्हेवाटीची व्यवस्था नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला आहे की, औरंगाबादला किंवा मराठवाड्यामध्ये एक कॅन्सरचे हॉस्पिटल काढणार आहोत. मुंबई सोडून ती व्यवस्था कोठेही नाही. जे नागरीकरण होत चालले आहे त्याबरोबरच त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चरची व्यवस्था आपण केली आहे काय ? उदाहरण द्यावयाचे झाले तर आपण या मुंबई शहरामध्ये कितीही एफ.एस.आय. वाढवा, आपल्याला या ठिकाणी क्षितिजावर विकासच करता येणार नाही. आपल्याला आकाशातच जावे लागेल. आपण जरुर जा. 50 मजल्यांच्या इमारती बांधा पण 50 व्या मजल्यावर किंवा 49 व्या मजल्यावर, 45 व्या मजल्यावर जर आग लागली तर त्यासाठी फायर फायटिंगची व्यवस्था आहे काय ? या मुंबई शहरामध्ये श्वास घेण्यास जागा नाही. सेवानिवृत्त झाल्यानंतर संध्याकाळी म्हातारी माणसे कोठे तरी बागेत जाऊन चार माणसांनी एकत्र येऊन आपल्या सुखदुःखाच्या गप्पा माराव्यात, थोडा फेरफटका मारावा अशी व्यवस्था आहे काय ? आपण सगळे भूखंड देऊन टाकलेले आहेत. सगळे नॉन डेव्हलपमेंटचे डेव्हलपमेंट झोन केलेले आहेत. मुंबई शहरामध्ये आपण नेहरु विकास योजना आणलेली आहे. कोट्यवधी रुपये जरी आपण खर्च केले आणि घटनेप्रमाणे कोणालाही कोठेही जाण्याचा अधिकार मान्य केला तरी सुध्दा या मुंबई शहरामध्ये किती लोकांनी राहावयाचे याचा विचार आपण करणार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

की नाही ? दहा बाय दहाच्या खोलीमध्ये चार-पाच माणसांचा संसार असू शकतो पण त्या ठिकाणी जर आपण 20 माणसे कोंबली तर ? जी यातनागृहे हिटलरने ज्यूंना मारण्यासाठी दुसऱ्या महायुध्दाच्या काळात तयार केली होती तशी स्थिती रेल्वेच्या डब्यांची आहे. तशीच स्थिती कामगार वस्त्याची आहे. तशीच स्थिती झोपडपट्टयांची आहे. आपण राजकारणाने प्रभावित होऊन 1985, 1990, 2000, 2005, 2010 पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता देण्याची राजकीय स्पर्धा लावू. सत्तेचा मुकुट आपल्या डोक्यावर सतत राहावा आणि लोकांनी फक्त आपल्याला मते द्यावीत यासाठी आपण झोपडपट्टयांच्या मान्यतेच्या मर्यादा वाढवू. परंतु त्या मर्यादा वाढविल्यानंतर त्यांना पिण्यासाठी पाणी द्यावे लागते, त्यांना त्या ठिकाणी शाळा द्यावी लागते, त्यांना चालण्यासाठी रस्ता द्यावा लागतो, त्या झोपडपट्टीमध्ये एखादा दवाखाना द्यावा लागतो, त्या दवाखान्यात डॉक्टर असावा लागतो, त्या झोपडपट्टीच्या आजूबाजूला उष्टी खाण्यासाठी जे कुत्रे आहेत ते चावल्यानंतर सकाळी चर्चा केल्याप्रमाणे त्याला इंजेक्शन द्यावे लागते याचा विचार करणार की नाही ? या शहरीकरणाचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे आपण नगरपालिका, नगरपरिषदा अशा शहरांच्या विकासासाठी 189 कोटी रुपये ठेवलेले आहेत. आज या महाराष्ट्रात किती नगरपरिषदा आहेत ? अनेक लोकांच्या मागण्या येतात की, आमच्या नगरपरिषदेचे रुपांतर नगरपालिकेमध्ये करावे की, ज्यामुळे नागरीकरण झाल्यावर त्या ठिकाणी काही सुखसोयी येतील. परंतु आपण सगळेच लोक ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहोत. कोणत्याही शहरातील रेल्वे स्टेशन बघा. त्या ठिकाणी फेरीवाले आहेत. त्या ठिकाणी झोपडपट्टया आहेत. त्या ठिकाणी गलिच्छपणा आहे या सगळ्यांचा आपण विचार करणार आहोत की नाही ? शासन म्हणून जर आपण याचा विचार केला नाही तर 5-25 वर्षानंतर आपल्याला याला अतिशय गंभीर प्रकारे तोंड द्यावे लागेल. मी आताच उल्लेख केल्याप्रमाणे भारतामध्ये 27 टक्के नागरीकरण झालेले आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की ज्या ठिकाणी आपल्या अहवालाप्रमाणे 48 टक्के नागरीकरण झ ालेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रात 50 टक्के नागरीकरण झालेले आहे. नागरीकरण झाल्यानंतर त्याच्याबरोबर येणारे प्रश्न वाढत जातात. गुन्हेगारी वाढत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MMP

श्री. मधुकर चव्हाण .......

जाते. चोऱ्या वाढत जातात. बलात्कार वाढतात. माणूस मनुष्यत्वाकडून पशुत्वाकडे का चालला आहे ? त्याला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक त्या सुविधा जर आपण राज्यकर्ते म्हणून, कर्तव्य म्हणून जर आपण उपलब्ध करुन दिल्या नाहीत तर तो शेवटी कायदा हातात घेतो. हातात घेतलेला कायदा तो प्रबळांवर चालवित नाही तर त्या हातात घेतलेल्या कायद्याने दुर्बलांवर अन्याय करतो. त्या ठिकाणी जे दुर्बल आहेत., जे गरीब आहेत त्यांच्यावरच अन्याय करतो. नगरविकास खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. त्या खात्याचे लोक कधी मुंबई शहरामध्ये फिरले आहेत काय ? या मुंबई शहरातून मानखूर्दवरुन आपण पुण्याकडे जावयास निघालो तर दोन्ही बाजूला झोपड्या वाढत चाललेल्या आहेत. आजच कळव्यामधील झोपड्या पाडाव्यात अशा तऱ्हेचा आदेश नियम 93 च्या सूचनेच्या वेळी माननीय उपसभापतींनी दिले. मुंबईमध्ये लोक का येतात ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ KGS/ पूर्वी श्री.बरवड 14:55

श्री.मधुकर चव्हाण.....

कायद्याची कठोर अंमलबजावणी करणार की नाही ? हाँगकाँग हे शहर चीनमध्ये आले. परंतु शांघायच्या लोकांना हाँगकाँगमध्ये येता येत नाही. कारण तेथे जाण्यासाठी पासपोर्ट लागतो. ते शहर आपल्याच देशाचा भाग झालेला असताना सुध्दा आवो जावो घर तुम्हारा अशाप्रकारे तेथे शहरांची धर्मशाळा केलेली नाही. आज मुंबई शहराचे मोठया प्रमाणात नागरीकरण होत आहे. माननीय राज्यमंत्री श्री.धर्मरावबाबा आत्राम बसलेले आहेत. त्यांनी या मुंबई शहरातील कधी टॅक्सी पाहिलेली आहे काय ? या मुंबई शहरातील एकही टॅक्सी चांगली नाही. प्रवासाची व्यवस्था नाही, बसची व्यवस्था नाही. बेस्टच्या बसेसचे असलेले रुट कमी केले जात आहेत. आज पुणे, सोलापूर व नागपूर या शहरांमधील एका तरी रिक्षाला मीटर आहे काय ? एका तरी टॅक्सीला मीटर आहे काय ? शहरांच्या वाढीबरोबर प्रवासाच्या व्यवस्थेतही वाढ होते. त्यामुळे अनधिकृत वाहतूक करणा-यांची संख्याही वाढत आहे. छोटया छोटया जीप्समध्ये 8-10 माणसे बसू शकतात. त्याऐवजी त्या गाडीत 20-30 माणसे बसतात. म्हणजे एकूण जे नागरीकरण होत आहे त्यातून माणसांचे स्वास्थ्य संपत चालले आहे. परमेश्वराने त्याला दिलेले जीवन मुक्तपणे, चांगले जगता यावे अशात-हेचे चांगले वातावरण निर्माण करुन देणे आवश्यक आहे. कोणी गरिबीत रहायचे, कोणी श्रीमंतीत रहायचे, कोणी सायकलवरुन जायचे, कोणी मोटर सायकलवरुन प्रवास करायचा, कोणी टू-रुम किचनमध्ये रहायचे. कोणी टबबाथमधून आंघोळ करायची ? हा ज्याच्या त्याच्या कष्टातून मिळविलेल्या पैशाचा भाग आहे, ज्याच्या त्याच्या ऐपतीचा भाग आहे, काही वेळा त्यामध्ये नशीबाचा भाग असतो. परंतु शासन नागरिकांना प्राथमिक सुविधा देणार आहे की नाही ? राज्यात ऊसाचे पीक मोठया प्रमाणावर झाल्यावर या ऊस उत्पादक शेतक-यांना सवलती देण्यासाठी सभागृहात चिंता व्यक्त केली जाते. शासनाने त्याचा सम्यकपणे विचार केला पाहिजे. त्यामध्ये सोशॅलिझम आणू नये. पण शेतक-यांचे कधी एनकरेजमेंट करणार की नाही ? या भागामध्ये तू तांदूळ पिकव, या भागामध्ये तू गव्हाचे उत्पादन घे, या भागामध्ये तू साखरेचे उत्पादन कर. आज सकाळी कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांचे नुकसान झाल्यानंतर त्यांना 15 हजार रुपये देवू असे सांगितल्यानंतर सरकारने पळवाटा शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. म्हणजे ग्रामीण

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

भागातील शेतकरी तेथेच राहील, त्याच्या हाताला काम मिळेल, त्याच्या शेतीला पाणी मिळेल, त्याच्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण होतील अशी व्यवस्था केली आहे काय ? कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. इस्त्रायलमध्ये पावसाच्या पाण्यावर निरनिराळया प्रक्रिया करुन, आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन त्या पाण्याचा संच केला जातो आणि उन्हाळयाच्या काळामध्ये त्या पाण्याचा पिण्यासाठी, शेतीसाठी किंवा मानवाच्या उपयोगाच्या योजना आखल्या जातात. या प्रक्रियेचा शासनाने कधी विचार केला आहे काय ? या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा नगरविकास मंत्री या नात्याने महाराष्ट्रातील नगरपालिकांचे मुख्याधिकारी किंवा महानगरपालिकांचे आयुक्त असतील त्यांना मंत्रालयामध्ये बोलवून त्यांच्याशी विचारविनिमय केला आहे काय ? सोलापूर शहराचे नागरीकरण झालेले आहे त्यासंबंधीच्या तुमच्या अडचणी काय आहेत असे विचारले आहे का ? तुम्हाला कोणत्या सुविधा पाहिजेत ते मला सांगा, सांगलीच्या सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी तुम्हाला काय पाहिजे असे विचारले आहे का ? पुणे शहर आता बकाल होत चालले आहे. पूर्वी लोकांना असे वाटत होते की, पुणे शहरामध्ये आपली एखादी जागा असावी. आज पुणे शहर चारही बाजूने वेडेवाकडे वाढत चालले आहे. त्याठिकाणच्याच लोकांना आता चिंता वाटू लागली आहे. एकेकाळी असे वाटत होते की, बाजूच्या नाशिक शहरामध्ये जावे. पण नाशिक शहराचीही वाढ मोठया प्रमाणात होत चालली आहे. नगरविकास खात्यामध्ये केवळ एफएसआय वाटण्याचे काम केले जात आहे. युएलसी कायदा होता तेव्हा प्रत्येक प्रकरणाचा विचार केला जात होता. पण राज्याचे गृहनिर्माण मंत्री या नात्याने, या राज्याचे नगरविकास मंत्री या नात्याने या शहरांचा बकालपणा वाढत चालला आहे, ही शहरे ज्वालामुखीच्या तोंडावर उभी आहेत, त्यांचे प्रश्न काय आहेत हे जाणून घेण्यासाठी आयुक्तांची 2-3 दिवसांची बैठक घेतली आहे काय ? मुंबईसारख्या शहरासाठी 100 कि.मी.अंतरावरुन पाणी आणले जाते. या पाण्यापैकी 1000 टीएमसी पाणी चोरीला जाते. मुंबई शहराला पाणीपुरवठा करणा-या पाईप लाईन्सवर भांडूपपासून पुढील भागापर्यंत 35000 झोपडया उभ्या आहेत. त्या हटविण्याचे कोर्टाने आदेश दिले आहेत. परंतु त्या झोपडया उठविता येत नाहीत. मानखूर्दच्या दोन्ही बाजूला झोपडपट्टया वाढलेल्या आहेत.

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

झोपडयांच्या पुनर्वसनासाठी एक वसाहत निर्माण केली आहे. कोर्टाने मानवतावादाचा बुरखा घेऊन एका झटक्यामध्ये आदेश दिले की, दोन दिवसामध्ये मानखूर्द येथील झोपडया हटवाव्या आणि समोरच्या वसाहतीमध्ये त्यांना जागा द्यावी. मुंबईमध्ये 4 दिवसामध्ये आलेल्या या लोकांना 285 किंवा 225 चौ.फू.ची जागा मिळणार आहे. या मुंबई शहरामध्ये जो ड्रायव्हर आहे, कंडक्टर आहे, फेरीवाला आहे, डबेवाला आहे, जो सर्वसामान्य माणूस आहे, जो कष्ट करुन आपले जीवन जगू इच्छितो. त्याला येथे नागरी सुविधा मिळतात काय ? मला असे वाटते की, हे जे नागरीकरण सुरु आहे त्यावेळी कशाचाही विचार केला जात नाही. या शहरामध्ये ज्या रिक्षा आहेत, टॅक्सीज आहेत त्यावर मीटर बसविण्याचा निर्णय घेतला होता अशी माझी माहिती आहे. हे टॅक्सीचालक लोकांना कसे लुटत आहेत ते सर्वांनाच माहीत आहे. पण राव नावाचा एक माणूस उठतो आणि 5-50 लोकांना आझाद मैदानावर घेऊन येतो आणि शासनानेच घेतलेल्या निर्णयाला मुख्यमंत्री स्थगिती देतात. हे कायद्याचे राज्य आहे ? राज्यात 30 लाख रिक्षा चालक असतील, या लोकांनी कोटयवधी जनतेला वेठीस धरणे योग्य आहे काय ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

(श्री. मधुकर चव्हाण....)

टॅक्सी चालवणा-याने टॅक्सीला मिटर लावायला नको काय ? जगातील अनेक प्रगत शहरात गेलात तर तुम्हाला असे दिसून येईल की, तेथील टॅक्सी ड्रायव्हरला मिटरप्रमाणे डॉलर दिले की उरलेले पैसे तो परत देतो. सिंगापूर शहरातील ड्रायव्हर तुम्हाला बिल देखील देतात. तुम्ही फक्त इथे कमवायला आलेले आहात. तुम्ही भ्रष्टाचार करता असे मी तुम्हाला राजकारणाने प्रेरीत होऊन बोलत नाही. का तुम्ही स्टे दिलात ? चार वर्षे झाली. या शहरांची आणि वाहतुकीची अवस्था काय आहे हे कधी तुम्ही पाहिलेले आहे काय ? या शहरामध्ये लोक गाड्या पार्क करु शकतात की नाही हे कधी तुम्ही पाहिलेले आहे काय ? टॅक्सीची अवस्था तुम्ही कधी पाहिली आहे काय ? तुम्ही बसू शकणार नाही इतक्या टॅक्सीज घाणेरड्या आहेत. शहरीकरण होत चालले आहे. पण या होणा-या नागरीकरणाबरोबर नागरिकांना भेडसावणारे जे प्रश्न निर्माण होतात त्यांचा विचार कधी तुमच्या मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीमध्ये झालेला आहे काय ? ज्या महाराष्ट्राच्या जनतेने सत्तेचा मुकूट तुमच्या डोक्यावर ठेवलेला आहे त्यांचा विचार तुम्ही कधी केलेला आहे काय ? तुम्ही नेहमी सांगता, कधी टिंगल करुन सांगता , जाता की राहाता, जाता की राहाता, आम्ही देणार पण आणि जाणार पण नाही. आईच्या पोटातून तुम्ही सत्तेचा मुकूट घेऊन जन्माला आलेला नव्हता. लोकांना उल्लू बनवून, मायाजाल पसरवून, खोटीनाटी आश्वासने देऊन सत्ता प्राप्त केलेली आहे. तुमच्या नशिबाने तुम्हाला सत्ता मिळाली. पण याची चिंता करणार की नाही ? सांगलीला पिण्यासाठी शुध्द पाणी नाही. साता-याला पिण्यासाठी पाणी आहे काय ? सोलापूरची झोपडपट्टी पाहिली आहे काय ? तेथील हातमागाची अवस्था पाहिली आहे काय ? आजूबाजूचे शहर पाहिले आहे काय ? कोल्हापूर, सांगलीची अवस्था पाहिली आहे काय ? पुण्याची अवस्था पाहिली आहे काय ? उल्हासनगर, अंबरनाथ अशासारखी छोटी छोटी शहरे पाहिली आहेत काय ? डोंबिवली, नवी-मुंबई ही शहरे तुम्ही पाहिली आहेत काय ? नागरीकरणाची आज काय अवस्था झालेली आहे याची राज्यकर्ते म्हणून या गोष्टींची कधी चिंता करता काय ? मुंबई शहरामध्ये फिरायला किंवा श्वास घ्यायला एक जागा शिल्लक राहिलेली नाही. नगरसेवक किंवा आमदारांच्या फंडातून कुठे चालण्यासाठी वॉकिंग ट्रॅक्स निर्माण केले जातात. मुलांना खेळण्यासाठी मैदाने नाहीत. मुंबई बंद असेल त्यावेळी किंवा रविवारच्या दिवशी मुंबईतील मुले रस्त्यावर क्रिकेट खेळतात. शहरातील लोकांना तुम्ही काय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

दिलेत ? अशा प्रकारे ही शहरे फोफावत चालली आहेत. ही शहरे ज्वालामुखीच्या तोंडावर उभी आहेत. अतिशय गलिच्छ अवस्थेत ही शहरे आहेत. महाराष्ट्रातील शहरातून तुम्ही कधी फेरफटका मारलेला आहे काय ? आज गावे ओस पडत चालली आहेत आणि याची चिंता राज्यकर्त्यांनी कधीच केली नाही. आपण कम्युनिस्टांसारखा, रशियासारखा कायदा करु शकत नाही. गावातला माणूस गावात राहील यासाठी सर्वांना एकत्रितरीत्या सामुदायिक शेती करायला लावून आपण कम्युनिझम स्थापन करु शकत नाही. मुंबई शहरातले तुमचे अनेक मंत्री दिल्लीला जातात. ते कशासाठी जातात ? देशाच्या पंचवार्षिक योजनामधील आपल्या ज्या योयजना आहेत त्या राबवून घेण्यासाठी ते दिल्लीला जात नाहीत. महाराष्ट्रातील पाटबंधा-यासाठी, धरणांसाठी, पंतप्रधान ग्राम सडक योजनेसाठी पैसे द्या असे सांगण्यासाठी ते दिल्ली आज नाहीत. तर श्री. नारायण राणे यांना मुख्यमंत्री करा किंवा मला करा, याला करा किंवा त्याला करा, राज्यपालांनी नामनियुक्त करावयाच्या यादीमध्ये माझे नाव घाला किंवा याचे नाव घाला, यासाठी ते जातात. कधी नियोजन मंडळाच्या ऑफीसबाहेर तुमचा नियोजनमंत्री जाऊन बसलेला आहे काय ? पाटबंधारे मंत्री कधी केन्द्रामध्ये जाऊन बसलेला आहे काय ? अर्थमंत्री कधी केन्द्रात जाऊन बसला आहे काय ? या मुंबई शहरातून 40 टक्के टॅक्स जातो. त्यामधील पै न पै पैसा माझ्या मुंबई शहरासाठी हवा अशी मागणी मंत्र्यांनी कधी केलेली आहे काय ? देशातील कोणतीही व्यक्ती कोठेही राहू शकते हे घटनेमध्ये सांगितलेले आहे. भारतीय जनता पक्षाचा त्याला विरोध नाही. पण या महाराष्ट्रामध्ये कोणीही येऊन राहाणा-या माणसाला चालायला रस्ता लागतो, पिण्यासाठी पाणी लागते, राहाण्यासाठी घर लागते, आजारी पडल्यानंतर औषध लागते, पोराबाळांना शिकण्यासाठी शाळा लागते, त्यांनी आंघोळ केलेले सांडपाणी वाहून जाण्यासाठी इनटेकही नाही आणि आऊटलेटही नाही. या सर्व गोष्टींची व्यवस्था असावी लागते. या गोष्टींची तुम्ही काळजी करा. लालूप्रसादला आपण विचारा. ते म्हणतात सब को रहने का अधिकार है. है ना भाई, कोई ना नही बोलता. पण इथे आलेल्या सर्व माणसांना सुविधा कोण देणार ? म्हणून हा जो प्रस्ताव मी या ठिकाणी मांडलेला आहे त्या संदर्भात सर्वंकष विचार करण्याची आवश्यकता आहे. शहरीकरणाचे जे प्रमाण आहे ते

..3..



MSS/ KTG/ SBT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

स्टेबल राहील आणि गावातील माणसे गावात राहातील, शेतीचा विकास कसा होईल, शेतक-याचा सर्वांगीण विकास कसा होईल, त्याला गावातच रहावेसे कसे वाटेल यादृष्टीने विचार केला पाहिजे.

सभापती महोदया, सकाळी विजेच्या संदर्भात एका प्रश्नाला जे निर्दय उत्तर दिले आहे ते मी आपणास वाचून दाखवून मी माझे भाषण संपवितो. माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा शैक्षणिक जीवनातील एक महत्वाचा टप्पा आहे. मात्र त्याचप्रमाणे विविध शाखातील पदवी परीक्षा अभियांत्रिक, वैद्यकीय व माहिती तंत्रज्ञान इत्यादी पदवी परीक्षा विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून तितक्याच महत्वाच्या असतात.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

शालांत परीक्षेच्या दरम्यान भारनियमन कमी करण्यासंदर्भात अपेक्षित असणारी कार्यवाही वर नमूद केलेल्या अन्य परीक्षांच्या कालावधीतही मागणी आल्यास त्याला वेगळा न्याय द्यावा लागणार नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी उल्लेख केला की, राज्य शासनाने शाळा कधी पाहिल्या आहेत काय ? त्या शाळांची अवस्था काय झाली आहे याची कधी पाहणी केली आहे काय ? या शाळांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. त्यात सुधारणा करणे फारच गरजेचे आहे. शाळांच्या इमारती दुरुस्त करणे आवश्यक आहे. सगळया नागरी जीवनाचा असमतोल निर्माण झालेला आहे तो दूर करणे आवश्यक आहे. आज शहरे मोठया प्रमाणात वाढत चालली आहेत,त्याच्याकडे अतिशय काळजीपर्वूक लक्ष घालणे आवश्यक आहे. येत्या 25 वर्षात महाराष्ट्रातील वेगवेगळया शहरातील लोकसंख्या किती वाढेल? तसेच ती यापेक्षा जास्त वाढणार नाही असे गृहीत धरुन सगळया योजना राज्य शासनास राबवाव्या लागणार आहेत. म्हणून माझा अशासकीय ठराव सभागृहाने मंजूर करावा अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी " राज्यात झपाटयाने होत असलेले शहरीकरण, जवळजवळ निम्म्यापेक्षा अधिक जनता शहरामध्ये रहात असणे, त्यामुळे शहरातील पायाभूत नागरी सुविधांवर त्याचा होणारा विपरित परिणाम, त्यातच ग्रामीण भागातील जनता शेती परवडत नसल्यामुळे शहराकडे मोठया प्रमाणावर स्थलांतरीत होत असणे, परिणामी राज्यातील लाखो एकर जमीन शेतीविना ओस पडत असून शेती उत्पादनावर त्याचामोठया प्रमाणावर होत असलेला अनिष्ट परिणाम, ही परिस्थिती लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेचे शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी ग्रामीण भागातील शेती व्यवसायालायोग्य ते प्रोत्साहन देऊन रोजगार उपलब्ध करण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्यात यावी " अशा विषयाचा अशासकीय ठराव मांडला आहे त्यास अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वाढते शहरीकरण, ग्रामीण भागातील जनतेला शेती परवडत नसल्यामुळे त्यांचे शहराकडे होत असलेले स्थलांतर या बाबतीतील मूळ समस्यांवर अतिशय चांगल्याप्रकारे भाष्य केले आहे. तसेच त्यांनी मुंबई शहरातील तसेच ग्रामीण भागातील ऑटो रिक्षा आणि प्रवासी टॅक्सी यासंदर्भात उल्लेख केला. या ठिकाणी माननीय परिवहन मंत्री उपस्थित आहेत. ऑटो रिक्षा चालकांच्या ज्या काही अडचणी आहेत त्या प्रथम समजून घेण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य हे बृहन्मुंबईत राहतात. मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, बृहन्मुंबईत ऑटो रिक्षा चालकांचे प्रश्न नाहीत. परंतु मुंबईतील आणि उर्वरित महाराष्ट्रातील ऑटो रिक्षा चालकांचे प्रश्न खूपच गंभीर आहेत. ऑटो रिक्षा चालकाच्या वेदना आणि त्यांचे दु:ख समजून घेण्याची गरज आहे. ऑटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मीटर लावले गेले पाहिजेत अशा प्रकारची त्यांनी आग्रहाची मागणी या ठिकाणी केली आहे. या प्रस्तावावर मला वेगळया भावनेने बोलावयाचे होते. परंतु ऑटो रिक्षांचा या ठिकाणी उल्लेख केला गेला म्हणून त्यासंदर्भात मी थोडेसे बोलणार आहे. मुंबई उपनगरात जवळपास 1 लाख 20 हजार ऑटो रिक्षा आहेत. या ऑटो रिक्षामुळे लोकांना थोडासा दिलासा आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी ऑटो रिक्षा चालकांच्या बाबतीत ज्या व्यथा मांडल्या त्या योग्य आहेत. सध्या रिक्षा चालक हे मनात येतील तसे ग्राहकांकडून भाडे वसूल करतात म्हणून ऑटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मीटर बसविले गेले पाहिजे. जर इलेक्ट्रॉनिक्स

....3...



श्री. मधुकर सरपोतदार....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मीटर लावले तर रिक्षा चालक ग्राहकांना लुबाडणार नाही. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, ऑटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मीटर का लावण्यात येऊ नये यासंदर्भात परिवहन मंत्री तसेच त्या विभागाचे अधिकारी यांचे बरोबर बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीस महाराष्ट्रातील ऑटो रिक्षा चालकांचे प्रतिनिधी आले होते. त्यावेळी या विषयावर सविस्तर चर्चा झाली आहे. ऑटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मीटर लावण्याच्या निर्णयास शासनाकडून स्थगिती देण्यात आलेली आहे अशा प्रकारचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. परंतु ही स्थगिती का देण्यात आली आहे याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. मुंबईतील रस्ते, मुंबईतील उपनगरातील रस्ते, अतिशय खराब आहेत. मुंबईतील सर्व रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडलेले असतात. मुख्य रस्ता फक्त चांगला असतो. परंतु इतर सर्व रस्त्यावर खड्डे पडलेले असतात. ऑटो रिक्षांना इलेक्ट्रॉनिक्स मीटर बसविले आणि तशा रिक्षा चालविल्या तर ते खूपच अडचणीचे होईल. त्याचे कारण असे की, रस्त्यावरील एखाद्या खड्डा रिक्षाने ओलांडला तरी इलेक्ट्रॉनिक्स मीटरचे रिडींग आपोआप पुढे जाते. .

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

ही परिस्थिती तपासली किंवा नाही. इलेक्ट्रॉनिक मिटर लावण्यासाठी विरोध का होत आहे याचा शोध घेतला पाहिजे. कुठल्याही रिक्शा किंवा टॅक्सी चालकाचा मिटरचा चांगल्या पध्दतीने वापर झाला तर त्याचा विरोध नाही. इलेक्ट्रॉनिक मिटर बसविण्याचे ठरविले तर प्रत्येक रिक्शा-टॅक्सी चालकाला 12/13 हजार रुपयांचा खर्च येणार आहे. मुंबईमध्येच नव्हे तर ठाणे,पुणे या शहरात सुध्दा रिक्शा आहेत. या शहरांमध्ये रिक्शा ठेवण्यासाठी जागा नाही. कारण बहुतांशी रिक्शा-टॅक्सी चालक झोपडपट्टीत राहतात. रिक्शा कुठे तरी गल्लीत ठेवून रात्री झोपायला घरी जातात. इलेक्ट्रॉनिक मिटर बसविले तर ते सकाळी राहणार नाहीत त्याची चोरी होईल. आजकाल शहरामध्ये माणसे जिवंत रहात नाहीत. वृध्द महिलांची गळा दाबून हत्या केली जात आहे. प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्या सुध्दा अतिशय गंभीर आहेत. रिक्शाच्या मिटरना सुरक्षिततता नाही. दुसरी गोष्ट म्हणजे जी कंपनी रिक्शांचे मिटर प्रोडयूस करणार आहे त्याची आरटीओ यांच्यासमोर ट्रायल घेतली तेव्हा कंपनी कोणत्याही तऱ्हेने या मिटरची सुरक्षितता पटवून देऊ शकली नाही. तसेच मिटर खराब होणार नाहीत याची गॅरंटी देऊ शकले नाहीत. इलेक्ट्रॉनिक मिटर लावले तर रोज रिक्शाचालक आणि प्रवासी यांच्यामध्ये भांडणे होतील. ती सोडविण्यासिाठी पोलिसांना वेळ कुठून असणार आहे. आधीच पोलिसांकडे रोज असंख्य प्रकारच्या हजारो तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यात ही आणखी भर पडणार आहे. हे इलेक्ट्रॉनिक मिटर बसविण्यासाठी प्रत्येक रिक्शाचालकाला 12 ते 13 हजार रुपयांचा खर्च येणार आहे. एवढा खर्च करुन रिक्शा चालवायचे ठरविले तरी मुंबईत योग्य प्रकारचे रस्ते नाहीत. गल्लीबोळात रिक्श ठेवाव्या लागतात त्यांचे काय होणार हा प्रश्न आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुनय याबाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. संपूर्ण माहिती घेऊनच यावर निर्णय घेतला पाहिजे. माझी शासनाला विनंती आहे की या सर्व गोष्टी तपासून पहाव्यात. रिक्शा युनियन फक्त श्री. शरद रावच चालवीत नाहीत. आमच्याकडे सुध्दा रिक्शाचालकांची युनियन आहे आणि त्या श्री. राव यांच्या युनियन पेक्षा अधिक सदस्य आहेत. श्री. शरद राव फक्त घोषणा करतात संप करु. रिक्शा चालू देणार नाही. घोषणा करणारे पुढारी खूप आहेत. घोषणाबाजी आणि जाहिरातबाजी जोरात सुरु आहे. आमच्याकडे हायवेवर 8/10 फुटांचे होर्डींग्ज लावले जातात. होर्डिंग्जवर पुढाऱ्यांचे फोटो दिसतात. त्यांचे कार्य कोणते ते माहीत नसते. प्रसिध्दी माध्यमे जबरदस्त आहेत. एकेका

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ KGS/ 15:10

श्री. मधुकर सरपोतदार ....

पेपरला ट्रॅव्हलची संपूर्ण पानभर जाहिरात असते. जाहिरातीवर जग चालते. चुकीची माहिती टीव्ही आणि जाहिरातींद्वारे दिली जाते. रोज रोज तीच तीच जाहिरात बघून लोक उत्पादने खरेदी करतात आणि खरेदी केल्यानंतर त्यातील फोलपणा दिसून येतो. चुकीच्या गोष्टभ मार्केटमध्ये कशा खपविल्या जातात याचा माणसाला अंदाज येतो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 15.15

श्री.मधुकर सरपोतदार...........

जाहिरातीच्या युगामध्ये कोणत्याही गोष्टी करताना प्रथम त्या तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. यासाठी मला मुद्दाम सांगावयाचे आहे, माननीय परिवहन राज्यमंत्री याठिकाणी बसले आहेत, मला असे कळले आहे की, शासनाने नवीन सर्क्युलर काढून ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याची व्यवस्था सक्तीची केली आहे. या संदर्भात असे ठरले होते की, माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत 30 सप्टेंबर, 2007 पर्यंत सर्व संबंधितांची बैठक घेण्यात येईल. तोपर्यंत रिक्षाचालकांच्या अडचणी विभागासमोर, माननीय मुख्यमंत्र्यांसमोर मांडायच्या. अडचणी मांडल्यानंतर त्या संदर्भात निर्णय घेण्यात येणार होता. परंतु तसे घडलेले नाही. सप्टेंबर महिना संपून आता मार्च महिना सुरु आहे. सहा महिने उलटून गेले आहेत. याबाबत काय निर्णय झाला हे आम्हाला कळले नाही. शासनाने इलेक्ट्रॉनिक मिटरची सक्ती केली असली तरी स्थगिती अद्याप सुरु आहे. परंतु सक्ती करण्यापूर्वी सर्व रिक्षाचालकांना बोलवावे, त्यांच्या युनियनचे पदाधिकारी हे बहुतांश रिक्षाचालक आहेत, त्यांच्यासमवेत बैठक घेऊन पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय इलेक्ट्रॉनिक मिटरची सक्ती करु नये असे मला विनम्रपणे सुचवावयाचे आहे.

सभापती महोदया, मुंबईतील टॅक्सीकरिता नवीन वातानुकूलित वाहने उपलब्ध झालेली आहेत. पूर्वी फियाट गाड्या टॅक्सीसाठी वापरल्या जात होत्या. आता फियाट गाडीचे उत्पादन बंद झाले. आजही मुंबई शहरामध्ये टॅक्सीकरिता जी जूनी फियाट वाहने वापरात आहेत त्यांची अवस्था इतकी दयनीय स्वरुपाची असते की, अशा टॅक्सीमध्ये प्रवासी बसल्यानंतर त्याचे डोके दुखल्याशिवाय राहणार नाही. एखादा विदेशी नागरिक अशा टॅक्सीमध्ये बसल्यानंतर त्याच्या मनात काय भावना निर्माण होईल याचा कधी विचार करणार आहात की नाही?

सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मुंबई हे शहर जागतिक दर्जाचे बनविण्याचा उल्लेख केलेला आहे. परंतु जागतिक दर्जाचे शहर बनविताना किमान चांगल्या दर्जाची वाहने टॅक्सीकरिता उपलब्ध असावीत, त्यासाठी कर्जाची व्यवस्था करण्यात यावी. तरच मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर होऊ शकते. अन्यथा जागतिक दर्जा येणार कुठून? आज फुटपाथवर धंदे स्थापन होत आहेत, सगळ्या फुटपाथवर झोपड्या उभारल्या जात आहेत. संपूर्ण मुंबईमध्ये भयानक दृश्य दिसत आहे. आजच्या प्रस्तावातील प्रमुख मुद्दा नागरिकरणाचा आहे. खेडयातून मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक अशा मोठया शहरांमध्ये नागरिकांचे लोंढे येत आहेत.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

शहरामध्ये लोंढे येण्याचे प्रमुख कारण म्हणजे याठिकाणी मोलमजुरी मिळते. मुंबई शहरात कोणावरही उपाशी राहण्याची पाळी येत नाही. पोट भरते या भावनेने मुंबईत नागरिकांचे लोंढे येत आहेत. परंतु आज मुंबई हे शहर जगातील अत्यंत बकाल शहर म्हणून पहिल्या क्रमांकावर आहे. त्यादृष्टीने या शहराकडे पाहिले पाहिजे. उद्योगांचे विकेंद्रीकरण होण्याची आवश्यकता असताना त्याची अंमलबजावणी होत नाही. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी स्थापन करण्याची शासनाने घोषणा केली. परंतु प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी आहे का? ज्याठिकाणी स्थापन केली आहे तेथे पुरेसा वीज पुरवठा आहे का? अनेक छोटे मोठे उद्योगधंदे बंद पडले आहेत. शेतकऱ्यांकडून सक्तीने भूखंड संपादित करायचे, उद्योजकांना ते विकायचे. परंतु उद्योग काढल्यानंतर वीज नाही. वीज असेल तर पाणी नाही. पाणी असेल तर इतर सुविधा नाहीत. इन्फ्रास्ट्रक्चर नसल्यामुळे उद्योजकांचे हाल होत आहेत. हा प्रस्ताव अत्यंत चांगला आहे. परंतु त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने बोलले पाहिजे. शहरातील पायाभूत नागरी सुविधांवर होणारा विपरित परिणाम याचे मूळ कारण एकच आहे, ते म्हणजे या शहरामध्ये किती लोकांना आपण सामावून घेऊ शकतो? या शहराची क्षमता किती आहे? सन्माननीय सदस्यांनी आताच सांगितले की, 60 लाख लोकांना सामावून घेण्याची या शहराची क्षमता आहे. मी मुंबई शहरात 1950 साली आलो, त्यावेळी या शहराची लोकसंख्या 35 ते 40 लाख इतकी होती. त्यावेळी मुंबई शहरातील फूटपाथ प्रत्येक आठवड्याच्या शनिवार-रविवारी पाण्याने धुतले जायचे. मुंबई शहर हे चकाचक होते. आज या शहराची विल्हेवाट लावली आहे. राज्यकर्ते बदलले. लोकशाहीचे राज्यकर्ते सत्तेवर आले. त्यांनी प्रत्येक गोष्टीत "आओ जाओ घर तुम्हारा" ही भूमिका घेतल्यामुळे या शहरात त्याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. फोर्ट, मलबार हिल, जुहू किंवा इतर श्रीमंतांची वस्ती असलेले भाग वगळले तर संपूर्ण मुंबई शहर बकाल होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई शहराकडे खेडयातील जनता आकृष्ट होऊ नये यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. आज रोजगार हमी योजनेवर सुध्दा ग्रामीण भागातील लोकांना काम मिळत नाही अशी स्थिती आहे.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(नंतर श्री.खर्चे....

श्री. मधुकर सरपोतदार..........

म्हणजे जी सवलत मिळत होती ती देखील बंद झाली त्यामुळे आता लोकांनी काय करायचे ? आपले कुटुंब कसे चालवावयाचे हा विचार सर्वांच्या नजरेसमोर येत आहे त्यादृष्टीने उपाययोजना करावयाची असेल तर सर्व उद्योगांचे विकेंद्रीकरण करुन गावातच जवळपास अशा प्रकारचे उद्योग निर्माण केले, अथवा शेतीला पूरक उद्योगधंदे निर्माण केले आणि त्या त्या भागातील लोकांना गावाच्या जवळच रोजगार उपलब्ध करुन दिला तर मुंबई, पुणे, औरंगाबाद, पुणे, सांगली, मिरज, कोल्हापूर अशा मोठमोठया शहरांकडे वळणारे लोंढे कमी होतील या पार्श्वभूमीवर हा प्रस्ताव चांगला आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, माझी विनंती अशी होती की, हा जो अशासकीय ठराव आलेला आहे त्यामध्ये आवर्जुन असा उल्लेख केला आहे की, ग्रामीण भागातील शेती परवडत नाही त्यामुळे शहरांकडे लोंढे वाढतात.......

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, माझा मूळ ठराव असा नव्हता, त्यात सचिवांनी बदल केला आहे. माझ्या ठरावामध्ये शहरीकरण झपाटयाने वाढत असल्यामुळे त्याची चिंता आहे आणि ग्रामीण भागात विकासाच्या योजना राबविल्या पाहिजेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्या मूळ प्रस्तावात जर बदल केला असेल तर तो कोणी व का केला त्याचा शोध लागणे आवश्यक आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, या ठिकाणचा प्रस्ताव असा आहे की, ग्रामीण भागातील जनतेचे शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी ग्रामीण भागातील शेती व्यवसायाला योग्य ते प्रोत्साहन देऊन रोजगार उपलब्ध करण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा करीत आहे. यातला ऑपरेटीव्ह पार्ट हा आहे की, ग्रामीण भागात शेतीला प्रोत्साहन देऊन शहराकडे येणारा लोंढा थांबवावा.....

श्री. मधुकर चव्हाण : वस्तुस्थिती अशी आहे की, शासनाच्या कर्तृत्वामुळेच लोक शहरांकडे येत आहेत. प्रत्येक वेळेस शब्दच्छल करु नये असे मी काल देखील सांगितले.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : मूळ ठरावानुसार सांगावयाचे तर ग्रामीण भागातील जनतेचे स्थलांतर रोखण्यासाठी ग्रामीण भागातच शेती व्यवसायाला आवश्यक ते प्रोत्साहन देऊन रोजगार उपलब्ध करण्यासाठी उपाययोजना करावी. आम्हाला असे वाटते की, शेती व्यवसायामध्ये पूरक उद्योगधंदयाला जास्त संधी नसल्यामुळे किंवा शेतीला उद्योगाचा दर्जा नसल्यामुळे ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही व त्यामुळेच स्थलांतर होत आहे आणि शहरांची लोकसंख्या 42 टक्क्यापर्यंत वाढत आहेत. म्हणून शेतीला पूरक उद्योग उपलब्ध झाले तर लोक शहरांकडे वळणार नाहीत व ग्रामीण भागातील लोंढे बंद होण्यास मदत होईल, यादृष्टीने शासन काय उपाययोजना करणार आहे? म्हणून माननीय कृषी मंत्र्यांनी त्यांचा मुद्दा स्पष्ट केला.

श्री. मधुकर सरपोतदार : महोदया, सन्माननीय सदस्यांनी ज्या पध्दतीने हा विषय मांडला आहे........

**तालिका सभापती** : त्यांनी झालेले परिणाम बरोबर मांडले पण यापुढील काळात हे परिणाम वाढू नयेत किंवा त्यासाठी काय करणार आहेत हे सांगण्यासाठीच मंत्री महोदय येथे आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : शेतीची चर्चा करायचे म्हटले तर तो एक स्वतंत्र विषय होऊ शकतो. त्यात शेतीच्या अडचणी, शेतीला लागणारे पाणी, शेतीसाठी जनावरे व नांगर, इन्फ्रास्ट्रक्चर कोणते अपुरे पडते, जमिनीचा कस कशा प्रकारे कमी झाला, कृषीला उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे, गावाच्या जवळपास उद्योग उभे राहू शकतात की नाही अशा विविध प्रकारचे विषय शेतीच्या बाबतीत मांडले जाऊ शकतात. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे )** : शहरी भागाकडे येणारे लोंढे थांबावे व कृषी क्षेत्राला प्रोत्साहन मिळावे एवढा विषय या अशासकीय ठरावामध्ये आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, शहरीकरण रोखण्यासाठी शासन काय करणार आहे तसेच शहरामध्ये परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे येत असल्यामुळे त्याचा ताण शहरातील सुविधांवर पडलेला आहे त्यासंदर्भात शासन काय करणार आहे ?

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अशासकीय ठरावावर आपले विचार व्यक्त करावेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदविधर ) : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी मांडलेला अशासकीय ठराव क्रमांक 68 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठरावावर आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदया, वाढत्या लोकसंख्येमुळे, शहरांमध्ये ग्रामीण भागातून तसेच परप्रांतांतून लोकांचे लोंढेच्या लोंढे येत असल्यामुळे, त्याचा परिणाम शहरातील मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यावर झालेला आहे. आज मुंबई शहरामध्ये ग्रामीण भागापेक्षा परराज्यातून परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढेच्या लोंढे मुंबईमध्ये नोकरीसाठी किंवा चरितार्थासाठी येत आहेत व त्याचा ताण मुंबई शहराच्या मुलभूत सोयीसुविधेवर पडत आहे. आज परराज्यातील माणूस मुंबईमध्ये आपली गुजराण करण्यासाठी येत आहेत. खेडयाच्या माणसाला शहरात येण्यास परावृत्त करण्यासाठी त्याला तेथेच काम देणे आवश्यक आहे, त्याच्या मुलांना चांगले शिक्षण, सोयी सुविधा, उच्च शिक्षण, वैद्यकीय सुविधा कशा मिळतील हे पाहिले पाहिजे. त्याच्या शेतीला चांगले दिवस कसे येतील, त्याच्या शेतमालाला जास्त भाव कसा मिळेल याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज मुंबई शहराची कॅपॅसिटी संपलेली आहे. मुंबईची लोकसंख्या 60 लक्ष होती आता ती 1 कोटीच्या वर गेलेली आहे. कोल्हापूर, पुणे, नाशिक या शहरांची देखील मर्यादा आता संपलेली आहे. कारण परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे शहरात आल्यावर त्याचा परिणाम त्या शहराच्या मुलभूत सोयीसुविधेवर पडत असतो, मुंबईतील अनेक हॉस्पीटल्सवर त्याचा ताण पडत असतो, पाणी पुरवठयाच्या व्यवस्थेवर ताण पडत असतो, वाहतुकीवर ताण पडत असतो. ग्रामीण भागातील जनतेला सर्व सुविधा तेथेच मिळाल्या तर ग्रामीण भागातील माणूस शहरी भागात येणार नाही. आज परराज्यातून मुंबईमध्ये लोंढेच्या लोंढे बांधकामाच्या कामासाठी, औद्योगिकरणाच्या कामासाठी येत आहेत. बाहेरुन आल्यानंतर राहण्यासाठी काही तरी सोय व्हावी म्हणून झोपडपट्टयांमध्ये हे लोक राहतात व पर्यायाने झोपडपट्टयांची संख्याही वाढते व शहरे बकाल होतात. हे लोक येथेच स्थायीक झाल्यामुळे शहराच्या सर्व मुलभूत सोयीसुविधेवर त्याचा विपरीत परिणाम होतो. भारतीय नागरीकाला कोठेही जाऊन पोट भरण्याचा तसेच स्थायिक होण्याचा अधिकार आहे परंतु जसे यु.के. किंवा यु.एस.ए. मध्ये माणूस जातो तेव्हा त्याला वर्किंग व्हिसा दिला जातो व त्याचे काम संपल्यानंतर त्याला परत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....3

डॉ. दीपक सावंत ......

त्याच्या देशामध्ये पाठविले जाते तशाच प्रकारची अंमलबजावणी आपल्याकडेही होण्याची आवश्यकता आहे. बाहेरच्या राज्यातून जे लोक येथे येतात, त्यांचे कांम संपल्यानंतर त्यांना सुध्दा त्यांच्या राज्यात परत पाठविले पाहिजे असे जर झाले तर शहराच्या मुलभूत सोयीसुविधेवर त्याचा ताण पडणार नाही. आज शहरांची रहिवाशांना मुलभूत सोयीसुविधा पुरवण्याची क्षमता संपलेली आहे. खरे म्हणजे जोपर्यंत शेतीला इंडस्ट्रीजचा दर्जा, शेतमालाला योग्य भाव, फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग, सर्व शेत मालावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात निघत नाहीत तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही त्यामुळे हे सर्व उद्योग ग्रामीण भागात सुरु झाले पाहिजेत. जोपर्यंत हे उद्योग ग्रामीण भागात सुरु होत नाही तोपर्यंत ग्रामीण भागातील माणूस कधीही सेटल होऊ शकणार नाही. जास्तीत जास्त पैसे आपल्याला कसे कमावता येतील यासाठी माणूस प्रयत्न करीत असतो, आपल्या मुलांना चांगले शिक्षण, चांगले घर कसे मिळेल, यासाठी माणूस प्रयत्न करीत असतो. जोपर्यंत शेतीला इंडस्ट्रीजचा दर्जा मिळत नाही, तोपर्यंत हा प्रश्न सुटू शकणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.सुंबरे 15.30

डॉ.दीपक सावंत .

आपल्या मुलाची प्रगती व्हावी असे प्रत्येक पालकाना वाटत असते. आपण आर्थिक अडचणीतून दिवस काढले असल्यामुळे आपल्या मुलांना असे दिवस काढावे लागता कामा नये म्हणून मुलांना बाहेर पाठविण्याचा प्रयत्न केला जातो. सभापती महोदया, जोपर्यंत शेतीला उद्योगाचा दर्जा दिला जात नाही, जोपर्यत शेतीला वीज, पाणी, हातपंप आणि आवश्यक ते साहित्य दिले जात नाही तोपर्यन्त शेतक-याची प्रगती होणार नाही. आजची शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक विवंचना सहन करावी लागते. त्यातून त्याला नैराश्य आल्याने तो आत्महत्या करतो. परंतु या शेतकऱ्याला दारु पिण्याचे व्यसन होते वा त्याच्यावर मुलीच्या लग्नाचे कर्ज होते म्हणून त्याने आत्महत्या केली असे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात या शेतकऱ्यांची काय अवस्था आहे हे आपण पाहत नाही.

सभापती महोदया,राज्य शासनाने या संदर्भात पुढाकार घेऊन ग्रामीण भागात लघू उद्योग सुरु करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या ठिकाणी चांगली शेती आहे त्या भागामध्ये खताचे कारखाने सुरु केले पाहिजेत. ग्रामीण भागातील माणसे जर त्याच ठिकाणी राहण्यास तयार असतील तर तेथे शाळा, कॉलेजेस, वैद्यकीय सुविधा, मार्केट इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.आज मॉल संस्कृतीमुळे शेतकरी आपला शेती माल या मॉलमध्ये विकू शकतो. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये मॉल उभे करण्यात आले पाहिजे. त्याचबरोबर जोपर्यत शेतीला उद्योगाचा दर्जा दिला जात नाही तो पर्यंत हा प्रश्न सुटणार नाही असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. तेव्हा हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदया, आज अनेक ठिकाणचे उद्योगधंदे बंद पडत चालले आहेत. ते सुरु करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. कुडाळमधील अनेक कारखाने बंद पडलेले आहेत, पिंपरी चिंचवडमध्ये, चिपळूणमध्ये देखील तीच परिस्थिती आहे तेव्हा बंद पडलेले उद्योग सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. तसे करण्यात आल्यामुळे ग्रामीण भागातील मनुष्य त्या ठिकाणीच राहील . एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. त्यांनी मांडलेला अशासकीय ठराव अतिशय महत्वाचा आहे. या ठरावामध्ये वाढते शहरी करण हा एक महत्वाचा भाग आहे. केवळ मुंबई शहराच्या संदर्भातच नागरीकरण वाढत आहे असे नाही तर महाराष्ट्रातील अनेक शहरामध्ये नागरीकरण वाढत आहे. मुंबईमध्ये जागा नसल्यामुळे तेथील लोक ठाण्यामध्ये येतात त्यामुळे येथील लोकसंख्या एक कोटीच्या वर गेली आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण ठाणे शहरावर मोठया प्रमाणावर पडतो. मुबईत जागा नसल्यामुळे अनेक लोक ठाणे जिल्हयात राहण्यास येतात. त्यामुळे येथील लोकसंख्या सतत वाढत आहे. या जिल्हयातील ग्राम पंचायतीच्या नगरपालिका झाल्या आहेत, नगरपालिकांच्या महानगरपालिका झाल्या आहेत. राज्यातील ठाणें हा एकमेव जिल्हा असा आहे की, त्या ठिकाणी सर्वात जास्त म्हणजेच सहा महानगरपालिका आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीणं भागातील लोक मुंबईला येत असतात. पूर्वी मुंबईतील कापड गिरण्या सुरु असल्यामुळे कोकणातून अनेक जण या गिरण्यांमध्ये काम करण्यासाठी मुंबईला येत होते परंतु आता संपूर्ण देशातून अनेक लोक मुंबईला येतात त्यांना रोखण्याकरिता शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे असे मला या ठरावाच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, यानंतर मला राज्यातील एम.आय.डी.सी.च्या सदर्भात एक मुद्दा मांडावयाचा आहे. तळोजा पासून कुडाळ पर्यंत दहा हजार एकर जमीन एम.आय.डी.सी.ने घेऊन ठेवलेली आहे. त्या ठिकाणी उद्योग सुरु करण्यासाठी विविध उद्योजकांनी एम.आय.डी.सी.कडून जमिनी घेतल्या एकदा जमीन घेतल्यानंतर तीन महिन्यात उद्योग सुरु केला पाहिजे परंतु अनेक उद्योजकांनी तेथे उद्योग सुरु केलेले नाहीत. लिटीगेशनमुळे काही उद्योजकांनी उद्योग सुरु केलेले नाहीत त्यामुळे त्या भागातील लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणूनच तेथील माणसे रोजगार मिळविण्यासाठी मुंबईला येतात.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या मुलाना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे. त्यामुळे ग्रामीण भागात जेथे जेथे उद्योग आहेत तेथे तेथे या मुलांना काम मिळू शकेल. या कारखान्यांसाठी आवश्यक असलेले कौशल्य या मुलांजवळ नसल्यामुळे त्यांना तेथे काम मिळू शकत

3..





श्री.संजय केळकर ..

नाही. त्यामुळे काम करण्यासाठी बाहेरुन माणसे आणली जात आहेत. तेव्हा या कारखान्यामध्ये काम करण्यासाठी जे काही कौशल्य वा तंत्रज्ञान आवश्यक आहे ते या मुलांना शिकविण्यात आले पाहिजे तसे करण्यात आले तर या लहान लहान उद्योगामध्ये या मुलांना रोजगार मिळू शकेल.

सभापती महोदया, शेतीला उद्योगाचा दर्जा दिला गेला पाहिजे. शेतीशी संबंधित दुग्धव्यवसाय असेल, पोल्ट्री फार्म असेल...

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर ...

भाजीपाल्याचा, फळांचा व्यवसाय असेल, पण त्यासाठी पाणी नाही, वीज नाही. विजेची टंचाईतर 2012 सालापर्यंत राहणार आहे. त्यावर देखील आपल्याला म्हणजे शासनाला मात करावयाची आहे, जेण करून शहराकडे धावणारे लोंढे रोखावयाचे आहेत. त्यामुळे राज्य सरकारने या विषयावर गंभीरपणे विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे हे या निमित्ताने मला आपल्या पुढे मांडावयाचे आहे.

***

..... टीटी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 15:35

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मला मोठे भाषण करावयाचे नाही तर एकच गोष्ट येथे सांगावयाची आहे आणि ती मी एक दोन ओळीतच सांगणार आहे. त्यासाठी आपण मला परवानगी द्यावी. सभापती महोदया, या ठिकाणी विषय असा आहे की, गावातील माणूस गावातच राहिला पाहिजे. त्यासाठी त्याने गावात राहण्याचे आकर्षण तयार व्हायला पाहिजे. याचे मूळ असे आहे की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी या संदर्भात असे सांगितले आहे... नाही तरी आपण सगळे राष्ट्रसंतांचे नाव घेऊन बरेच काही करू लागलो आहोत. म्हणून त्यांनी जे सांगितले आहे तेवढेच या निमित्ताने मी येथे सांगतो. त्यांनी सांगितले आहे की,"कच्चा माल मातीच्या भावे, पक्का होताचि चौपटीने घ्यावे, कैसे सुखी होतील ग्रामजन, पिकोनिया उपाशी". म्हणजे तुम्ही कितीही पिकवा, तुम्ही उपाशीच राहणार आहात. त्यांनी दुसरी गोष्ट त्यांनी गावातील माणसाला अशी सांगितली आहे, त्यात त्यांनी गावातील माणसाची अवस्था काय आहे ते सांगितले आहे. ते म्हणतात, "..पोशिंदा म्हणविशी जगाचा, तुझ्या पाठीला रे पोट,

ऐतखाऊच्या घरी वाहती दह्या-दुधाचे लोट,
कष्ट करोनी महाल बांधिसी, तुला झोपडीही नाही नीटकीशी,
स्वातंत्र्यामध्ये तू उडी घेशी, मजा भोगतीशी इतरजन. "

सभापती महोदया, हे राष्ट्रसंतांनी सांगितले आहे, मी नाही. आता याचा समारोप करताना मी माझे याबाबत काय म्हणणे आहे ते एका ओळीत सांगतो. लोकांनी आपापल्या गावात का रहावे हे मी सांगतो. 66 रूपये शेतीमालचा उत्पादन खर्च काढताना, माणसाची मजुरी तुम्ही 66 रूपये गृहीत धरणार असाल तर शहरामध्ये 66 रूपयांमध्ये तर कपड्याची इस्त्री देखील होत नाही. तेव्हा येथील मजुरी आणि तेथील मजुरी यामध्ये मोठी तफावत आहे, अगदी अन्बॅलन्स. ते बॅलन्स तुम्ही केले आणि तेथे राहिल्यानंतर मी माझी लेकरं-बाळं पोटभर खायला घालून जगवू शकतो एवढे जरी त्याचे मन तुम्ही तयार केले तर मग या शहरातील गटारीमध्ये कोण झोपायला येणार आहे ? उलट ग्रामीण भागामध्ये मस्त हवा मोकळी मिळते आहे, निसर्गसौंदर्य, भरपूर पाणी आणि ताजे ताजे खायला मिळते आहे. परंतु तुम्ही ठरवून त्याला नरकयातना द्यायला सुरू केलेले आहे. म्हणून त्याने हे सोडावे असे त्याला वाटू लागेल असे आपण काही तरी केले पाहिजे असे मला येथे या निमित्ताने सांगावयाचे आहे.

***

..... टीटी 3 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अशासकीय ठरावाच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाच्या विषयावर येथे चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, डॉ.दीपक सावंत, श्री.संजय केळकर आणि श्री.पाशा पटेल यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. या अशासकीय ठरावाचा सर्वात महत्त्वाचा भाग हा आहे की, ग्रामीण भागामध्ये जनतेने थांबण्याची जी गरज आहे आणि शहरी भागामध्ये मोठे लोंढे आल्यामुळे शहरी भागावर मोठ्या प्रमाणात ताण वाढतो आहे. हे दोन मुद्दे यात विशेषत्त्वाने आहेत. ग्रामीण भागातून शहरी भागामध्ये लोकांना का यावे लागते याच्या बाबतीत बराच उहापोह झालेला आहे. बरेचदा शेती परवडत नाही ही एक भावना सगळ्यांमध्ये निर्माण झालेली आहे आणि जोपर्यंत मोडीत काढली जात नाही तोपर्यंत स्थलांतरितांचा हा प्रश्न सुटणारा नाही. ..

( यानंतर श्री. सरफरे .... यूयू 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील...

सभापती महोदया, मला आपल्याला आवर्जून सांगावेसे वाटते की, गेल्या दोन वर्षापूर्वी केंद्र सरकारने डॉ. स्वामीनाथन साहेबांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांच्या बाबतीत पहिल्यांदा राष्ट्रीय आयोग नेमला. आतापर्यंत शेती व कृषीवर आयोग नेमला जायचा. परंतु पहिल्यांदा हा शेतकऱ्यावर आयोग नेमला. शेतकऱ्याची परिस्थिती कशी चांगली करता येईल? याबाबत मोठया प्रमाणात अहवालामध्ये मुद्दे नमूद करण्यात आले. त्याचबरोबर गेल्या वर्षी आदरणीय पंतप्रधानांनी शेतीमध्ये दरवर्षी 4 टक्के दरवाढ व्हावी याबाबत फार गांभीर्याने विचार करुन हा विषय पुढे मांडला. आणि प्रत्येक राज्याला आराखडा सादर करण्यास सांगण्यात आले. आपल्या राज्याच्या प्रत्येक जिल्हयांमधून अशाप्रकारचा आराखडा तयार करणे अपेक्षित आहे. आपल्या प्रत्येक जिल्हयामध्ये किती शेतमाल उपलब्ध आहे, तेथील भौगोलिक वातावरण कसे आहे, आणि त्या अनुषंगाने कोणते पिक घेणे शक्य आहे याबाबतचा प्रारुप आराखडा तयार केला जात आहे. जेणेकरुन शेतकऱ्याच्या मालाला उद्या चांगला भाव मिळेल अशाप्रकारचा एकात्मिक आराखडा करण्याची प्रक्रिया चालू आहे. हे करीत असतांना पारंपारिक पध्दतीने शेती करीत असतांना त्याच्या बरोबर जोडधंदे करण्यावर प्रामुख्याने भर देण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये शेळी, दुग्धोत्पादन व्यवसाय, रेशीम उद्योग इत्यादी व्यवसायाकडे ग्रामीण भागातील शेतकरी आकर्षित होत आहे. आणि म्हणून या सर्व गोष्टींच्या माध्यमातून उपजीविकेचे साधन उपलब्ध होऊन ग्रामीण भागातील लोकांचे रहाणीमान सुधारण्यासाठी नेमके काय करणे शक्य आहे यासंबंधीचा अभ्यास जवळ जवळ संपत आला आहे. आणि त्या अनुषंगाने मोठया प्रमाणात पैश्याची उपलब्धता करण्याबाबत केंद्र सरकारने निर्णय घेतला आहे. आपणास माहीत असेल की, नॅशनल फूड सिक्युरिटी मिशनच्या माध्यमातून फूड ग्रेनच्या बाबतीत, गव्हाच्या बाबतीत, कडधान्याच्या बाबतीत प्रत्येक जिल्हयाच्या वेगवेगळया भागांना फायदा देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने प्रोत्साहनपर पावले उचलण्याचे ठरविले आहे. जेणेकरुन शेतकऱ्यांना चार पैसे जास्त मिळतील. त्याचबरोबर देशामध्ये अन्नधान्यासाठी जे क्षेत्र उपलब्ध आहे ते वाढवावयाचे आहे, तेथील उत्पादकता वाढवावयाची आहे. आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे उत्पादन वाढवावयाचे आहे. शेतकऱ्याच्या खिशामध्ये चार पैसे जास्त राहिले पाहिजेत. त्यासाठी नियोजन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्याचबरोबर शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग आहेत, मूल्यवृद्धी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. राणा जगजितसिंह पाटील...

करणारे उद्योग आहेत. उदा. ज्वारी साफ करुन व्यवस्थित पॅक करुन ती विकली तर तिची किंमत वाढते. ज्वारी ही फक्त पोत्यामध्ये भरुन क्विंटलच्या वजनाने विकावयाचे ठरविले तर जास्त भाव मिळत नाही. परंतु ती व्यवस्थित स्वच्छ करुन, तिचे ग्रेडींग आणि पॅकींग करुन मुंबईच्या मॉलमध्ये विकली तर निश्चितपणे जास्त भाव मिळतो व शेतकऱ्यांना चार पैसे जास्त मिळतात. त्याचबरोबर मधल्या दलालांना बाजूला करुन थेट मॉलमध्ये किंवा मोठया दुकानांमध्ये शेतकऱ्याचा माल पोहोचू शकेल काय? याबाबत पावले उचलण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सभापती महोदया, अशाप्रकारे ॲग्रो प्रोसेसिंगबाबत या शासनाने महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 51 पेक्षा जास्त शेतकरी संघटीत झाले आणि त्यांनी सहकारी संस्था स्थापन केली आणि त्यांना 1 कोटींचा ॲग्रो प्रोसेसिंग प्रकल्प टाकावयाचा असेल, शेतमालावर प्रक्रिया करणारा प्रकल्प टाकावयाचा असेल तर त्यांनी फक्त 4 लाखापर्यंत गुंतवणूक करणे अपेक्षित आहे. 51 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी तेवढे भाग भांडवल उभे केले पाहिजे. तसे केले तर एकास नऊ या प्रमाणात 36 लाख रुपयांचे भाग भांडवल देण्याची शासनाची तयारी आहे. आणि राहिलेले 60 लाख रुपये एन.सी.बी.सी. कडून किंवा कोणत्याही बँकेकडून मिळवून देण्याची हमी राज्य शासन घेण्यास तयार आहे. तसेच, 5 कोटीपर्यंतचा प्रकल्प तालुक्याच्या किंवा जिल्हयाच्या ठिकाणी झाला पाहिजे. आणि त्याचा लाभ मोठया प्रमाणावर ग्रामीण भागामध्ये झाला पाहिजे. अशी या योजनेमागची भूमिका असून यापुढील काळात शासनाला ती करणे शक्य आहे याची मला खात्री आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:45

श्री.राणा जगजितसिंह पाटील . . . .

आपल्याकडे दोन-तीन अहवाल उपलब्ध आहेत. साधारणपणे प्रत्येक जिल्हयामध्ये कोणता शेतीमाल उपलब्ध आहे, त्या अनुषंगाने साधारणपणे ॲग्रो प्रोसेसिंगच्या बाबतीत कोणते पोजेक्टस् सुरु करता येणे शक्य आहे, त्यादृष्टीने पुढच्या दोन महिन्यामध्ये म्हणजे साधारणपणे मे अखेरेपर्यंत ॲग्रो इंडस्ट्रीजची पॉलिसी जाहीर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या ॲगो प्रोसेसिंगच्या पॉलिसीमध्ये केंद्र शासनाच्या विविध योजना आणि त्याचबरोबर राज्य शासन देखील अजून काही प्रोत्साहन देण्यास तयार आहे का ? याचा विचार केला जाणार आहे. खास करुन ग्रामीण भागामध्ये येणारे उद्योग, मग ते खादी व्हीलेज इंडस्ट्रीच्या माध्यमातून येणारे उद्योग असतील, फुड प्रोसेसिंग मिनिस्ट्री/इंडस्ट्रीच्या माध्यमातून येणारे उद्योग असतील आणि त्यात आपण आणखी काही भर घालू शकतो का ? या सर्व बाबतीत विचार होऊन ही पॉलिसी मे अखेरपर्यंत जाहीर करण्याचा आमचा निश्चितपणे प्रयत्न राहणार आहे. त्याचबरोबर 8 वी ते 12 वी मध्ये शेती हा अभ्यासक्रम सुरु करण्याचा प्रयत्न आहे. यासाठी कृषी आणि शिक्षण हे दोन्ही विभागांनी एकत्र यावे आणि हा अभ्यासक्रम 8 वी ते 12 वी साठी कम्पलसरी करण्यात यावा असा विचार आहे. यामध्ये केवळ शेती या विषयापुरताच अभ्यासक्रम सिमीत न ठेवता पशुसंवर्धन, मत्स्योद्योग, दुग्धव्यवसाय, हॉल्टीकल्चर या सर्व विषयांची थोडी-थोडी माहिती प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोचविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. जर 50-55 टक्के किंवा 60 टक्के लोक डायरेक्टली किंवा इन-डायरेक्टली शेतीवर अवलंबून असतील तर त्यांना शेतीचे महत्व कळणेही गरजेचे आहे. आपल्याला हे माहिती आहे की, शहरी भागामध्ये आपल्या नेहमीच्या ज्या खाण्याच्या सवयी आहेत, त्यामध्ये खूप बदल झालेला आहे. म्हणजे दूध आणि डेअरी प्रॉडक्टस् किंवा भाज्या, फळे खाण्याचे प्रमाण आहे ते निश्चितपणे वाढत आहे आणि दरवर्षी यामध्ये वाढच होत आहे. त्याचबरोबर फुलाच्या शेतीमध्ये, फुलाच्या व्यवसायामध्ये देखील निश्चितपणे वाढ होत आहे. आज ग्रामीण भागातील जो पैसा शहरी भागामध्ये येत आहे, त्याचा प्रवाह उलटा करुन शहरी भागातील काही पैसा ग्रामीण भागामध्ये नेण्याचा निश्चितपणे आपला प्रयत्न आहे. या ॲग्रो इंडस्ट्रीच्या धोरणाच्या माध्यमातून आपण निश्चितपणे असा प्रयत्न करीत आहोत. मला खात्री आहे की, पुढच्या काळामध्ये काही प्रमाणात तरी हा उलटा प्रवाह सुरु होईल. मग शेतमालाला चांगला भाव मिळेल. अशा वेळी निश्चितपणे त्याची क्वॉलिटी मेन्टेन करणे गरजेचच आहे. परंतु जर उद्या शेतमालाला चांगला भाव मिळू शकला तर काही प्रमाणात शहरी ...

. . . .2 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील . . . .

भागातील पैसा ग्रामीण भागामध्ये जाण्यास सुरुवात होईल. फ्लोरीकल्चरच्या बाबतीत आणि हॉल्टीकल्चरच्या बाबतीत खूप मोठी क्रांती होत आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आपल्या राज्यातून ज्या वस्तू निर्यात होत आहे, त्यामध्ये दरवर्षी वाढ होत आहे. मग ते फुलांच्या बाबतीत असेल किंवा द्राक्ष, डाळींब, आंबा इ.मुख्य फळांच्या बाबतीत देखील निर्यातीचे प्रमाण वाढत आहे.दुधाच्या बाबतीत सुध्दा आपण सर्वांनी वाचले असेल की, पावडर करुन किंवा तत्सम मार्गाने निर्यातीला वाव मिळत आहे. मी आपल्याला सर्वांना साखरेच्या बाबतीत वेगळे सांगावयास नको. परंतु शेवटी ग्रामीण भागातून शहरी भागामध्ये मोठया प्रमाणात जे लोंढे येत आहेत, ते थांबविण्याचा निश्चितपणे आपला प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेलसाहेब यांनी भाषण करताना बरेच काय-काय सांगितले. पण मी त्यातील दोन-तीन गोष्टींचा उल्लेख करतो. ग्रामीण भागामध्ये राहणारा माणूस शहरी भागामध्ये आल्यानंतर साधारणपणे काय-काय होते ते सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेलसाहेबांनी आपल्याला सांगितले आहे. मला स्वत:ला खात्री आहे की, आपण जर ग्रामीण भागामध्ये या सर्व सोयी-सुविधा पुरवू शकलो तर लोकांच्या स्थलांतराचे प्रमाण निश्चितपणे कमी होईल.

सभापती महोदया, मी याठिकाणी IT-Kiosks च्या बाबतीत एक शेवटचा मुद्दा मांडू इच्छितो. मी याच सभागृहामध्ये दोन-तीन वेळेला उल्लेख केला होता. यासंबंधीची प्रक्रिया गेली दोन-तीन वर्षे सुरु होती.आपण ग्रामीण भागामध्ये IT-Kiosks आणण्याची एक महत्वाकांक्षी योजना राबविण्याचा प्रयत्न केला होता.परंतु त्याच दरम्यान केंद्र शासनाने एक लाख IT-Kiosks ची दुसरी योजना आणण्याचे ठरविले होते. आपल्या राज्यामध्ये केंद्र शासनाच्या या योजनेच्या माध्यमातून जवळजवळ दहा हजार IT-Kiosks येणार आहेत. हे IT-Kiosks ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात येणार आहेत. या IT-Kiosks मध्ये इंटरनेटचे कनेक्शन असलेले कॉम्प्युटर असतील. त्या माध्यमातून केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजनांची माहिती ग्रामीण भागामध्ये उपलब्ध होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील लोकांना काही अर्ज भरावयाचे असतील तर ते भरणे शक्य होणार आहे. मी त्याच्याही पुढे जाऊन सांगू इच्छितो की, गावामध्ये बसून शेतमाल विकण्याची प्रक्रिया करणे देखील शक्य होणार आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/ पूर्वी सौ. रणदिवे 15:50

श्री. राणा जगजितसिंह पाटील .....

आपल्याला जी काही अवजारे लागतात, जी खते लागतात, जी कीटकनाशके लागलात, जी बियाणे लागतात या सर्व गोष्टींच्या बाबतीत देखील आपल्या किऑस्कच्या माध्यमातून खूप मोठा फायदा होणार आहे. या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये रोजगाराची संधी देखील उपलब्ध होणार आहे. शासनाच्या माध्यमातून ज्या ज्या गोष्टी करण्याची प्रक्रिया चालू आहे त्या मी नमूद केलेल्या आहेत. मला खात्री आहे की, या सर्व गोष्टीचा जर आपण सकारात्मक विचार केला तर शासन या प्रक्रियेच्या बाबतीत अतिशय गंभीर आहे हे निश्चितपणे आपल्या लक्षात येईल. एमआयडीसीच्या बाबतीत एक उल्लेख करण्यात आला. एमआयडीसी एरियामध्ये अनेक ठिकाणी आपण जागा ताब्यात घेतलेल्या आहेत आणि त्या ठिकाणी एक तर नुसते बोर्डस् आहेत किंवा काही उद्योग सुरु झाले असतील तर त्यातील बरेचसे उद्योग बंद आहेत असे सांगण्यात आले. मला आपल्याला सांगताना आनंद वाटतो की, यामध्ये आता मोठ्या प्रमाणामध्ये फरक व्हावयास सुरुवात झालेली आहे. मराठवाड्यामध्ये देखील अनेक नवीन उद्योग येत आहेत. एक एक उद्योग असे आहेत की, ज्या ठिकाणी हजार दोन हजार महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. खासकरुन गारमेंट इंडस्ट्रीच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये आपण रोजगार उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेबांना विनंती आहे की, मी जे सर्व सांगितले आहे ते आपण सकारात्मक दृष्टीने स्वीकारावे. शासनाचे याबाबतीत जे गांभीर्याचे धोरण आहे ते लक्षात घेऊन आपण आपला अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी विनंती करतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी इतके गोडगोड स्वप्न रंगविलेले आहे की, परमेश्वराने आपल्या तोंडामध्ये साखर, गूळ, मध आणि अस्सल तुपाचे पंचामृत द्यावे. सभापती महोदया, मला असे म्हणावयाचे आहे की, आपण हे सर्व स्वीकारले आहे तर मग हा ठराव पास करावा. माझ्या ठरावातील जो ऑपरेटिव्ह पार्ट आहे त्यामध्ये मी असे म्हटले आहे की, ग्रामीण भागातील शेती व्यवसायाला योग्य ते प्रोत्साहन देऊन रोजगार उपलब्ध करण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. हा ठराव आम्ही स्वीकारतो आणि आम्ही हे करु असे आपण म्हणावे. दुसरी बाब अशी की, जसे केंद्र शासनाने शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल विचार करण्यासाठी आयोग नेमला तसे महाराष्ट्रातील शहरीकरण थांबावे आणि आपण सांगितले ते सर्व खेड्यात व्हावे यासाठी आपण एखादा आयोग नेमणार काय ? तसे सांगितले तर मी माझा ठराव मागे घेतो.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाने जो आयोग नेमलेला होता तो शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी, त्याचा अभ्यास करण्यासाठी नेमलेला होता. सन्माननीय सदस्य म्हणतात तसे शेती व्यवसायाला योग्य प्रोत्साहन देण्यासाठी आपल्याला एक कमीशन नेमण्यामध्ये काहीच हरकत नाही. ते करण्याची निश्चित शासनाची तयारी आहे.

श्री. मधुकर चव्हाण : पण त्याचबरोबर शहरीकरण जास्त होणार नाही याचीही काळजी घ्यावी. आपण एक निर्णय दिला की, आयोग नेमण्यास शासनाची हरकत नाही. मला एक चांगले आश्वासन मिळाले त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. पण झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणावर सुध्दा नियंत्रण ठेवण्यासाठी एखादा आयोग किंवा एखादा अभ्यासगट आपण नेमू असे सांगावे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे या अशासकीय ठरावातील जो ऑपरेटिव्ह पार्ट आहे तो ग्रामीण भागातील शेती व्यवसाय परवडण्याच्या संदर्भात आहे.

श्री. मधुकर चव्हाण : आपण आयोग नेमण्याचे आश्वासन दिलेले आहे. यामध्ये महाराष्ट्राला फार मोठे आश्वासन मिळालेले आहे असे मला वाटते. मी आपले आभार मानतो. आपण दिलेली सगळी वचने पूर्ण कराल आणि आपण जे सोनेरी स्पप्न रंगविलेले आहे ते दिवसाढवळ्या लोकांना

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS

श्री. मधुकर चव्हाण .......

अनुभवावयास मिळेल असा मी विश्वास व्यक्त करतो. हा अशासकीय ठराव आपण सगळा अंमलात आणाल असा विश्वास व्यक्त करतो. कोणता आयोग वगैरे आपण पुढच्या वेळी करणार ना ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : मी शब्द दिला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : चांगले आश्वासन मिळालेले आहे. आपण आयोग नेमणार आहात त्याबद्दल मी आपले आभार मानतो. मी आपल्या शब्दाचा मान ठेवतो. व्याकरणातील शब्दांसारखे आपण दिलेले सगळे शब्द पूर्णतः बुडबुड्यांसारखे किनाऱ्यावर आपटून न जाता सगळे व्यवहारात येतील असे गृहीत धरतो आणि आपण आयोग नेमणार आहात त्याबद्दल आपले अभिनंदन करुन मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकण रेल्वे मार्ग दुपदरी करण्याची तसेच रेल्वे स्थानकांवर अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता

**मु.शी.**: कोकण रेल्वे मार्ग दुपदरी करण्याची तसेच रेल्वे स्थानकांवर अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता या विषयावरील श्री. राजन तेली, वि. प. स. यांचा ठराव

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे."

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

सभापती महोदया, रोहा-ठोकूर असा 740 कि.मी.अंतराचा कोकण रेल्वेचा मार्ग आहे. कोकण रेल्वे सुरु होऊन 10 वर्षे झालेली आहेत. या रेल्वे मार्गावर किमान 17-18 गाडया धावतात. या मार्गाचा माल वाहतुकीसाठी प्रचंड प्रमाणात उपयोग केला जात आहे. या मार्गावरुन मुंबईहून गोव्याला जाण्यासाठी 12 ते 15 तासांचा वेळ लागतो. या कोकण रेल्वे मार्गाचे दुपदीकरण करण्यात यावे अशी मागणी करण्यासाठी मी हा अशासकीय ठराव मांडलेला आहे. या कोकण रेल्वेसाठी 3340 कोटी रुपये खर्च झाले होते. या मार्गावर मोठया प्रमाणात टनेल आहेत. परंतु जेथे टनेल नसतील तेथे या मार्गाचे दुपदीकरण करणे शक्य आहे असे मला वाटते. केंद्र सरकारने पनवेल-रोहा या मार्गाच्या दुपदरीकरणाच्या कामाला मंजुरी देवून काम हाती घेतले आहे. खेड ते चिपळूण या मार्गावर टनेलची संख्या जास्त आहे. परंतु चिपळूणच्या अलिकडे दुपदरीकरण झाले तर लोकांची निश्चितपणे सोय होणार आहे. त्यामुळे हे काम होणे गरजेचे आहे.

सभापती महोदया, कोकण रेल्वेच्या सर्व स्टेशन्सवर महिलांची गैरसोय होते. याचे कारण असे की, या स्टेशन्सवर शेडचे प्रमाण अत्यल्प आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. पण छोटे शेड असल्यामुळे प्रवाशांना वेगवेगळया अडचणींना सामोरे जावे लागते. महिलांची मोठी कुचंबना होते. महिलांसाठी शौचालयांची सुविधाच नाही. संपूर्ण कोकण रेल्वेवरील सर्व स्टेशन्सवर पत्र्याच्या कायम स्वरुपी शेड्सची व शौचालयांची व्यवस्था करावी अशी मी या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदया, कोकण रेल्वेत श्री.मिश्रा नावाचे नवीन एम.डी.आले आहेत. त्यांनी स्वीकारलेल्या धोरणामुळे कोकण रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले आहे. मुंबईहून शताब्दी एक्सप्रेस मडगांवला 7.5 तासामध्ये जाते. कोकण कन्या एक्सप्रेसला 12 ते 15 तास लागतात. या एम.डी.नी माल वाहतुकीला प्राधान्य दिले आहे, रो-रो सर्व्हिसमध्ये वाढ केल्यामुळे या मार्गावरील सर्व प्रवासी गाडया 2-3 तास उशिराने धावत आहेत. म्हणून कोकण रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण होणे महत्वाचे आहे. या मार्गावरील नेत्रावती एक्सप्रेस, मत्स्यगंधा एक्सप्रेस, ओका एक्सप्रेस आणि नुकतीच सुरु केलेली गरीब रथ या गाडयांना कोकणात पुरेसे थांबे दिलेले नाहीत. रत्नागिरी जिल्हयात रत्नागिरी स्टेशनवर, सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडीला थांबा आहे. त्याऐवजी

2...

NTK/ KGS/ SBT/ MMP/ KTG/

श्री.राजन तेली...

वैभववाडी, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी या चारही स्टेशन्सवर गाडया थांबणे आवश्यक आहे. या कोकण रेल्वेला प्रवाशांचा जबरदस्त प्रतिसाद मिळूनही प्रवाशांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे. कोकणकन्या ही गाडी मडगांवपर्यंत जाते. या गाडीसाठी कोकणातील प्रवाशांसाठी अतिशय कमी कोटा ठेवलेला आहे. लोकांना आवश्यक तेवढे आरक्षण मिळत नाही. या रेल्वे मार्गाचे नाव कोकण रेल्वे असे आहे. ही रेल्वे कोणासाठी सुरु केली अशी प्रवाशांना शंका येत आहे. दिवा गाडी थांबण्यासाठी मडगावला जाते. म्हणून माझी सरकारकडे मागणी आहे की, सावंतवाडी येथे टर्मिनल होणे आवश्यक आहे. सावंतवाडी येथे टर्मिनल झाले तर ख-या अर्थाने कोकणातील जनतेला न्याय मिळणार आहे. कोकणकन्या गाडीचे 2 महिने अगोदर आरक्षण केले जाते.......

नंतर श्री.शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राखून ठेवलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 37637 संबंधी**

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकण रेल्वेच्या संदर्भात अतिशय महत्वाचा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित केलेला असून ते अतिशय चांगले मुद्दे मांडत आहेत. परंतु मला माझ्या कर्तव्याचा एक भाग म्हणून एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देणे आवश्यक वाटते.

सभापती महोदय, आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्नोत्तराच्या यादीमधील नवव्या क्रमांकावर असणारा तारांकित प्रश्न क्रमांक 38637 हा माननीय सभापतींनी आज दुपारी 4.00 वाजेपर्यन्त राखून ठेवलेला होता आणि 4.00 वाजता त्या प्रश्नाचे उत्तर द्यावे असे निदेश दिलेले होते. प्रश्न अतिशय सुटसुटीत आहे. हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत आणि त्या आदेशांची प्रत मी मुद्दाम या ठिकाणी सोबत आणलेली आहे. हायकोर्टाने असे आदेश दिलेले आहेत की, त्यांना सेवासातत्याचे लाभ द्यावेत. शासनाने 4 नोव्हेंबर 2006ला आदेश काढले आणि ते डायरेक्टरला दिले की, आता हायकोर्टामध्ये रिटपिटीशन करण्याची गरज नाही. दिनांक 17.11.2006 ला डायरेक्टरने जॉईण्ट डायरेक्टरला आदेश दिले की रिव्ह्यू पिटिशन करायचे नाही. हे आदेश लेखी दिलेले आहेत. त्यानंतर आज सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्या प्रश्नाला "सेवासातत्याचे लाभ देण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी केली आहे." असे उत्तर देण्यात आलेले आहे. आता एक-एक वर्ष ही कार्यवाही का पडून राहाते हे अंदाजाने मी समजू शकतो. त्याचा उल्लेख मला येथे करता येत नाही. मी विचारलेल्या प्रश्नाला "सेवासातत्याचे लाभ देण्याची कार्यवाही केलेली आहे" अशा प्रकारचे उत्तर आलेले असल्यामुळे ही कार्यवाही कोणत्या तारखेला केली आणि काय कार्यवाही केली असे प्रश्न मी विचारले होते आणि त्या प्रश्नाचे उत्तर आले नाही म्हणून माननीय सभापतींनी आज दुपारी 4.00 वाजेपर्यन्त हा प्रश्न राखून ठेवला होता आणि 4.00 वाजता या प्रश्नाचे उत्तर देण्याचे आदेश माननीय मंत्री महोदयांना दिले होते. आता 4.00 वाजलेले आहेत. सभागृहामध्ये संबंधित विभागाचे मंत्री महोदय हजर नाहीत. तेव्हा ता.प्र.क्र. 37637 हा राखून ठेवून तो पुढच्या आठवडयात घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देमुख यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 37637च्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदय हे आज दुपारी 4.00 वाजता सभागृहाला माहिती सादर करणार होते. परंतु ते आता सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे सदरहू माहिती पुढच्या आठवडयात ठेवावी अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केलेली आहे. सदरहू माहिती पुढील आठवडयातील सोमवारी सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी ठेवण्यात यावी अशी मी संबंधित विभागाला सूचना करते.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा तारांकित प्रश्न राखून ठेवावा अशीच माझी मागणी आहे. या विभागाचे प्रश्न ज्या दिवशी चर्चेला घेण्यात येतील त्या दिवशी माझा हा राखून ठेवलेला प्रश्न चर्चेला घेण्यात यावा.

**तालिका सभापती** : ठीक आहे. पुढच्या आठवड्यात हा प्रश्न घेण्यात येईल.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकण रेल्वे मार्ग दुपदरी करण्याची तसेच रेल्वे स्थानकांवर अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता

**मु.शी.**: कोकण रेल्वे मार्ग दुपदरी करण्याची तसेच रेल्वे स्थानकांवर अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता या विषयावरील श्री. राजन तेली, वि.प.स. यांचा ठराव.

(चर्चा पुढे सुरु...)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. राजन तेली : कोकणासाठी कोकण कन्या ही एकच रेल्वेगाडी अशी आहे की जिचे आरक्षण दोन-दोन महिने करुन देखील ते मिळत नाही. या गाडीमध्ये आमदारांसाठी, मंत्री महोदयांसाठी अे.सी. टू टायरमध्ये फक्त दोन सीटचा कोटा ठेवलेला आहे. ही सर्व परिस्थिती पाहता माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, कोकण रेल्वेचे शिल्पकार मधु दंडवते आणि कोकण रेल्वेची मूळ संकल्पना मांडणारे बॅ. नाथ पै या दोघांच्या नावे कोकणामध्ये धावणा-या दोन नवीन गाड्या सुरु करणे नितांत गरजेचे आहे आणि कोकणातील समग्र जनतेची तशी मागणी आहे. हे झाले तरच कोकणामध्ये ख-या अर्थाने रेल्वे सुरु झाली असे म्हणता येईल. म्हणून या ठरावाच्या निमित्ताने मधु दंडवते आणि बॅ. नाथ पै यांच्या नांवे कोकण रेल्वेने दोन नवीन गाडया सुरु कराव्यात अशी मागणी करतो.

सभापती महोदया, कोकण रेल्वेसाठी कोकणातील जवळपास 33 हजार सर्वसामान्य शेतक-यांच्या जमिनी गेल्या. त्यापैकी किती लोकांना कोकण रेल्वेमध्ये काम मिळाले हा एक संशोधनाचा विषय होईल. सर्वांनाच नोक-या मिळू शकणार नाहीत हेही मी समजू शकतो. परंतु कोकण रेल्वेमध्ये ज्या नोक-या उपलब्ध होतील त्यामध्ये ज्यांच्या जमिनी गेल्या त्या भूमिपुत्रांना प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. पण तसे होताना दिसत नाही. दुसरे असे की, कोकण रेल्वेचे स्टॉल्स हे अन्य लोकांना दिले जातात. खरे म्हणजे ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्या भूमिपुत्रांना हे स्टॉल्स दिले पाहिजेत आणि असे केले तरच तेथील भूमिपुत्रांना न्याय मिळेल. तसेच आंबा, काजू, फणस, करवंद, कोकम इत्यादी कोकण रेल्वेमध्ये विकण्याची व स्टॉल लावण्याची परवानगी द्यावी अशी मी या ठरावाच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली.....

सभापती महोदया, रोरो सव्हिर्सेसच्या बाबतीत गोवा, कर्नाटक आणि केरळ या राज्यांचाच विचार केला जातो. कोकणातून देखील मोठ्या प्रमाणावर मास्यांची वाहतूक होत असते.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 16:05

श्री. राजन तेली....

तसेच कोकणातून आंबा, काजू या फळांची देखील फार मोठया प्रमाणात निर्यात होते. या निर्यातीच्या माध्यमातून कोकण विभागातून किमान दोन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त टर्नओव्हर होतो आहे. सध्या ही सर्व निर्यात रोडच्या माध्यमातून होत आहे. रो-रो सर्व्हीसची व्यवस्था कोकणात कुठेही केलेली नाही. रो-रो सर्व्हीस सावंतवाडी या ठिकाणी करावी अशी माझी शासनास विनंती आहे. कोकणात आंबा, काजू आणि मासे यांचे उत्पादन मोठया प्रमाणात आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रात जेवढी खनीज संपत्ती आहे, त्यातील 20 टक्के खनीज संपत्ती कोकणातील फक्त सिंधुदूर्ग जिल्हयात आहे. कोकणात मोठया प्रमाणात खनीज संपत्ती असल्यामुळे रेल्वे प्रशासनाने याबाबतीत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने रेवस, दिघी, विजयदूर्ग आणि जयगड ही बंदरे विकसित करण्याचे ठरविले आहे. बंदरांचा विकास करीत असताना रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण करणे आवश्यक आहे. कोकण रेल्वेने जाताना पश्चिम महाराष्ट्रातील भाग लागतो. चिपळूण कडून कराड कडे रेल्वे मार्ग जोडला तर कराड पासून पुढे पूर्वीचा रेल्वे मार्ग सुरुच आहे. चिपळूण ते कराड असा रेल्वे मार्ग केला तर ते अतिशय सोयीचे होईल. या मार्गाचे अंतर देखील कमी असून त्यासाठी निधी देखील कमी खर्च होईल. वैभववाडी- कोल्हापूर असा रेल्वे मार्ग सुरु केला तर दळवणासाठी देखील तो मार्ग सुकर होईल. या लोहमार्गामुळे प्रवाशांची देखील चांगल्या प्रकारे सोय होईल. कोकणात जेथे सोयीचा असेल, कमी खर्चाचा असेल अशा लोहमार्गाचा सर्व्हे झाला तर तो लोहमार्ग सगळयांसाठी सोयीचा होऊ शकतो. म्हणून माझ्या या सूचनेचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणासाठी मी नवीन रेल्वे गाडया सुचविल्या आहेत, त्या तात्काळ सुरु करण्यासंबंधी राज्य शासनाने प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे ज्या लांब पल्ल्यांच्या गाडया आहेत त्या केरळ, गोवा, कर्नाटक राज्यात गेल्यानंतर रेल्वेसंबंधीची आपली रेल्वे संबंधीची मागणी तेथील अधिकारी मान्य करीत नाहीत. तेथील अधिका-यांकडून रेल्वे मार्गाचे अंतर मोजले जात नाही. लांब पल्ल्याच्या गाडयांसाठी सिंधुदूर्ग सारखे एखादे रेल्वे स्टेशन दिलेले आहे. कोकणात जी प्रमुख रेल्वे स्थानके आहेत त्या स्थानकांवर लांब पल्ल्यांच्या गाडया थांबविल्या जाव्यात अशा प्रकारची देखील राज्य शासनाने रेल्वे मंत्रालयास सूचना द्याव्यात. कोकणातील रेल्वे लोहमार्गाचे दुपदरीकरण

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

सुरुवातीच्या काळात झाले तर त्या ठिकाणी शटल सर्व्हीस देखील सुरु करता येऊ शकेल. तसेच या लोहमार्गामुळे कोकणाचा चांगल्या प्रकारे विकास होऊ शकतो. कोकण विभागात जी खनीज संपत्ती आहे त्या खनीज संपत्तीचा औद्योगिकरणासाठी फार मोठा फायदा होऊ शकतो. कोकणातील लोहमार्गाचे दुपदरीकरण करणे, कोकणातून नवीन रेल्वे बॅ. नाथ पै आणि कै.मधु दंडवते यांच्या नावाने सुरु करणे, तसेच ती रेल्वे गाडी बांद्रा सारख्या टर्मिनल येथून सोडण्यात यावी. बांद्रा टर्मिनलच्या आजुबाजूच्या परिसरामध्ये कोकणवासीयांची संख्या फार मोठी आहे. त्यामुळे नव्याने सुरु होणारी रेल्वे गाडी बांद्रा रेल्वे टर्मिनस येथून सोडण्यासंबंधी राज्य शासनाने रेल्वे मंत्रालयास सूचना द्याव्यात अशा प्रकारची विनंती करतो आणि या ठरावावरील माझे भाषण पूर्ण करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 16:10

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकण रेल्वेसंबंधी अशासकीय ठराव क्रमांक 111 सदनात मांडलेला आहे. हा ठराव मांडत असताना कोकण रेल्वे असे जरी नांव असले तरी कोकणाला या रेल्वेपासून कमी फायदा झालेला आहे असे जे चित्र उभे राहिले आहे ती वस्तुस्थिती आहे. कोकण रेल्वे व्हावी यासाठी अनेक वेळेला संघर्ष करावा लागला. बॅ.नाथ पै हे त्या भागाचे खासदार असताना त्यांनी पाठपुरावा केला. त्यानंतर स्वर्गीय मधु दंडवते यांनी कोकण रेल्वेसाठी खूप मेहनत घेतली आणि मोठया प्रमाणात पाठपुरावा केला होता. श्री. जॉर्ज फर्नांडीस रेल्वेमंत्री असताना त्यांनी कोकण रेल्वेचा प्रकल्प हाती घेण्याचा निर्णय घेतला. योगायोग असा की, रेल्वेखाते महाराष्ट्राच्या वाटयाला फार कमी वेळेला आले. पूर्वी कै.एस.के.पाटील रेल्वेमंत्री होते. त्यानंतर गेली अनेक वर्षे हे खाते एकतर पश्चिम बंगाल किंवा बिहार यांच्या वाटयाला जाऊ लागले आहे. माझ्या पाहण्यात बंगाल आणि बिहारचे जे 7/8 मंत्री पाहण्यात आले त्यामध्ये रामविलास पासवान, नितीशकुमार, ममता बॅनर्जी, आणि आता साक्षात लालुप्रसाद यादव हे रेल्वेमंत्री आहेत. रेल्वेमंत्री हे बिहार आणि बंगाल या भागातील असल्यामुळे सगळे रेल्वे प्रोजेक्ट त्या भागाकडे वळतात. महाराष्ट्राला हे खाते मिळावे म्हणून आग्रह धरला पाहिजे होता. हे खाते महाराष्ट्राला मिळाले असते तर निश्चितच फायदा झाला असता. कोकण रेल्वे सुरुवातीपासूनच दोन ट्रॅकची करणे आवश्यक होते. या प्रकल्पावर 3 हजार कोटी रुपये खर्च झाले. सुरुवातीलाच दोन मार्गांची लाईन केली असती तर अधिक योग्य झाले असते. सगळया सुविधा मिळाल्या असत्या आणि प्रश्न मार्गी लागले असते. मी लोकसभेत असताना हा विषय मांडला होता. सुरुवातीच्या नकाशामध्ये जी रेल्वे स्टेशन्स दाखविलेली आहेत ती अद्याप कार्यान्वित झालेली नाहीत. स्टेशन्स व्हावीत म्हणून पाठपुरावा केला. काही स्टेशन्सवर पत्र्याची व्यवस्था झालेली आहे. या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेच्या संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत. रेल्वे स्टेशनवर महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था असावी. ही मागणी करण्याची गरजच काय ? महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची आवश्यकता आहे हे रेल्वेला कळत नाही काय ? पुरुष आणि महिला यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. पत्र्याची शेड कशासाठी ? टेंपररी शेडस् बांधलेल्या आहेत. एकदाच मजबूत बांधकाम करणे आवश्यक होते. कोकणचे लोक तुमच्याकडून फार मोठया अपेक्षा करीत नाहीत. मिळेल तसे राहतात.त्यांनी संघर्ष करण्याची प्रवृत्ती सोडून दिली. परंतु ही मागणी समर्थनीय आहे

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 16:10

श्री. मधुकर सरपोतदार ...

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांचे मी अभिनंदन करतो. याबाबतीत महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. महाराष्ट्रातून लोकसभेवर 48 खासदार निवडून जातात. राज्यसभेवर देखील महाराष्ट्रातून खासदार निवडून जातात ते निराळे. लोकसभेतील चित्र पाहिले तर तामिळनाडूतील एखाद्या खासदाराने प्रश्न उपस्थित केल्यावर सगळे खासदार त्यांच्या बाजूने उभे राहतात. इतर भाषिक खासदार नेहमी इंग्रजीमध्ये किंवा त्यांच्या प्रादेशिक भाषेमध्ये बोलतात. लोकसभेमध्ये ट्रान्सलेटर आहेत. कुठल्याही भाषेत बोलले तरी सदस्याला ते कळण्याची सोय आहे. मराठी खासदार मराठी बोलण्यासाठी लाजतात. कर्नाटकी खासदार त्यांच्या कानडी भाषेत, आंध्रप्रदेशचे खासदार तेलगू भाषेत, तामिळनाडूचे खासदार तामिळ भाषेत, बंगालचे खासदार बंगाली भाषेत बोलतात. मराठी लोकांना इंग्रजी येत नाही. अनेक वेळेला मी सांगितले की मराठी भाषेत बोलण्यासाठी तोंड उघडा. कोणत्याही भाषेत बोलण्याची लोकसभेत परवानगी आहे. सर्व प्रकारची व्यवस्था त्याठिकाणी असते.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

काही दिवसापूर्वी पार्लमेंटमध्ये महाराष्ट्रातील परप्रांतीयांच्या प्रश्नावर बिहारचे सर्व खासदार तुटून पडले. या राज्यात यायचे, पोट भरायचे आणि मुंबईतील लोक खाऱ्या पाण्याजवळ राहतात म्हणून त्यांची डोकी सडकी झालेली आहेत अशी मुक्ताफळे उधळायची. महाराष्ट्राकडे दुर्लक्ष होण्याचे प्रमुख कारण म्हणजे आमचे लोकप्रतिनिधी जागृत नाहीत. एकत्रित असतील, युनायटेड असतील तर खरोखरच समर्थपणे मुकाबला करु शकतील.

सभापती महोदय, दिल्लीमध्ये शिवाजी पथ म्हणून रस्ता आहे. त्याठिकाणी 1986 साली शिल्पकार श्री.साठे यांनी तयार केलेला छत्रपती शिवप्रभूंचा पुतळा बसविण्यात आला. या पुतळ्याच्या सभोवताली चांगले उद्यान होते. त्याची देखभाल करण्याचे काम सुप्रसिध्द नाट्य कलाकार श्रीमती वनमाला या करीत असत, कारण त्या त्याच ठिकाणी रहात होत्या. कालांतराने वृध्द झाल्याने त्यांच्याकडून काम होईना. महाराजांच्या हातामध्ये तलवार होती. आजूबाजूच्या वस्तीतील लोकांच्या डोळ्यामध्ये ती तलवार सलत होती. त्यांनी ती तलवार काढून नेली. महाराष्ट्रातून निवडून गेलेले खासदार दिल्लीत जातात. त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला नाही. आम्ही लोकसभेवर निवडून गेलो त्यावेळी प्रथम महाराजांचे दर्शन घ्यावयास गेलो होतो. आता पार्लमेंटमध्ये महाराजांचा पुतळा बसविण्यात आला आहे. त्यावेळी आम्ही बघितले की, महाराजांचा हात मोकळा, हातात खड्ग नाही. तलवारीशिवाय महाराज ही कल्पनाच मान्य करवत नाही. तलवार म्यानामध्ये असेल तर हात वर असणे शक्य नाही. हात वर असेल तर हातामध्ये तलवार का नाही? यासंबंधी चौकशी केली असता असे कळले की, शेजारच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांनी ती तलवार पळवून नेली. पण नव्याने तलवार का बसविली नाही? बाजूच्या झोपडपट्टीतील लोकांच्या भावना दुखावतील म्हणून तलवार बसविली नाही असे सांगण्यात आले. कै.शंकरराव चव्हाण या राज्याचे मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रातील सर्व खासदारांची बैठक महाराष्ट्र सदनमध्ये बोलावली होती. त्यावेळी बैठकीमध्ये आम्ही हा विषय उपस्थित केला. त्यानंतर महाराजांच्या हातामध्ये तलवार बसविण्यात आली. सध्या काय परिस्थिती आहे मला कल्पना नाही. महाराष्ट्राच्या छत्रपती शिवप्रभूंच्या हातातील खड्गाची काळजी घेणारे कोणी नाही. तलवार आणि महाराज यांचे अतूट नाते होते हे कोणी नाकारु शकणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

SGB/ SBT/ MMP/ 16:15

श्री.मधुकर सरपोतदार.........

सभापती महोदय, याच पध्दतीने कोकण रेल्वेचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. कोकण रेल्वेचे कोणतेही स्टेशन आधुनिक वाटत नाही. नवी मुंबईतील रेल्वे स्टेशन्स पहा. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी ती पाहिली असावीत. ती कशी आहेत? कोकणातील रेल्वे स्टेशन्स कशी आहेत? का एवढा फरक दिसून येतो? कोकणात मात्र पत्र्याची शेड? काय चालविले आहे तुम्ही? आज कोकण रेल्वे फायद्यात आहे. कोकण रेल्वेच्या इंजिनिअर्सना अन्य देशातून, अन्य राज्यातून रेल्वे प्रकल्प उभारण्यासाठी बोलावले जात आहे. इतकी बुध्दीमत्ता असताना असे का होत आहे? महाराष्ट्र शासनाने याचा पाठपुरावा करावा असा माझा आग्रह आहे. कोकण रेल्वेच्या नकाशावर असणारी जी रेल्वे स्टेशन्स आहेत, त्या सर्व स्टेशन्सवर कोकण रेल्वेवर धावणाऱ्या ट्रेन्स थांबल्या पाहिजेत. डबल फास्ट ट्रेन्स कोकणातील सगळ्या स्टेशन्सवर थांबत नाहीत. कोकणातील लोकांना याचा फायदा मिळाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी व्यथा मांडताना हेही सांगितले की, लोकप्रतिनिधींना देखील कोकण रेल्वेमध्ये आरक्षण मिळत नाही. इतके भयानक चित्र कोकण रेल्वेचे आहे आणि तरी देखील आम्ही कोणी आवाज उठवत नाही. म्हणून महाराष्ट्र शासनाने या संदर्भात पाठपुरावा करावा. हा प्रस्ताव खरोखरच चांगला आहे. सन्माननीय परिवहन राज्यमंत्री याठिकाणी बसले आहेत. महाराष्ट्र शासनाने अतिशय जागृतपणाने या प्रस्तावाचा पाठपुरावा केला पाहिजे. कोकण रेल्वे ही वैभवशाली आहे. लोकांना उत्पन्नाचे साधन मिळवून देणारी रेल्वे आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

टॉयलेटसारख्या क्षुल्लक बाबीची मागणी करावी लागते, यापेक्षा कोणते मोठे दुर्दैव असू शकते. म्हणून शासनाने त्याचा पाठपुरावा करुन या सुविधा उपलब्ध करुन ध्याव्यात. तसेच कोकणातील स्टेशनांवर गाडया थांबत नाहीत, त्यामुळे कोकणचा मेवा जो आंबा, काजू वगैरे आहे तो विकता येत नाही. त्या मेव्यापासून पर्यटकांना वंचित रहावे लागते आणि अशा प्रकारे सुविधा निर्माण केल्या नाहीत तर कोकण सुजलाम् सुफलाम् कसा होईल ? याचाही विचार करणे आवश्यक आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी होण्यासाठी केंद्रशासनाकडे पाठपुरावा करावा व कोकणातील लोकांचा प्रवास सुखकारक कसा होईल याची काळजी घ्यावी, एवढे बोलून या ठरावाला पाठिंबा देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तारांकित प्रश्न क्र.37637 च्या सुधारित उत्तराबाबत.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी आज जे निवेदन करावयाचे होते ते आपण पुढील आठवडयात ठेवले आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : आज चार वाजेची वेळ मला दिली होती परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलाविलेली होती, म्हणून मी येऊ शकलो नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : म्हणूनच आम्ही सभागृहाची बैठक थांबवून आपल्याला बोलावले नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : पाच कर्मचाऱ्यांसाठी सभागृहाची बैठक थांबविणे देखील बरोबर नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : न्यायालयाच्या अवमानाबाबतचा हा प्रश्न आहे. तसेच आपण ज्या तऱ्हेने या प्रश्नाकडे पाहत आहात, ते चुकीचे आहे. कारण उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा सन 1990 पूर्वीच्या लोकांच्या बाबतीत असून अजूनही त्याची अंमलबजावणी शासन करीत नाही, हा त्यातील महत्वाचा भाग आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : उच्च न्यायालयाचा कुठल्याही प्रकारे अवमान झालेला नाही.

**तालिका सभापती** : या विषयावरील निवेदन आपण पुढील आठवडयात घेण्याचे ठरविले आहे त्यामुळे त्यावर आता चर्चा करु नये, अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी कृपया आपले भाषण सुरु करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकण रेल्वे मार्ग दुपदरीकरणाची तसेच रेल्वे स्थानकांवर रेल्वे स्थानकांवर अत्यावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता.

**मु.शी.**: कोकण रेल्वे मार्ग दुपदरीकरणाची तसेच रेल्वे स्थानकांवर रेल्वे स्थानकांवर अत्यावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता या विषयावरील श्री. राजन तेली, वि.प.स. यांचा ठराव.

( चर्चा पुढे सुरु....

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी मांडलेल्या अशासकीय ठराव क्र. 111 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. महोदया, हा अत्यंत महत्वाचा विषय असून त्यात रेल्वेमार्ग दुपदरीकरण, तसेच रेल्वेच्या गाडया वाढविणे, रेल्वे स्थानकांवर आवश्यक सुविधा व सुरक्षिततेसंबंधीचे विषय अंतर्भुत आहेत. खरे म्हणजे कोकण हा आपल्या राज्याचा कॅलिफोर्निया आहे आणि यादृष्टीनेच शासनाने केंद्रशासनाकडे पाठपुरावा करायला पाहिजे. एका बाजुला आपण म्हणतो की, कोकणातील आंबा जगात गेला पाहिजे आणि जगातील पर्यटक कोकणात आले पाहिजेत. परंतु हे वास्तवात आणावयाचे असेल तर हे जे विकासाचे मार्ग आहेत त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. आज कोकणातील माणसाला सावंतवाडीपर्यंत देखील रिझर्वेशन मिळत नाही. तसेच या रेल्वे स्थानकावरील प्लॅट फॉर्मवर पत्र्याच्या झावळया लावलेल्या आहेत. वास्तविक प्लॅट फॉर्म चांगल्या प्रकारे बनविणे देखील शक्य आहे. ज्या ठिकाणी आपल्या माता-भगिनी उभ्या राहतात तेथे पावसापासून संरक्षणासाठी झावळया लावलेल्या आहेत आणि त्यातून पाणी गळत असते, अशी परिस्थिती आहे. वास्तविक प्लॅटफॉर्मवरील हया सुविधा अत्यंत मामुली आहेत परंतु त्या देखील कोकण मार्गावर केलेल्या नाहीत. खरे तर कोकण रेल्वे हाच एक चमत्कार आहे आणि त्याला केंद्रशासन व रेल्वे प्रशासनाने योग्य प्रकारे दिशा दिली तर कोकणपट्टीचा विकास होऊ शकतो. त्यामुळे अशा सुविधा व सुरक्षिततेच्या दृष्टीने देखील लक्ष देणे आवश्यक आहे. परवाच सदनात विषय निघाला होता की, लांजाजवळ बॉम्ब सापडले. अशा परिस्थितीत डोळयात तेल घालून रेल्वेमार्गाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण या मार्गावर शेकडो पर्यटक मडगाव पर्यंत जातात. केंद्रिय रेल्वे मंत्री श्री. लालूप्रसाद यादव यांनी गरीब रथ सुरु केला आहे,

यानंतर श्री. जुन्नरे .....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

परंतु ज्या ठिकाणी स्टॉप द्यावयास पाहिजे त्या ठिकाणी दिला नाही. कोकण रेल्वेला कोकणामध्ये ज्या ठिकाणी स्टॉप द्यावयास पाहिजे त्या ठिकाणी स्टॉप देण्याची आवश्यकता आहे. कोकण रेल्वेला ठाण्याला स्टॉप नाही, सिंधुदुर्ग जिल्हयाचे ओरस हे मुख्य ठिकाण आहे परंतु या ठिकाणी सुध्दा कोकण रेल्वेला स्टॉप नाही. त्यामुळे कोकणामध्ये जास्तीत जास्त स्टॉप देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा पाठपुरवा राज्यशासनाकडून झाला तर कोकणातील रेल्वे प्रवाशांची सोय होईल, त्यांचा प्रवास सुखद होईल, कोकणातील मालवाहतूक चांगल्या प्रकारे होईल यासाठी रेल्वेचे दुपदरी करण होण्याची आवश्यकता आहे. कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणासाठी केंद्र सरकार जेव्हा पैसे देईल तेव्हा देईल परंतु यासंदर्भात राज्यशासनाने देखील कोकणवासियांसाठी खर्चाचा वाटा उचलण्याची आवश्यकता आहे. कारण कोकण हे कॅलिफोर्निया आहे त्याचा विकास झाला तर संपूर्ण कोकणाचा विकास होईल. कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणाच्या संदर्भात राज्यशासनाने रेल्वेमंत्रालयाशी सातत्याने पाठपुरवा करण्याची आवश्यकता आहे. केंद्रसरकारच्या मागे लागल्याशिवाय कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणाचे काम होणार नाही. या ठिकाणी कोकणाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा अशासकीय ठराव या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. त्यामुळे या कोकण रेल्वेच्या सोयीसुविधेच्या संदर्भात राज्यशासनाने केद्राशी सातत्याने पाठपुरावा करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्य मंत्री ) :सभापती महोदय, एक चांगला अशासकीय ठराव सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी मांडलेला आहे. या ठरावावरील चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी भाग घेऊन त्यावर चांगल्या प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. कोकणासाठी नवीन गाडया सुरु झाल्या पाहिजेत, स्टॉप झाले पाहिजेत, चांगले रेल्वेस्टेशन झाले पाहिजे, रेल्वेस्टेशनवर चांगल्या सुविधा असल्या पाहिजेत, रेल्वेचा ट्रॅक दुहेरी झाला पाहिजे अशा प्रकारच्या त्यांनी मागण्या केलेल्या आहेत. रेल्वेच्या दुहेरी 760 कि.मी. लांबीच्या ट्रॅकसाठी 10 हजार कोटी रुपये खर्च येणार आहेत. दुहेरी रेल्वेच्या संदर्भात राज्य सरकारने सुध्दा भार उचलावा अशा प्रकारच्या सूचनाही सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. आपल्या राज्यात काही ठिकाणी रेल्वेट्रॅकच्या संदर्भात राज्य शासनाने यापूर्वीही आपल्या हिस्स्याचा भार उचलला आहे. आमच्याकडे नुकतेच 28.1.2008 रोजी डायरेक्टरचे पत्र आले असून कोकण रेल्वेसाठी सर्व प्रकारच्या सोयी सुविधा देण्यात आलेल्या आहेत असे त्यामध्ये म्हटले आहे. परंतु सन्माननीय सदस्य सांगतात ते सत्य मानून यासंदर्भात योग्य तो पाठपुरावा केला जाईल. रेल्वेच्या प्रश्नाशी परिवहन विभागाचा तसा संबंध जरी नसला तरी परिवहन विभागाच्या माध्यमातून आम्ही रेल्वेमंत्रालयाशी यापूर्वीही वेळोवेळी पाठपुरावा केला असून यापुढेही करणार आहोत. कोकणामध्ये रेल्वे थांबत नाही यासंदर्भात रेल्वेमंत्रालयाला परिवहन विभागाने सूचना केलेल्या आहेत. कोकणासाठी ज्या रेल्वे सुरु केल्या आहेत आणि त्या रेल्वे जर कोकणामध्ये थांबत नसतील तर त्याचा काही उपयोग नाही. त्यामुळे राज्यसरकारच्या माध्यमातून पुन्हा ठामपणाने सभागृहाचा विचार रेल्वेमंत्रालयासमोर मांडू. रेल्वे मंत्रालयाशी आम्ही सन 2006 पासून पाठपुरावा करीत आहोत. या विषयाच्या संदर्भात रेल्वे मंत्री श्री. लालू यादव यांची भेट घेण्याची आवश्यकता पडली तर त्यांची सुध्दा आम्ही भेट घेऊ व यामध्ये कशा प्रकारच्या सुधारणा करण्यात याव्यात व सभागृहाचे मत काय आहे तसेच कोकण रेल्वे कोठे कोठे थांबल्या पाहिजेत हे सागण्याचा प्रयत्न केला जाईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 16.30

श्री.धर्मारावबाबा आत्राम....

अनेक स्टेशनावर रेल्वे गाडया थांबत नाहीत तेव्हा त्या ठिकाणी रेल्वे गाडया थांबल्या पाहिजेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी नकाशाबद्दल उल्लेख केलेला आहे. . नकाशामध्ये जी स्टेशन्स दाखविण्यात आलेली आहेत त्याप्रमाणे रेल्वे गाडी थांबावयास पाहिजे अशी सूचना करण्यात आली आहे त्या संबंधी योग्य ती कार्यवाही करण्यासाठी केन्द्र सरकारकडे राज्य सरकारच्या वतीने पाठपुरावा करण्यात येईल असे मी आश्वासन देतो .

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी आपला अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी या अशासकीय ठरावाला उत्तर देतांना काही आश्वासने दिली आहेत हे ठीक आहे. मंगलोरपर्यंत दुपदरीकरण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. रोहयापर्यंत दुपदरी करण्यास केन्द्र सरकारने खर्चास मंजुरी दिलेली आहे. या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, खेड किंवा चिपळूण पर्यंत या रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण करणे शक्य आहे त्यामुळे तेथे दुपदरीकरण करण्यात यावे. ज्या ठिकाणी टनेल असेल व जेथे दुपदरीकरणाचा खर्च जास्त येत असेल त्या ठिकाणी हे काम नंतर केले तरी चालेल. माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी जे काही संगितले आहे त्यावर विश्वास ठेऊन मी माझ ा ठराव मागे घेईन . हा प्रश्न सोडविण्यासाठी माननीय केन्द्रीय रेल्वे मंत्री श्री. लालूप्रसाद यादव यांना भेटून राज्य सरकारच्या वतीने प्रयत्न करण्यात येणार आहे. माझी अशी मागणी आहे की, शासनातर्फे जर आपण नेतृत्व केले व कोकणातील सन्माननीय सदस्यांना घेऊन त्यांची भेट घेतली व या संदर्भात चर्चा तर अधिक बरे होईल. त्यापूर्वी अधिवेशन काळात शक्य झाले तर कोकण रेल्वेच्या एम.डी. बरोबर चर्चा करावी या कोकण रेल्वेचे जे एम.डी. आहेत ते सहा महिन्यापासून कोणत्याही गोष्टीकडे लक्ष देत नाहीत . माल वाहतूकच त्यांच्या नजरेसमोर आहे इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्याला देखील चुकीची माहिती दिली आहे. तेव्हा त्यांना देखील या बैठकीसाठी बोलावले आणि कोकणातील सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा केली तर जे लहान सहान प्रश्न आहेत ते त्वरित सुटू शकतील तेव्हा अशी बैठक घेण्याच्या बाबतीत विचार करण्यात यावा. त्याचप्रामाणे नवीन रेल्वे गाडया सुरु करण्याच्या बाबतीत, दुपदरीकरण्याच्या बाबतीत, कोकणातील स्थानिक लोकांना, भूमिपूत्रांना न्याय देण्याच्या बाबतीत या ठिकाणी सूचना करण्यात आलेल्या आहेत याबाबतीत केन्द्र सरकारला आपण शिफारशी कराव्यात तसेच कोकण रेल्वेच्या मागण्यासाठी वेळोवेळी आंदोलने करण्यात आलेली आहेत व त्या आंदोलन कर्त्याविरुध्द खटले भरण्यात आले आहेत. तेव्हा राज्य सरकार हे खटले मागे घेऊ शकते. कोकण रेल्वेच्या अनुषंगाने त्या भागात विविध पक्षाच्या वतीने जी आंदोलने झाली होती त्या आंदोलन कर्त्याविरुध्द दाखल करण्यात आलेले खटले मागे घेण्यात येत आहे असे माननीय मंत्री महोदय सांगतील काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, या आंदोलन कर्त्याविरुध्दचे खटले मागे घेण्यासबंधी गृह मंत्र्यांना विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर खेड - चिपळूण पर्यंत ॲडिशनल लाईन टाकण्याबाबत या ठिकाणी सूचना केलेली आहे. ही लाईन टाकण्याच्या दृष्टीने केन्द्र



VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 16.30

सरकारला विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर त्या भागातील सन्माननीय सदस्य आणि एम.डी. यांच्या बरोबर बैठक घेण्याचा जरुर प्रयत्न केला जाईल.

श्री.राजन तेली :सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले असल्यामुळे मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

---

**अशासकीय ठराव पुढे ढकलण्याबाबत**

**तालिका सभापती** : मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांचा अशासकीय ठराव पुढे ढकलण्यात येत आहे. यानंतर अर्धा तास चर्चा घेण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा तास चर्चा**

**पृ.शी.** : अहमदनगर जिल्ह्यातील ऊर्ध्व प्रवरा प्रकल्पासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणे.

**मु.शी.** : अहमदनगर जिल्ह्यातील ऊर्ध्व प्रवरा प्रकल्पासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणे याबात श्री. संजय दत्त, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

***

**अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत. ...**

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : आजच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार यानंतरची अर्धा तास चर्चा सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी उपस्थित करावयाची आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.जाधव यांनी पत्र देऊन ही अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्याची विनंती केली आहे आणि त्यांची विनंती मान्य करण्यात आली असल्याने, त्यांची अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात आली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, परीक्षा काळातील लोड शेडींगच्या बाबतीत सभागृहामध्ये मंत्र्यांकडून आज निवेदन होणार होते. आता सभागृहाची बैठक स्थगित होण्याची वेळ आली आहे पण अजूनही ते निवेदन झालेले नाही. हे निवेदन केव्हा होणार आहे ? याबाबत माननीय मंत्री महोदयांना अनेकदा सांगण्यात आलेले आहे. ...

**तालिका सभापती** : मी आपणाला सांगू इच्छितो की, या बाबतच्या सदस्यांच्या तीव्र भावना माननीय मंत्री महोदयांपर्यंत पोहोचवून त्यांनी याची गंभीर दखल घ्यावी म्हणून सांगण्यात येईल. ... या ठिकाणी याबाबत वारंवार चर्चा करूनही परीक्षेच्या काळातील लोड शेडींगच्या बाबतीत शासनाकडून योग्य तो खुलासा होत नाही, आता ही शेवटची संधी त्यांना आपण देत आहोत. त्यांनी याबाबत सोमवारी कोठल्याही परिस्थितीत सभागहाची बैठक संपेपर्यंत खुलासा करावा.

सभागृहापुढील आजचे कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, सोमवार, दिनांक 17 मार्च 2007 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 37 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 17 मार्च 2008 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही